# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त-

**दिनांक- २८ डिसेंबर- २०१५**

# अनुक्रमणिका

**त्रिसदस्य समिती सर्वसाधरण सभा** **दि.२८.१२.२०१५**

**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.३० वाजता**



| अ.नं. | विषय नं. | विषय | पान नं. |
|---|---|---|---|
| | | **सभाकामकाज विभाग** | |
| १ | १ | दिनांक ३०.११.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | ०१ |
| २ | २ | दिनांक १५.१२.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | ०७ |
| **(अ) प्रशासकीय मान्यतेचे विषय-** | | | |
| | | **सामान्य प्रशासन विभाग** | |
| ३ | ३ | आरोग्य विभागाकडील कंत्राटी पध्दतीने कार्यरत असणा-या कर्मचा-यांच्या पाल्यांना सन २०१६-१७ या वर्षापासून शैक्षणिक शुल्काचा परतावा देणेबाबत. | ७ |
| | | **सामान्य प्रशासन, वशी-११** | |
| ४ | ४ | डिजिटल फ्रॅन्कींग मशिन LJ90 चे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत. | ८ |
| | | **कामगार विभाग** | |
| ५ | ५ | श्रीमती निता अनिल खैरनार, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरहजेरीबाबत... | ९ |
| | | **श्री साईबाबा हॉस्पिटल** | |
| ६ | ६ | श्री साईबाबा रुग्णालयात Ad hoc basis पध्दतीने न्युरो सर्जनची नेमणूक करणेबाबत. | १० |
| ७ | ७ | श्री साईबाबा रुग्णालयात कार्डीओलॉजीस्टची नेमणूक करणेबाबत. | ११ |
| ८ | ८ | श्री साईबाबा रुग्णालयातील प्रस्तावित Neuro ICU व SICU साठी आवश्यक असलेले मनुष्यबळ मिळणेबाबत. | १३ |
| ९ | ९ | दि.२५.१२.२०१० चे जाहिरातीनुसार स्टाफ नर्स भरती प्रक्रियेतील गैरप्रकाराची चौकशी करणेबाबतचा श्री.गोवर्धन जानकू सिनारे यांचा अर्ज. | १४ |
| १० | १० | संस्थान रुग्णालयामधील व्हिजीटींग डॉक्टरांच्या मानधन नियमावलीबाबत. | १५ |
| ११ | ११ | संस्थान रुग्णालयात कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने बीएएमएस वैद्यकीय अधिका-यांच्या नेमणूका करणे बाबत. | १५ |
| १२ | १२ | संस्थान रुग्णालयातील आवश्यक वैद्यकीय अधिका-यांची पद भरती करणेकामी जाहिरात प्रसिध्द करणे बाबत. | १८ |
| | | **श्री साईनाथ रुग्णालय** | |
| १३ | १३ | श्री साई विभुती आरोग्य योजनेस (MOU) मसुद्यास मान्यता मिळणेबाबत. | १९ |
| | | **विधी विभाग** | |
| १४ | १४ | एसएलपी नं.२९८७५/ २०१५ साखरबाई हरिभाऊ शेळके (मयत) करीता रजनी विश्वास जोगळेकर वं इतर विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व इतर मध्ये वकिलपत्र देणेबाबत. | १९ |
| | | **सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेल** | |
| १५ | १५ | नाताळ उत्सव व शिर्डी महोत्सव- २०१५ मधील गर्दीचे कालावधीमध्ये साईभक्तांच्या सोयीसाठी एल.ई.डी. स्क्रीन बसविणेबाबत. | २० |
| | | **पाणीपुरवठा विभाग** | |
| १६ | १६ | सन २०१६ करीता संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणेबाबत | २१ |
| १७ | १७ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी पाणी पुरवठा साठवण तलावास कागद टाकणेसाठी वाढीव निधी उपलब्ध करुन देणेबाबत. | २१ |
| १८ | १८ | संस्थान परिसरात पाणी पुरवठा करणेकामी भाडोत्री टॅंकर लावणेस व त्यासाठी येणारे खर्चास मंजुरी मिळणेबाबत. | २३ |
| | | **श्री साई प्रसादालय विभाग** | |
| १९ | १९ | श्री साईप्रसादालयातील डिश वॉशर मशिन करीता व इतर भांडी धुणेसाठी लिक्वीड सोप खरेदीबाबत. | २४ |
| २० | २० | श्री साईप्रसादालयातील हाऊसकिपींग/ स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे कामाबाबत विविध वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देणे व ई-निविदा मागविणेबाबत. | २५ |
| २१ | २१ | श्री साईप्रसादालयातील प्रसाद भोजनामध्ये मनुष्यबळाद्वारे चपाती/ पुरी तयार करणेकामी विविध वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देणे व ई-निविदा मागविणेबाबत. | २६ |
| २२ | २२ | श्री साईप्रसादालयातील मनुष्यबळाद्वारे अन्न पाकिट (नाष्टा पाकिट) तयार करणेकामी विविध वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देणे व ई-निविदा मागविणेबाबत. | २६ |
| २३ | २३ | श्री साईप्रसादालयातील प्रसाद भोजनामध्ये चपाती मशिनद्वारे चपाती तयार करणेकामी विविध वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देणे व ई-निविदा मागविणेबाबत. | २७ |

| अ.नं. | विषय नं. | विषय | पान नं. |
|---|---|---|---|
| | | **लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग** | |
| २४ | २४ | सन २०१६-१७ करीता मोतीचूर लाडू, सुट्टी बूंदी व बर्फी बनविणेकामी ई-निविदा काढणेस व सदरकामी येणारे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत. | २८ |
| | | **द्वारावती भक्तनिवासस्थान** | |
| २५ | २५ | सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता द्वारावती भक्तनिवास इमारत व परिसर स्वच्छता/ हाऊसकिपींग (आऊटसोर्सिंग) कामाबाबत. | २९ |
| | | **बांधकाम विभाग** | |
| २६ | २६ | श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरित पारायण सोहळा मंडप-२०१५ कार्यक्रमासाठी वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेकामी आलेले खर्चाबाबत. | ३० |
| २७ | २७ | संस्थानचे अग्निशमन व्यवस्थेसाठी साईनगर परिसरात शेड उभारणेबाबत. | ३१ |
| २८ | २८ | साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळेचे साईभक्तांकरीता बस वेटींग शेडचे बांधकाम करणेबाबत. | ३२ |
| २९ | २९ | जुने प्रसादालय परिसरामध्ये असलेल्या सुलभ प्रसाधन गृहाबाबत. | ३३ |
| ३० | ३० | मौजे निमगाव को-हाळे गट नं.१६९ मध्ये वर्ग-०४ कर्मचारी निवासस्थान बांधकाम ठेकेदार मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांचे लवाद (Arbitration) वकील फी अदा करणेबाबत. | ३४ |
| ३१ | ३१ | श्री साईनाथ रुग्णालयातील एम एस खिडक्यांऐवजी अॅल्युमिनियम स्लायडींग विंडो बसविणेबाबत. | ३६ |
| ३२ | ३२ | महत्वाच्या/ अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी भक्तनिवास इमारतींचे बांधकाम करणेबाबत. | ३७ |
| ३३ | ३३ | नवीन भांडार इमारतीचे बांधकाम करणेबाबत. | ३८ |
| ३४ | ३४ | अध्यात्मिक शैक्षणिक संकुल विकास प्रकल्प उभारणेबाबत. | ३९ |
| ३५ | ३५ | मौजे रुई येथे साईसृष्टी प्रकल्प उभारणेबाबत. | ४० |
| ३६ | ३६ | शौचालय, स्नानगृहे, तात्पुरते निवारा शेडस् वाहनतळे व कॅम्पींग ग्राऊंड विकसीत करणेबाबत. | ४१ |
| ३७ | ३७ | शताब्दी कक्ष व आपत्ती व्यवस्थापनाबाबत. | ४२ |
| ३८ | ३८ | शिर्डी येथील रस्ते भू-संपादीत करुन विकसीत करणेबाबत. | ४३ |
| ३९ | ३९ | बहुउद्देशीय सभागृहाचे बांधकाम करणेबाबत. | ४४ |
| ४० | ४० | श्री साईबाबा महासमाधी शताब्दी निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी या क्षेत्रातील सल्लागार अथवा संस्थेची नेमणूक करणेबाबत. | ४६ |
| | | **फायर अॅण्ड सेफ्टी विभाग** | |
| ४१ | ४१ | संस्थानचे अग्निशमन वाहन वापराचे विमानतळ, हेलिपॅड व इतर ठिकाणांसाठी दर निश्चित करणेबाबत. | ४७ |
| | | **खरेदी विभाग** | |
| ४२ | ४२ | गावरान तुप खरेदीबाबत. | ४९ |
| ४३ | ४३ | मे.सुरभी डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद यांच्या पेपर कप पुरवठा सुरक्षा अनामत रक्कमेबाबत. | ५१ |
| | | **वाहन विभाग** | |
| ४४ | ४४ | संस्थानचे स्कुल बसेस करीता टायर्स देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत. | ५२ |
| **आयत्या वेळेचे विषय.** | | | |
| ४५ | ०१ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी हॉस्पिटलमधील वैद्यकीय संचालक पदाची वयोमर्यादा शिथिल करणेबाबत. | ५३ |
| ४६ | ०२ | खातेनिहाय चौकशीकामी विधी व्यावसायिक यांची सादरकर्ते अधिकारी म्हणून नेमणूक करणेबाबत. | ५३ |
| ४७ | ०३ | संस्थानचे आर्थिक सहाय्यातून शिर्डी पोलीस स्टेशन कार्यालयासाठी एका खोलीचे बांधकाम करुन देणेकामी झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत. | ५४ |

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.२३/ २०१५** — **दिनांक २८.१२.२०१५**

**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** — **वेळ- दुपारी १२.३० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक २८.१२.२०१५ रोजी दुपारी १२.३० वाजता शिर्डी येथे साईनिवास अतिथिगृहात आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ३६७२/ २०१५, दिनांक २६ डिसेंबर, २०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा सोमवार दिनांक २८.१२.२०१५ रोजी दुपारी १२.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.अध्यक्ष श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ३०.११.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६१९** दिनांक ३०.११.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रति सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन या इतिवृत्तातील खालील शिफारसींना पुष्टी देण्यात आली.

**०१ साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग इ. मेन्टनन्स/स्वच्छता कामासाठी पात्र निविदाधारकांचे ई-निविदाव्दारे आलेले बीड ऑफ फायनान्सियल (प्राईज बीड) उघडून नविन कंत्राटदाराचे नेमणुकीबाबत निर्णय घेणे बाबत.**

१७(२)(अ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील असे नमुद आहे.

दि.१२/०६/२०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ४८३ अन्वये. प्रास्तवित कामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेस येवून मा. मुंबई उच्च न्यायालयाची औरंगाबाद खंडपिठाची मान्यता घेण्यात यावी मा. मुबई उच्च न्यायालय औरगांबाद खंडपिठाने सदरकामी रुपये ३,०८,०८,५००/- या वार्षिक खर्चास मान्यता दिलेली आहे. व खंडपिठाने सुचविलेप्रमाणे पुढील कार्यवाही करणेस यावी तसेच नविन ठेकेदाराची नेमणुक होई पावेतो सध्या यांत्रिकीकरणासह हाऊसकिंपींग विद्युत,प्लंबीग मेटेनन्स/स्वच्छतेच आऊटसोर्सिंगचे पध्दतीने काम करीत असलेले मे. बी.व्ही.जी.इ.ली.पुणे यांना प्रत्येक महिन्यास मुदतवाढ देणेत यावी असा निर्णय झालेला आहे.

साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिंपींग विद्युत, प्लंबीग मेटेनन्स/ स्वच्छतेच आऊटसोर्सिंगचे पध्दतीने कामासाठी मा.उच्च न्यायालय मुंबई औरगांबाद खंडपिठाने सिव्हील ॲप्लिकेशन २८९/ २०१५ अन्वये रु.३,०८,०८,५००/- (अक्षरी रुपये तीन कोटी आठ लाख आठ हजार पाचशे) मात्रचे वार्षिक खर्चास मान्यता दिलेली आहे. याकामी ई-निविदा प्रक्रीया राबविणे बाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे.

| दिनांक | केलेली कार्यवाही |
|---|---|
| १९/०२/२०१२ | मा.व्यवस्थापन समितीचे सभेत हाऊसकिपींगचे कामासाठी वर्तमान पत्रातुन जाहिरात देणेस व निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली. |
| ०९/०३/२०१२ | वर्तमान पत्रातुन जाहिरात देण्यात आली. |
| १५/०७/२०१३ | जा.नं.एसएसएस/साई धर्मशाळा/१७९३/२०१३ दि. १५/०७/२०१३ ते १५/०७/२०१४ अखेर हाऊसकिपींग कामाचा कार्यादेश देण्यात आला. |
| १५/०५/२०१४ | एक वर्ष मुदतवाढी बाबत टिपणी सादर केली. |
| १२/०६/२०१४ | मा.उच्च न्यायालय मुंबई औरगांबाद खंडपिठाची मान्यता घेण्यात यावी व नविन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत साईभक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता सध्याचे ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इ.ली.पुणे यांना मुदतवाढ देण्यात यावी असा निर्णय झाला आहे. |
| १२/०१/२०१५ | मुदतवाढ देण्यात येवून ई – निविदाप्रक्रीया राबविण्यात यावी असा मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठाने निर्णय क्रमांक २८९/२०१५ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे आजपर्यंत कंपनीस वेळोवेळी मुदतवाढ दिलेली आहे. |
| २१/०१/२०१५ | ई – निविदा मागविणेबाबत टिपणी सादर केली. |
| ११/०४/२०१५ | वर्तमान पत्रातुन जाहिरात प्रसिध्द झाली. |
| २९/०४/२०१५ | अंतीम मुदती अखेर ०२ निविदा प्राप्त झाल्यामुळे पुन्हा फेर निविदा मागविणेची कार्यवाही सुरु करणेत आली. |

| | दुस-यांदा निविदा मागविणेबाबत. |
|---|---|
| ०१/०५/२०१५ | फेरनिविदा मागविणेबाबत टिपणी सादर केली. |
| १८/०५/२०१५ | वर्तमान पत्रातुन जाहिरात प्रसिध्द झाली |
| ०६/०६/२०१५ | मुदतीत ०५ निविदा प्राप्त झाल्या. |
| ०८/०७/२०१५ | गुणांकन तक्ते तयार केलेनंतर एकच निविदाधारक पात्र झालेने मा.मुख्यलेखाधिकारी यांनी तिस-यांदा निविदा मागविणेबाबत सूचना दिलेली आहे. |
| | **तिस-यांदा निविदा मागविणेबाबत (3rd Call)** |
| २०/०७/२०१५ | ई – निविदा मागविणेबाबत टिपणी सादर केली. |
| १२/०८/२०१५ | वर्तमान पत्रातुन जाहिरात प्रसिध्द केली. |
| ०१/०९/२०१५ | मुदतीत ०४ निविदा प्राप्त झाल्या आहेत. |

तिस-या वेळेस (3rd Call) एकुण ४ निविदा प्राप्त झाल्याअसुन सदर्भिय मजुर टिपणी नुसार सदर निविदांसोबतचे टेक्नीकल बीड मा.प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष दि. १७/१०/२०१५ रोजी उघडण्यात आले आहेत. कागदपत्रांची लेखाशाखेमार्फत दि.०३/११/२०१५ रोजी तपासणी करुन गुणांकन तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

Technical Document मध्ये दिलेल्या अटी शर्तीनुसार कॅग रिपोर्ट प्रमाणे निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन Technical Scores देण्यात येऊन ज्या कंपनीला ७० व त्या पेक्षा जास्त गुण मिळेल अशा कंपनीचे बीड ऑफ फायनान्सियल उघडण्यात येईल. त्यानुसार निविदाधारकांना खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे गुण मिळालेले आहेत. त्याचा सविस्तर गुणाचा तक्ता सोबत अवलोकनार्थ सादर.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | मिळालेले गुण | पात्र /अपात्र |
|---|---|---|---|
| १ | मे.सायन सर्व्हीसेस , चंदन नगर पुणे | ११ | अपात्र |
| २ | **मे. बी.व्ही.जी.इ.ली.पुणे** | **१००** | **पात्र** |
| ३ | मे.अॅपशॉट युटीलीटी सर्व्हीसेस, चैन्नई | ५७ | अपात्र |
| ४ | **मे.सुमित फॅसिलिटी प्रा.ली. चिंचवड पुणे.** | ७० | **पात्र** |

७० व ७० पेक्षा जास्त गुण मिळालेले उपरोक्त तक्त्यातील मे.बी.व्ही.जी.इ.ली.पुणे व मे.सुमित फॅसिलिटी प्रा.ली. चिंचवड पुणे हे दोन निविदाधारक पात्र आहे.

साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत,प्लंबीग मेटेनन्स/स्वच्छता कामासाठी आऊटसोर्सिंगचे पध्दतीने मासिक सरासरी खर्च रु.२५ लाख या प्रमाणे एक वर्ष कालावधीसाठी रु २५ लाख x १२ महिने = रु. ३,००,००,०००/-(अक्षरी तिन कोटी मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. उपरोक्त चारही निविदाधारकाचे टेक्नीकल बीड मा. प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले आहेत.

गुणांकना प्रमाणे मे.सुमित फॅसेलिटी पुणे यांचे टेक्नीकल बीडचे गुणांकन ७० टक्के असुन मे.बी.व्ही.जी. इंडिया ली. पुणे यांचे टेक्नीकल बीडचे गुणांकन १०० टक्के इतके आहे.

सदरचा खर्च रु.१० लाखापेक्षा अधिक असल्याने ई निविदेव्दारे आलेले व पात्र ठरलेले मे.सुमित फॅसेलिटी पुणे व मे.बी.व्ही.जी.इंडिया ली. पुणे यांचे बीड ऑफ फायनान्सियल (प्राईज बीड) तुलनात्मक खालील प्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | निविदेमधील मुळ दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे | २,६९,९२,०५६.०० |
| ०२ | मे.सुमित फॅसिलीटी प्रा.लि., चिंचवड, पुणे | २,२९,०६,७७७.५६ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिंपींग विद्युत, प्लंबीग मेटेनन्स/ स्वच्छता ही कामे आऊटसोर्सिंगचे पध्दतीने करुन घेणेसाठी मे.सुमित फॅसिलिटी प्रा.ली., चिंचवड, पुणे यांचे रु.२,२९,०६,७७७.५६ मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुढील एक वर्ष कालावधीसाठी कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, धर्मशाळा विभाग/ विधी अधिकारी)

---

०२ **सन २०१५-१६ करीता प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागांसाठी आवश्यक किराणा मालासाठी तीस-यांदा ई-निविदा प्रक्रियेतील व्यापारी लिफाफे (Financial Bid) उघडणेबाबत.**

सन २०१५-१६ चे किराणामाल प्रक्रियेतील उर्वरीत ३० किराणा मालाचे Items साठी दि.२५.०९.२०१५ ते दि.०७.१०.२०१५ या कालावधीत तिस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. यामध्ये खालील निविदाधारकांच्या तांत्रिक निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

- अग्रवाल एजन्सीज, साकुरी
- हरिओम प्लेक्झीपॅक इंडस्ट्रिज, वाठार, कोल्हापुर
- स्टार पॅकेजींग, वसई.

उपरोक्त निविदाधारकांच्या तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.१२.१०.२०१५ रोजी उघडण्यात आलेल्या आहेत. त्याचा तपशील सोबतचे परिशिष्टात सादर केलेला आहे. सदरचे तांत्रिक निविदेमध्ये अ.नं.१ मे.अग्रवाल एजन्सीज, साकुरी व अ.नं.३ मे.स्टार पॅकेजींग, वसई यांच्या निविदा पात्र ठरविल्या आहेत व अ.नं.२ मे.

हरीओम प्लेक्झीपॅक इंडस्ट्रिज, कोल्हापूर यांनी फॅक्टरी परवाना दिलेला नसल्यामुळे मा. मुख्यलेखाधिकारी साहेब यांनी अपात्र ठरविलेली आहे.

**उपरोक्तप्रमाणे सन २०१५-१६ चे किराणामाल प्रक्रियेतील उर्वरीत ३० किराणा मालाचे Items खरेदी करणेसाठी तिस-यांदा प्राप्त झालेल्या मे.अग्रवाल एजन्सीज, साकुरी व मे.स्टार पॅकेजींग, वसई या दोन निविदाधारकांचे ई-निविदेतील व्यापारी लिफाफे (Financial Bid) आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला.**

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Star Packaging | | Agrawal Agencies | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate | Amount | Rate | Amount |
| 1.0 | Bhagar (Kodri) | 6.00 Quintal | NQ | NQ | NQ | NQ |
| 2.0 | Magaj Bee (Melon Seeds/Magaz Seeds) | 1.2 Quintal | NQ | NQ | NQ | NQ |
| 3.0 | Badam Bee (Almond-Big Size) Mothi Size | 0.4 Quintal | NQ | NQ | NQ | NQ |
| 4.0 | Nakeshwar (Masala Phool) | 2.5 Quintal | NQ | NQ | NQ | NQ |
| 5.0 | Dagadful (Black stone flower) | 2.00 Quintal | NQ | NQ | NQ | NQ |
| 6.0 | Hing Khada (Asafoetida) Nagchhap, Agmark | 1.00 Quintal | NQ | NQ | NQ | NQ |
| 7.0 | Kacche Pohe (Rice pressed) | 9.00 Quintal | NQ | NQ | NQ | NQ |
| 8.0 | Bhajke Pohe (Brown rice poha) | 21.00 Quintal | NQ | NQ | NQ | NQ |
| 9.0 | Khade Mith (Natural Salt) | 50.00 Quintal | NQ | NQ | NQ | NQ |
| 10.0 | Sutali - (Jut twine) (Barik Three Ply) | 4.00 Quintal | NQ | NQ | NQ | NQ |
| 11.0 | Patraval Plain (Plain disposable leaf plates) Cutting, Kacchi Badam | 12000.00 Nos. | NQ | NQ | NQ | NQ |
| 12.0 | Patraval Four Kappyachi (Leaf/Paper plates with silver coated) | 2600000.00 Nos. | NQ | NQ | NQ | NQ |
| 13.0 | Droan (Leaf/Paper bowl) Silver Coated | 7000.00 Nos. | NQ | NQ | NQ | NQ |
| 14.0 | Soap - (Small Size, 12 Gram) Branded Company | 3600.00 Nos. | NQ | NQ | NQ | NQ |
| 15.0 | Dish Washing Powder (Standard) | 1.00 Quintal | NQ | NQ | NQ | NQ |
| 16.0 | Dish Washing Liquid Soap (Standard) | 16000.00 Litre | NQ | NQ | NQ | NQ |
| 17.0 | Kunku | 1.5 Quintal | NQ | NQ | NQ | NQ |
| 18.0 | Glasin/Poster Laminated Paper Bag | | | | | |
| 19.0 | Food Packet Bag Size 4.5"x 6.5" Glasin Paper, (50 GSM Paper+20GSM Coating) 3 Side Seal | 150.00 Quintal | 17500 | 2625000 | NQ | NQ |
| 20.0 | Prasd Bag Size 6"x 7" 3 Colour Printing, Poster Laminated Paper, (55 GSM Paper+15GSM Coating), Size-300mm, 3 Side Seal | 1100.00 Quintal | 13100 | 14410000 | NQ | NQ |
| 21.0 | Food Packet Bag Size 8"x 10", 1 Colour Printing, Glasin Paper, (45 GSM Paper+25GSM Coating), 3 Side Seal | 406.00 Quintal | 18100 | 7348600 | NQ | NQ |
| 22.0 | Plain Plastic Bag Size 8"x 10" Bottam Seal 200 guage | 3.00 Quintal | 17000 | 51000 | NQ | NQ |
| 23.0 | Paper Role With Printing (for Ladu & Bundi Packing Machine) Poster Paper-60GSM, L.D.Coating-25GSM - Total-85GSM, Paper Roll Size-240mm,01 Role=Approx 20 to 22 kg. | 2000.00 | NQ | NQ | NQ | NQ |
| 24.0 | Plastic Tray (for Ladu & Bundi Packing Machine) P.V.C. (Food Grade) 250 Micron, Size -150mm X 25mm X 50Mm | 20000000.00 Nos. | NQ | NQ | NQ | NQ |
| 25.0 | Canteen Dept.(Tea Powder, Coffee, Biscuit) | | | | | |
| 26.0 | Chaha Powder -(Tea Powder) Dust (Tata/Brook Bond/Society/Lipton) | 200.00 Quintal | NQ | NQ | NQ | NQ |
| 27.0 | Coffee Filter (Brook Bond, Cafe Gold, Society) (Coffee Filter) | 15.00 | NQ | NQ | NQ | NQ |
| 28.0 | Biscuit - Glucose Small Packet (Parle/Britania/ Sunfeast) | 1200000.00 | NQ | NQ | 3.78 | 4536000 |
| 29.0 | Biscuit - Glucose Big Packet (Parle/Britania/ Sunfeast) | 350000.00 | NQ | NQ | 7.56 | 2646000 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 30.0 | Biscuit -Namkeen Small Packet (Monaco/Timepass/ Snaky) (Parle/Britania/Sunfeast) | 500000.00 | NQ | NQ | 3.7 | 1850000 |
| 31.0 | Biscuit -Snacks Small Packet (Kracjack/50-50/ Sweet & Salt) (Parle/Britania/Sunfeast) | 400000.00 | NQ | NQ | 3.7 | 1480000 |
| 32.0 | Biscuit - Mari, Small Packet (Parle/Britania/ Sunfeast) | 200000.00 | NQ | NQ | 3.7 | 740000 |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ चे किराणामाल प्रक्रियेतील उर्वरीत ३० किराणा मालाचे Items खरेदी करणेसाठी तिस-यांदा ई-निविदा मागविण्यात येऊनही प्लास्टीक पिशवी खरेदीकामी मे.स्टार पॅकेजींग या एकाच निविदाधारकाचे व बिस्कीट खरेदीकामी मे.अग्रवाल एजन्सीज या एकाच निविदाधारकाचे दर प्राप्त झालेले आहेत. सबब संबंधीतांना पुरवठा आदेश देणेपूर्वी सदरहू मालाचे मागील मंजूर दर, चालू बाजारभावातील दर व प्राप्त झालेले दर यांचा तुलनात्मक अभ्यास करुन सविस्तर प्रस्ताव त्रीसदस्य समितीसमोर सादर करण्यात यावा, तसेच उर्वरित मालासाठी पुन्हा ई-निविदा मागविणेत याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक,खरेदी विभाग)

---

०३ **प्रिंटर्स, यु.पी.एस. व स्विच खरेदी करणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना अति जलद सुविधा देणेकामी संगणक व संगणकीय साहीत्याची आवश्यकता आहे. उपरोक्त प्रमाणे संदर्भ क्र.१ नुसार उपसमितीने श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता आवश्यक असलेले प्रिंटर्स, यु.पी.एस. व स्विच साहित्य खरेदी करणेकामी रु.२,९०,०००/- खर्चास मान्यता मिळाली आहे. त्यानुसार संदर्भ क्र.२ नुसार दि. ०७/०९/२०१५ रोजीची मंजुर टिपणी नुसार www.shrisaibabasansthan.org.in या संस्थानच्या वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती व त्यांची अंतिम मुदत दि. २९/१०/२०१५ पर्यंत होती. त्यानुसार आवक विभागाकडून ई.डी.पी. विभागास प्राप्त झालेल्या निविदा धारकांचा तपशिल खालीलप्रमाणे.

परिशिष्ट "अ"

| अ.नं. | निविदा धारकांचे नाव | आवक नं. | निविदा प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | Maxtech, Sambhaji Chowk, Kopargaon. 1/2 | 3365/3366 | 22/10/2015 |
| 2. | Surendra Traders, Nashik. 1 | 3395 | 24/10/2015 |
| 3. | Sai Siddhi Printers, Kopargaon. 1/2 | 3414/3415 | 24/10/2015 |
| ४. | Manjula Trading Company Pvt. Ltd., Mumbai. | 3433 | 26/10/2015 |

उपरोक्त संगणकीय साहीत्य विहीत पध्दतीने खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला.

| Sr. No. | Description | M/s. Maxtech, Kopargaon. | M/s.Surendra Traders, Nashik. | M/s.Sai Siddhi Printers, Kopargaon. | M/s.Manjula Trading Company Pvt.Ltd., Mumbai.1 |
|---|---|---|---|---|---|
| | | Total Amount in Rs. | Total Amount in Rs. | Total Amount in Rs. | Total Amount in Rs. |
| 1. | EPSONLQ310-Dot Matrix Printers (05 nos.) | - | **52500.00** | 57500.00 | - |
| 2. | HP Laser Jet Printers 1020 | 38250.00 | **35495.00** | 39000.00 | 42500.00 |
| | Canon LBP2900 (05 nos.) | 35000.00 | **32495.00** | 35500.00 | |
| 3. | APCBx- U.P.S. 600v (40 nos.) | 92000.00 | **88000.00** | 110000.00 | - |
| 4. | Dlink - 24 Port Manageble Switch (05 nos.) | 65000.00 | **38500.00** | 97500.00 | 30000.00 |
| | **Total:** | 192000.00 | **211495.00** | 300500.00 | 72500.00 |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना अति जलद सुविधा देणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संगणक व संगणकीय साहीत्य खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले मे.सुरेंद्र ट्रेडर्स, नाशिक यांचे एकत्रित निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०४ **मंदिर व परिसर, व्दारावती आणि भक्तनिवासस्थान येथील ए.सी. यंत्रणेचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्ट् (CAMC) देणेकामी प्राप्त ई-निविदाचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 23/07/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र.204 (45) अन्वये मंदिर व परिसर, व्दारावती आणि भक्तनिवासस्थान येथील ए.सी. यंत्रणेचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्ट् (CAMC) देणेकामी विहीत पध्दतीने जाहीरात प्रसिध्द् करुन बाहेरील निविदाधारकाकडून ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 8,00,000/- खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात व महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर जाहीरात अपलोड करण्यात आली होती. ई-निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्या मुळ प्रती मुदतीत 4 निविदाधारकांकडून बंद पाकीटामध्ये प्राप्त झाल्या होत्या. सदर ई-निविदेतील तांत्रिक बीड दिनांक 12/11/2015 रोजी प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असून, प्राप्त कागदपत्रांची छाननी केलेनंतर त्यापैकी खालील 3 निविदाधारक पुर्वपात्रता निकषांची पुर्तता करत असल्याने पात्र झाले आहेत :

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| 1. | Classic Cool Airconditioning, Mumbai |
| 2. | Kailash Refrigeration Works, Mumbai |
| 3. | Shree Venkateshwara Turnkey Project Soluation Pvt. Ltd., Pune |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या 3 पात्र ई-निविदांधारकांचे कमर्शियल बीड आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील मुळ दर रुपये |
|---|---|---|
| 1. | Kailash Refrigeration Works, Mumbai | **6,89,980/-** |
| 2. | Shree Venkateshwara Turnkey Project Soluation Pvt. Ltd., Pune | 7,75,000/- |
| 3. | Classic Cool Airconditioning, Mumbai | 8,04,700/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर व परिसर, व्दारावती आणि भक्तनिवासस्थान येथील ए.सी. यंत्रणेचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्ट् (CAMC) देणेकामी Kailash Refrigeration Works, Mumbai यांचे रु.६,८९,९८०/- मात्र निम्नतम् दर स्विकारणेत येऊन, सदरहु कामी त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

०५ **श्री साई प्रसादालयातील वायुवीजन यंत्रणेचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी प्राप्त ई-निविदाचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 12/03/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 74 (27) अन्वये श्री साई प्रसादालयातील वायुवीजन यंत्रणेचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी विहीत पध्दतीने जाहीरात प्रसिध्द् करुन बाहेरील निविदाधारकाकडून ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.7,08,000/- खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात व. महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर जाहीरात अपलोड करण्यात आली होती. ई-निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्या मुळ प्रती मुदतीत 4 निविदाधारकांकडून बंद पाकीटामध्ये प्राप्त झाल्या होत्या. सदर ई-निविदेतील तांत्रिक बीड दिनांक 12/11/2015 रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असून, प्राप्त कागदपत्रांची छाननी केलेनंतर त्यामध्यो त्यापैकी खालील 3 निविदाधारक पुर्वपात्रता निकषांची पुर्तता कर असल्याने पात्र झाले आहेत :

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | Classic Cool Airconditioning, Mumbai | 3. | Shree Venkateshwara Turnkey Project Soluation Pvt. Ltd., Pune |
| 2. | Kailash Refrigeration Works, Mumbai | | |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या 3 पात्र ई-निविदांधारकांचे कमर्शियल बीड आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील मुळ दर रुपये |
|---|---|---|
| 1. | Kailash Refrigeration Works, Mumbai | 8,37,600/- |
| 2. | Shree Venkateshwara Turnkey Project Soluation Pvt. Ltd., Pune | **5,98,988/-** |
| 3. | Classic Cool Airconditioning, Mumbai | 8.77,100/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील वायुवीजन यंत्रणेचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी Shree Venkateshwara Turnkey Project Soluation Pvt. Ltd., Pune यांचे रु.५,९८,९८८/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मॅकेनिकल विभाग प्रमुख)

---

०६ **वार्षिक अहवाल छपाई व CD खर्चासंबंधीत तुलनात्मक दरपत्रके उघडणेबाबत.**

आर्थिक वर्ष २०१४-१५ चे वैधानिक लेखापरिक्षण पुर्ण झाले असुन लेखापरिक्षकांनी अहवाल सादर केला आहे. हिवाळी अधिवेशनात विधीमंडळाच्या सभागृहामध्ये सदर अहवाल सादर केला जातो. मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.२८.११.२०१५ रोजीचे सेभेत सदर अहवाल सादर करण्यात येऊन त्याची नोंद घेण्यात आली आहे. त्यामध्ये एकुण ५०० प्रती अहवाल छपाईस व ९०० CD तयार करण्यास मान्यता मिळाली आहे.

हिवाळी अधिवेशन दि.०७.१२.२०१५ पासुन सुरु होत असल्याने कालमर्यादा गृहीत धरुन विहीत पध्दतीने दि.२४.११.२०१५ रोजीचे ई-मेल व्द्ारे संबंधीत पुरवठादारांना अवगत करण्यात आले होते. तसेच वेळोवेळी दुरध्वनीवरुन संपर्क साधून तुलनात्मक दर देणेबाबत त्यांना कळविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन एकूण ०३ पुरवठाधारकांकडून प्राप्त झालेली तुलनात्मक दरांची बंद पाकिटे आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | तपशील | Unique Prints | Shivam Graphics | Om Sai DIGI Printech Pvt. Ltd. |
|---|---|---|---|---|
| ०१ | वार्षिक अहवाल ५०० नग | १०९.०० | १०५.०० | <u>९६.००</u> |
| ०२ | CD ९०० नग | ३५.०० | ३२.०० | <u>३०.००</u> |
| | **एकुण खर्च रु.** | ८६,००० | ८१,३०० | ७५,००० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वार्षिक अहवाल छपाई व CD तयार करुन घेणेकामी Om Sai DIGI Printech Pvt.Ltd. यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्तयामध्ये गंडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

०७ **शिर्डी महोत्सव २०१५ कलाकार व मानधन निश्चिती करणेबाबत.**

चालू वर्षाचा शेवट व नवीन वर्षाची सुरुवात साईभजनाने व्हावी व श्रींच्या सानिध्यात जावा या उद्देशाने दरवर्षी प्रमाणे या वर्षी ही दि.३१/१२/२०१५ रोजी समाधी मंदिर रात्रभर दर्शनासाठी खुले राहणार आहे. तसेच गुरुवार, दि.३१/१२/२०१५ रोजी साईनगर येथील मैदानावर होणा-या कार्यक्रमामध्ये कार्यक्रम सादर करणेसाठी खालील कलाकारांनी संस्थानकडे अर्ज केलेले आहेत. आज अखेर ०८ अर्ज प्राप्त झालेले आहेत.

**अ) प्राप्त झालेल्या अर्जाचा तपशील खालीलप्रमाणे.**

| अ.न. | अर्ज दाखल तारीख | कलाकारांचे नाव व पत्ता | कार्यक्रम | कलाकार संख्या | मानधन अपेक्षा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २२/०९/२०१५ | अवधेज चंदन भारव्दाज, लखनऊ ०९४५१७६५२४४ | साई भजन संध्या | १५ | विनामुल्य |
| २ | ०८/१०/२०१५ | मोहन शर्मा ०७८९५२१५५८५ | साई भजनसंध्या | १० | विनामुल्य |
| ३ | ०८/१०/२०१५ | जगदिश पाटील, ठाणे ९२२१५५११११ | साई भक्तीगितांचा कार्यक्रम | २० ते २५ | विनामुल्य |
| ४ | ०३/११/२०१५ | श्री.अनिलकुमार, हुबळी ९५३८२४३९९९ | एम शाम साई के नाम | १० ते १५ | विनामुल्य |
| ५ | ०३/११/२०१५ | श्री पारस जैन व प्रविण महामुनी, शिर्डी ९८२२५४६८१७ | साईभजन संध्या | ०५ ते १० | विनामुल्य |
| ६ | ०४/११/२०१५ | पुनम खन्ना, दिल्ली ९८१००३४८७२ | साई भजन | १० ते १२ | विनामुल्य |
| ७ | ०९/११/२०१५ | विजय साखरकर, मुंबई ९८२१३९३३२३ | साईत्सवर नृत्योस्व- | १५ ते २० | विनामुल्य |
| ८ | २१/११/२०१५ | श्रावण बाळा, मुंबई ९६६४१९८८५२ | झाले तुझे दर्शन साई | २० ते २५ | विनामुल्य |

३१ डिसेंबर २०१५ रोजीच्या कार्यक्रमासाठी ज्या कलाकारांनी अर्ज केलेले आहे अशा कलाकारांना सायं. ७.३० ते रात्रौ १२.०० या वेळेत कार्यक्रम साजरा करता येतील.

**ब) मागील वर्षी २०१४ मध्ये खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले होते.**

| अ.नं. | कलाकाराचे नाव व पत्ता | कार्यक्रम / वेळ | कलाकार संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | पारस जैन,व हमसर हयात निजामी शिर्डी मो.नं. ९८२२५४६८१७ | साई भजनसंध्या सायं ७.३० ते ९.०० | ५ | विनामूल्य |
| २ | श्री.जगदिश मारुती पाटील, गायक ठाणे.मो.नं. ९२२१५५१११९, | साई भजनसंध्या रात्रौ.९.०० ते १०.३० | ३० | विनामूल्य |
| ३ | श्री.सच्चिदानंद आप्पा, मुंबई मो.नं. ९८२०१४८६७८ | एक शाम साई के नाम रात्रौ.१०.३० ते १२.०० | २५ | विनामूल्य |

यावर्षी ३१ डिसेंबर २०१५ चे रात्रौ साजरा होणा-या शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी उपरोक्त (अ मधील) अर्ज केलेल्या ०८ कलाकारातून खालील ०६ कलाकारांची निवड करण्यात करण्यात येऊन त्यांना शिर्डी महोत्सव-२०१५ करीता कार्यक्रम देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी महोत्सव- २०१५ साजरा करणेसाठी उपरोक्त अ तक्त्यामधील अ.नं.०३ व ०५ या कलाकारांचे कार्यक्रम मागील शिर्डी महोत्सव कार्यक्रमामध्ये झालेले असल्यामुळे ते कलाकार वगळता इतर अ.नं.०१,०२,०४,०६,०७ व ०८ या विनामुल्य सेवा देणा-या कलाकारांचे कार्यक्रम उपलब्ध वेळेमध्ये आयोजित करणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-प्रशासन शाखा, वशी-५)

---

**विषय नं.०२** **दिनांक १५.१२.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६२०** **दिनांक १५.१२.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.**

---

**विषय नं.०३** **आरोग्य विभागाकडील कंत्राटी पध्दतीने कार्यरत असणा-या कर्मचा-यांच्या पाल्यांना सन २०१६-१७ या वर्षापासून शैक्षणिक शुल्काचा परतावा देणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) मा.श्री.विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे अध्यक्षतेखाली शिर्डी स्थित संस्थान कार्यालयात आरोग्य विभागाकडे (पुर्वीचे स्वच्छता विभागाकडे)कार्यरत असणा-या स्थायी (कायम) व कंत्राटी स्वच्छता कर्मचा-यांना उपलब्ध करुन द्यावयाच्या सोई-सुविधा व इतर अनुषंगिक बाबींसाठी बैठक घेण्यात आली. या बैठकीय संस्थान व्यवस्थापनामार्फत मा.कार्यकारी अधिकारी महोदय व इतर वरिष्ठ अधिकारी तसेच संस्थान आस्थापनेवर काम करणारे स्वच्छता कर्मचारी (वर्ग ०४) उपस्थित होते.

या बैठकीचे इतिवृत्त सामान्य प्रशासन विभागास कार्यवाहीसाठी प्राप्त झालेले असून यामध्ये अं.क्र.०६ मध्ये, 06. "Contract Sanitary employees should be given educational fee refund as per permanent employees refund as per permanent employees." असे नमूद करण्यात आलेले आहे.

उपरोक्त निर्देशास अनुसरुन सिविस्तर विवेचन खालील प्रमाणे-

**(ब)** मा.कोर्ट रिसिव्हर यांचे काळापासून संस्थान आस्थापनेवरील स्थायी पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना पाल्यांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा दिला जात आहे. सदर शैक्षणिक शुल्क परतावा देणेकामी तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ .(०१) अन्वये, मार्गदर्शक तत्वे– तथा- नियमावली ठरविण्यात आलेली आहे. या नियमावलीनुसार प्रत्येक वर्षी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने व मा.व्यवस्थापन समितीने मंजुर केलेल्या मार्गदर्शक तत्वे– तथा– नियमावलीस अधिन राहून स्थायी कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा दिला जात आहे.

दरम्यानचे कालावधीत, मा.महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या अधिनियमानुसार मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.१६ जुलै २००९ रोजीचे पत्राने, सदर योजना मा.व्यवस्थापन मंडळाचे सन १९९६ चे सभेतील निर्णयाप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना लागू आहे, त्याच धर्तीवर ती यापुढेही प्रचलित पध्दतीने चालू राहिल अशी मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार प्रत्येक वर्षी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने शासकीय/ शासन अनुदानित अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या शुल्काच्या मर्यादेपर्यंत शैक्षणिक शुल्काचा परतावा तसेच ज्यु.के.जी ते इयत्ता १० वी (इंग्रजी माध्यम) व आय.टी.आय या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्काचा परतावा संस्थानच्या शाळेचे दराप्रमाणे आदा करण्यात येत आहे.

सध्या मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार मा.त्रिसदस्य समिती कामकाज पहात असल्याने सन २०१३ पासून मा. न्यायालयाचे मान्यतेने शैक्षणिक शुल्क परतावा विहीत नियमानुसार अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

**(क) परिच्छेद 'अ'** मध्ये नमूद केल्याप्रमाणे मा.श्री.विजय कुमार, सदस्य,राष्ट्रीय सफाई कर्मचारी, आयोग,भारत सरकार, नवी दिल्ली यांचे बैठकीत ठरलेप्रमाणे व त्यांनी निर्देशीत केलेप्रमाणे ज्या प्रमाणे दरवर्षी संस्थान

आस्थापनेवरील स्थायी कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा दिला जातो त्याप्रमाणे तीच सवलत आरोग्य विभागाकडील कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या स्वच्छता कामगारांच्या पाल्यांना लागू करता येईल. तथापी, फक्त आरोग्य विभागाकडील कंत्राटी स्वच्छता कर्मचा-यांना अशी सवलत लागू केल्यास इतर विभागातील कंत्राटी कर्मचारी अशी मागणी करण्याची शक्यता आहे. त्याबाबत अलाहिदा निर्णय घेता येईल. सद्यिस्थतीत आरोग्य विभागाकडे कुशल-अकुशल अंदाजे २२५ कंत्राटी कर्मचारी काम करत आहेत.

उपरोक्त परिच्छेदांमध्ये नमूद केलेनुसार मा.सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग यांनी निर्देश दिलेप्रमाणे, आरोग्य विभागाकडे (पुर्वीच्या स्वच्छता विभागाकडे) कंत्राटी पध्दतीने स्वच्छता कामगार म्हणून कार्यरत असणा-या कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून देता येईल परंतु याकामी प्रथम मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेवून त्यानंतर मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करावा लागेल व शासनाची मान्यता मिळाल्यानंतर दरवर्षीप्रमाणे मा.उच्च न्यायालय यांचेकडे मान्यतेसाठी दिवाणी अर्ज सादर करता येईल. तसेच असा शैक्षणिक शुल्क परतावा देणेकामी लेखाशाखा विभागामार्फत वार्षिक अंदाजपत्रकामध्ये आर्थिक तरतूद करता येईल, असे मत आहे.

**निर्णय क्र.६२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.श्री.विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशानुसार आरोग्य विभागाकडील कंत्राटी पध्दतीने कार्यरत असणा-या कर्मचा-यांच्या पाल्यांना सन २०१६-१७ या वर्षापासून शैक्षणिक शुल्काचा परतावा देणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला. तसेच सदरहू विषय माहितीसाठी मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.०४** **डिजिटल फ्रॅन्कींग मशिन LJ90 चे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

प्रस्ताव- **(अ)** संस्थानचा दैनंदिन पत्रव्यवहार फ्रॅकिंग करून पोष्टाव्दारे पाठविणेकामी सामान्य प्रशासन विभागाकडील जावक विभागासाठी मे.कोरस इंडिया लि.पुणे यांचे मार्फत निओ पोस्ट कंपनीचे डिजीटल फ्रॅकिंग मशिन IJ90 दि.०१/०१/२०१२ रोजी खरेदी करण्यात आलेले आहे. सदर फ्रॅकिंग मशिनचा दि. ०१ जानेवारी २०१२ पासुन वापर सुरु करण्यात आलेला आहे. या फ्रॅकिंग मशिनची वारंटी कालावधी दि. ३१/१२/२०१२ अखेर संपुष्टात आलेनंतर सन २०१३-१४, व सन २०१५ मध्ये या मशिनचे सर्व्हिस कॉन्ट्रक्ट थेट मे. कोरस इंडिया लि. पुणे या कंपनी सोबत करणेत आलेले आहे. सन २०१५ मध्ये (चालु वर्षी)दि. ०१/०१/२०१५ ते ३१/१२/२०१५ अखेर सर्व्हिस कॉन्ट्रक्टपोटी रक्कम रू. ७८,६५२/- मात्र दि. ०९ मार्च २०१४ रोजी आदा करणेत आलेली आहे. सदर सर्व्हिस कॉन्ट्रक्टचा कालावधी दि. ३१/१२/२०१५ रोजी संपुष्टात येत आहे.

आता निओ पोस्ट इंडिया प्रा. लि. गुडगांव यांनी दि. ११/१२/२०१५ च्या पत्रान्वये दि. ०१/०१/२०१६ ते ३१/१२/२०१६ अखेर वार्षिक सार्व्हिस कॉन्ट्रक्ट करणे बाबत कळविले आहे. सदर फ्रॅकिंग मशिनसाठी देखभाल व दुरुस्तीची सेवा मे. कोरस इंडिया लि. पुणे देणार असुन सर्व्हिस कॉन्ट्रक्टची रक्कम निओ पोस्टचे नावाने पाठविणेबाबत कळविले आहे.

याबाबत मे. कोरस इंडिया लि पुणे यांचे प्रतिनिधी यांचेशी दुरध्वनी करून माहिती घेतली असता त्यांनी निओ पोस्ट गुडगांव यांचे नांवे रक्कम पाठवून देण्यास हरकत नाही.आम्ही कोरस इंडिया लि. पुणे मार्फत सेवा देण्यास तयार आहोत असे सांगीतले आहे.

**(ब)** निओ पोस्ट प्रा.लि.गुडगांव यांनी संदर्भीय पत्रासोबत अग्रीमेंटचा मसुदा पाठविला असुन सर्व्हिस कॉन्ट्रक्टसाठी येणारा खर्च खालील प्रमाणे कळविला आहे.

| S.No. | Code | Description | License Identifier Number Of Machine | Quantity | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 1) | | Neopost IJ90 RMFS Digital Franking Machine Annual Maintenance Charge (AMC)<br>Remote Resetting Fee(PRF) | N100031<br>N100031 | 1<br>1 | 60,000.00<br>10,000.00 | 60,000.00<br>10,000.00 |
| Toat Amount– (Eighty Thousand One Hundred Fifty Rs.Only) | | | Total Basic | | | 70,000.00 |
| | | | Service Tax @ 14.5% | | | 10,150.00 |
| | | | Total Amount | | | 80,150.00 |
| | | | Round Amount | | | 80,150.00 |

**(क)** तसेच, यापुर्वी संदर्भ क्र.०३ नुसार मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे समोर C.A.NO. 9219 OF 2014 IN PIL NO.18 OF 2011 दि.२६/०९/२०१४ अन्वये झालेल्या आदेशात "वार्षिक मेंटेनंस सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशिनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधित मशिनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डिलरला पुर्वीच्या अटी व शर्तीवर देण्यांत यावे," असे नमुद केलेले आहे.

उपरोक्त परिच्छेदात विवेचन केलेनुसार निओ पोस्ट प्रा.लि.गुडगांव या कंपनीशी फ्रॅकिंग मशिनचे देखभाल दुरुस्तीसाठी सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे आवश्यक आहे. याकामी वर नमुद केलेप्रमाणे रु.८०,१५०/- मात्र इतका खर्च येणार असुन सदरचा खर्च मशिनरी देखभाल व दुरुस्ती या अंदाजपत्रकातून करता येईल.

सदरचे सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करणे आवश्यक आहे. त्याकामी येणारे एकूण रक्कम रू. ८०,१५०/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डिजिटल फ्रॅन्कींग LJ90 मशिन दुरुस्ती व देखभालीचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट मे.निओ पोस्ट प्रा.लि., गुडगाव या कंपनीकडून करुन घेणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.८०,१५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.०५** **श्रीमती निता अनिल खैरनार, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरहजेरीबाबत**

**प्रस्ताव-** श्रीमती निता अनिल खैरनार या दि.०५.०९.२००८ पासून परिचारीका या पदावर श्री साईबाबा हॉस्पिटलकडे कार्यरत आहेत. त्या दि. १६.०८.२०१० ते दि. ०२.१०.२०१० या कालावधीत विनापरवानगी गैरहजर होत्या. याबद्दल त्यांना यापूर्वी सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. त्यानंतर त्या दि. २७.१२.२०१० ते दि. ०९.०२.२०११ असे एकूण ४५ दिवस गर्भपात कारणासाठीच्या रजेवर होत्या. सदरची रजा उपभोगल्यानंतर त्यांनी दि. १०.०२.२०११ रोजी कामावर हजर होणे आवश्यक होते. परंतू त्या दि. १०.०२.२०११ पासून सतत, सलग, विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर आहेत. त्यामुळे रुग्णालयाचे दैनंदिन कामकाजात अडचणी येतात. तसेच रुग्ण सेवेवर विपरीत परिणाम होतो. याबद्दल जा.नं.एसएसएस/वशी ७बी/६९९६/२०११ दि. २५.०२.२०११ अन्वये रजिष्टर ए.डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवून त्यांना कळविण्यात आले आहे की, सात दिवसांच्या आत विनापरवानगी गैरहजेरीबाबत लेखी खुलासा सादर करुन कामावर हजर व्हावे. सदरची नोटीस त्यांना दि. २८.०२.२०११ रोजी प्राप्त झालेली आहे. परंतू श्रीमती खैरनार यांनी गैरहजेरीबाबत लेखी खुलासासादर केलेला नाही. तसेच त्या कामावरदेखील हजर झालेल्या नाहीत. त्याबद्दल पुन्हा त्यांना जा.नं. एसएसएस/ वशी ७बी/ ७५२८/ २०११ दि. २३.०३.२०११ अन्वये रजिष्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवून कळविण्यात आले आहे की, दोन दिवसांचे आत कामावर हजर व्हावे अन्यथा संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजून तुमचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात येईल. सदरचे पत्र त्यांना दि. २६.०३.२०११ रोजी प्राप्त झालेले आहे. त्यानंतर जा. नं. एसएसएस/वशी ७बी/२५७/२०११ दि. १८.०४.२०११ अन्वये रजिष्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवून कळविण्यात आले आहे की, अंतिम संधी म्हणून तुम्ही सदरचे पत्र मिळताच दोन दिवसांचे आत कामावर हजर व्हावे, अन्यथा तुम्हास संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजुन तुमचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात येईल. परंतू श्रीमती खैरनार अद्यापपर्यंत कामावर हजर झालेल्या नाहीत तसेच त्यांनी गैरहजेरीबाबत लेखी खुलासा देखील सादर केलेला नाही.

येणेप्रमाणे श्रीमती खैरनार संस्थानचे पत्रांची दखल घेत नसल्याने दि. २१.०४.२०११ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता घेण्यात आली होती. त्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे दि. १२.०६.२०११ चे सभेत विषय क्र.३४ वर निर्णय क्र. ३७१ असा झाला की, "खैरनार निता अनिल, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे विनापरवानगी गैरहजेरीबाबत संस्थानचे कायदे सल्लागार ॲडव्होकेट श्री. अशोक पाटील यांचा सल्ला घेण्यात यावा."

त्यानंतर जा. नं. एसएसएस/वशी ७बी/६३०१/२०१२ दि. ०६.०१.२०१४ अन्वये संस्थान कामगार कायदे सल्लागार ॲड. अशोकराव पाटील, अहमदनगर यांना पत्र पाठवून सदर प्रकरणी त्यांचे कायदेशिर मत मागविणेत आले होते.

दरम्यानच्या काळात श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक यांचेमार्फत डि. पी. क्र. १३५९ दि. १०.०७.२०१५ अन्वये असे कळविणेत आले आहे की, कु. निता अनिल खैरनार (परिचारीका) दि. १०.०२.२०११ पासून कायम गैरहजर असल्याने त्यांचे नांव तत्काळ हजेरी मस्टरवरुन कमी करण्याची कार्यवाही आपल्यामार्फत व्हावी असे मत आहे.

यानंतर ॲड. अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी दि. १०.०८.२०१५ रोजी सदर प्रकरणी पुढीलप्रमाणे कायदेशिर मत दिले आहे.

"I have seen the office note. It appears that kum. Nita Khairnar is absent Wef. 10.02.2011 In spite of our several communication she has not reported on duty. In normal course her termination should be preceded by domestic enquiry but taking in to consideration her long absentism without explaination it can be presumed that she has abondened the job. Hence, it is advisable to remove her name from muster roll. She should be communicated to that effect stating about her absentism and removed of name from muster roll."

**गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचा-यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपील) विनीयम, २०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय, किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे,

(४) वेतनवाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचा-याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचा-याच्या समयश्रेणीतील वेतनश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो, तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचा-याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी, पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाजेष्ठतेतून घट झाली त्या स्थानात किंवा सेवाजेष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही

**मोठया दंडात्मक कारावाया अंतर्गत**

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षीस म्हणून कायदेशिर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाचा कर्मचा-याचे कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ् स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षादेणेची तरतूद आहे.

अ.नं. ८ ची शिक्षा करावयाची असल्यास सेवा विनीयमानुसार प्रथम सदर कर्मचा-याची खाते निहाय चौकशी करुन खाते चौकशीचा निष्कर्ष अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे कारवाई करण्याची तरतूद आहे.

ॲड. अशोकराव पाटील यांचे दि.१०.०८.२०१५ रोजीचे अभिप्राय अहवाल नुसार श्रीमती निता अनिल खैरनार, परिचारीका यांचे नांव हजेरीपटावरुन कमी करणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णय क्र.६२३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती निता अनिल खैरनार, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरहजेरीबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपील) विनीयम, २०१३ मधील तरतूदीनुसार त्यांची खाते निहाय चौकशी करणेत यावी व खाते चौकशीचा निष्कर्ष अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे कारवाई करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.कामगार अधिकारी, कामगार विभाग)

---

**विषय नं.०६** **श्री साईबाबा रुग्णालयात Ad hoc basis पध्दतीने न्युरो सर्जनची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** जाहिरातीद्वारे पदे भरणेच्या प्रक्रियेस काहीसा कालावधी लागणार असल्याने न्युरोसर्जन, सोनोलॉजिस्ट, आरएमओ आणि बीटीओ या पदावर Ad hoc basis वर वैद्यकीय अधिकारी नेमणूका करणेबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर सिव्हील ॲप्लीकेशन क्र. २८७/२०१५ दाखल करणेत आले होते. सदर ॲप्लीकेशनवर दि.१२/०१/२०१५ रोजीचे आदेशाने न्युरोसर्जन (२), सोनोलॉजिस्ट (१), आरएमओ (१५) व बीटीओ (१) पदांचे Ad hoc basis वर नेमणूका करणेस मान्यता दिणेत आलेली आहे.

डॉ.अंकुर भुपेन्द्रकुमार पाचानी, गुजरात, एमसीएच (न्युरो) यांनी न्युरोसर्जन या पदावर श्री साईबाबा रुग्णालयामध्ये सेवा देणेकामी अर्ज केलेला आहे.

जाहिरातीमार्फत न्यूरोसर्जनचे स्थायी स्वरुपात फक्त १ पद भरणेत आल्याने १.पद रिक्त आहे. सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रुग्णांची संख्या बघता त्याप्रमाणात न्युरोसर्जनची आवश्यकता भासत असल्याने न्युरोसर्जनचे रिक्त पदावर जाहिरातीमार्फत कायमस्वरुपी पदभरती होईपर्यंत किंवा १ वर्ष कालावधीसाठी यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी डॉ अंकुर भुपेन्द्रकुमार पाचानी, एमसीएच (न्यूरो) यांची Adhoc Basis वर नेमणूक करुन त्यांना दि. २०/११/२०१४ रोजीच्या मा. त्रिसदस्य समिती निर्णय क्र. १०१६ नुसार त्याच पदावर स्थायी स्वरुपात काम करणा-या कर्मचा-यांचे सुरुवातीचे वेतनाइतके म्हणजेच रु.६१,०००/- एकत्रित मानधन तसेच प्रचलित पद्धतीने प्रोत्साहन भत्ता देणेबाबतचा प्रस्ताव दि. २८/११/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेसमोर सादर करणेत आला होता त्यावर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"श्री साईबाबा रुग्णालयात Adhoc Basis पद्धतीने ज्या न्युरोसर्जनची नेमणूक करावयाची आहे त्यांच्या शैक्षणिक सर्टिफिकेटची पडताळणी केली आहे का? कशी? व कोणी? केली याचा उल्लेख उपरोक्त प्रस्तावात दिसून येत नाही सबब या सर्व बाबींसह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा."

डॉ. अंकुर भूपेन्द्रकुमार पाचानी यांचे शिक्षण एमबीबीएस, एमएस (जन सर्जरी), एमसीएच (न्युरो) असे आहे. त्यानुसार त्यांनी एमबबीएसचे पदवी प्रमाणपत्र, एमएस (जन सर्जरी) चे पदवी प्रमाणपत्रव रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र तसेच एमसीएच पास झाल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. सदर प्रमाणपत्र प्र. वैद्यकीय संचालक व उपवैद्यकीय संचालक यांनी त्यांचे सत्यप्रती वरुन तपासले आहे. त्याबाबत तुलनात्मक माहिती खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.

| अ. नं. | पदाचे नाव व वेतनश्रेणी | आकृतीबंधा-प्रमाणे मंजुर पदसंख्या | स्थायी भरलेली पदे | रिक्त पदे | आकृतीबंधाप्रमाणे शैक्षणिक व इतर पात्रता | डॉ.पाचाणी यांची शैक्षणिक व इतर पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | न्युरोसर्जन १५६००- ३९१०० ग्रेड पे ६६०० | ०२ | ०१ | ०१ | १) वय – ४५ वर्षे<br>२) एमसीएच / डीएनबी<br>३) अनुभव २ वर्ष | १) वय – ३२ वर्षे<br>२) एमसीएच (न्युरो)<br>३) पीजीडीएचएचएम, एमबीए<br>४) पीजीडीएमएलएस |

डॉ. अंकुर पाचानी यांची शैक्षणिक पात्रता रुग्णालयासाठी मंजूर असलेल्या आकृतीबंधात न्युरोसर्जन पदासाठी दर्शविलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसारच आहे. आकृतीबंधात २ वर्षाचा अनुभव दर्शविलेला आहे. डॉ. पाचानी यांचेकडे अनुभव नसला तरी त्यांनी या क्षेत्रात दोन महिने ऑब्झरवरशिप केलेली असुन त्यांचेकडे पीजीडीएचएम, एमबीए (हेल्थकेअर मॅनेजमेंट), पीजीडीएमएसएस (मेडिको लिगल सिस्टीम) या अतिरिक्त शैक्षणिक पात्रता आहेत. या अतिरिक्त शैक्षणिक पात्रतेचा विचार करता संस्थानच्या रुग्णालयासाठी निश्चितच फायदा होईल. सबब, रुग्णालयाकडील न्युरोसर्जन डॉक्टरांची कमतरताविचारात घेता डॉ. पाचानी यांना नेमणूक देणे आश्यक आहे. तसेचदि. १०/११/२०१५ रोजी मा. त्रिसदस्य समिती सभेत डॉ. पाचानी यांचे पत्नी डॉ. सौ. निखीला पाचानी याची कार्डिओलॉजिस्ट या पदावर Adhoc basis पद्धतीने नेमणूक करणेबाबत निर्णय झालेला आहे. अशा परिस्थितीत डॉ. अंकुर पाचानी यांची नेमणूक झाल्यास हे दोन्ही विशेषज्ञ (पती-पत्नी) संस्थानच्या रुग्णालयासाठी जास्तीत-जास्त सेवा देतील असे नम्र मत आहे.

तरी, डॉ.अंकुर भूपेन्द्रकुमार पाचानी, एमसीएच (न्यूरो) यांची न्युरोसर्जन पदावर जाहिरातीमार्फत कायमस्वरुपी पदभरती होईपर्यंत किंवा १ वर्ष कालावधीसाठी यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी याची Adhoc Basis वर नेमणूक करुन त्यांना दि.२०/११/२०१४ रोजीच्या मा.त्रिसदस्य समिती निर्णय क्र.१०१६ नुसार त्याच पदावर स्थायी स्वरुपात काम करणा-या कर्मचा-यांचे सुरुवातीचे वेतनाइतके म्हणजेच रु. ६२,८००/- एकत्रित मानधन तसेच प्रचलित पद्धतीने प्रोत्साहन भत्ता देता येईल.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.६२४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, न्युरोसर्जन पदावर जाहिरातीमार्फत कायमस्वरुपी पदभरती होईपर्यंत किंवा १ वर्ष कालावधीसाठी यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत Adhoc Basis वर डॉ.अंकुर भूपेन्द्रकुमार पाचानी, एमसीएच (न्यूरो) यांची श्री साईबाबा रुग्णालयाकडे नेमणूक करणेत यावी. तसेच त्यांना त्याच पदावर स्थायी स्वरुपात काम करणा-या कर्मचा-यांचे सुरुवातीच्या वेतनाइतके म्हणजेच रु. ६२,८००/- मात्र एकत्रित मानधन तसेच प्रचलित पद्धतीने प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.०७ **श्री साईबाबा रुग्णालयात कार्डीओलॉजीस्टची नेमणूक करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा रुग्णालयाचे मंजुर आकृतीबंधामध्ये इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजीस्टचे २ पदे व नॉनइंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजीस्ट चे १ पद मंजूर असुन डॉ. बजाज व डॉ. गौरव वर्मा यांची इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजिस्ट म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. तथापि, डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांना त्यांनी केलेल्या गंभीर गैरशिस्त वर्तनाबाबत खाते चौकशी पूर्ण होईपर्यंत दि. ०८/११/२०१४ पासून संस्थान सेवेतून तात्पुरते निलंबित करण्यात आले आहे.

उपरोक्त दोन्ही डॉक्टर्सना निलंबित केल्याने रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट या पदावर ०६ महिने कालावधीसाठी कंत्राटी व व्हिजीटींग पद्धतीने तात्पुरत्या नेमणूक करणेकरिता सिव्हील ॲप्लीकेशन नं.२७९७/२०१४ वरील मा.उच्च न्यायालयाचा दि. १९/०३/२०१४ नुसार मान्यता देण्यात आली होती. त्यास अनुसरुन हॉस्पीटलकडे उपलब्ध असलेल्या कार्डीओलॉजीस्ट अर्जदारांच्या दि. २३/०३/२०१४ रोजी मुलाखती घेऊन डॉ. मनोहर शिंदे व डॉ. प्रशांत पवार यांची कंत्राटी पद्धतीने तर डॉ. बजाज, डॉ. ठेंगे, डॉ. हिरण व डॉ. विजन यांची व्हिजीटींग पद्धतीने तात्पुरते सहा महिन्यांसाठी नेमणूक करण्यात आली होती. त्यापैकी डॉ. शितलकुमार हिरण व डॉ.विनोद विजन हे हजर झालेले नव्हते. सदर नेमणूकांस मा. त्रिसदस्य समितीचे दि. १२/०४/२०१४ रोजीचेसभेतील निर्णय क्र.२७५ नुसार कार्योत्तर मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त ६ महिन्यांसाठीची नेमणूक संपुष्टात आल्याने मा. त्रिसदस्य समितीचे दि. १९/०९/२०१४ चे सभेतील निर्णय क्र. ७८५ नुसार पुन्हा मुदतवाढ देणेकामी मा. न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन नं. २९०/२०१५ दाखल करणेत आले होते. त्यावर दि. १२/०१/२०१५ रोजीचे आदेशान्वये ०१ वर्ष कालावधीसाठी किंवा डॉ. बजाज व डॉ.वर्मा यांची चौकशी पूर्ण होईपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत पूर्वीच्याच अटीशर्तीवर मुदतवाढ देण्यात आली होती. मा. उच्च न्यायालयाच्या मंजुरीनुसार तात्पुरत्या स्वरुपात Adhoc बेसिसवर डॉ. मनोहर शिंदे व डॉ. प्रशांत पवार यांना नेमणूक देण्यात येऊन त्यांना अनुक्रमे व्हिजीटींग पद्धतीने काम करावयाचे असल्याने त्यांनी कंत्राटी पद्धतीच्या कामाचा राजीनामा दिल्याने त्यांना सदर पदाचा राजीनामा मंजूर करुन त्यांना व्हिजीटींग पद्धतीने नेमणूक देण्यात आली व त्यांचे जागेवर डॉ. भारत जैन दि. ०३/०३/२०१५ रोजी पासून कंत्राटी पद्धतीने नेमणूक देण्यात आली.

सुरुवातीस कंत्राटी व व्हिजीटींग पद्धतीने नेमणूक केलेल्या कार्डीओलॉजीस्टची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| आकृतीबंधात कार्डीओलॉजीस्ट पदासाठी मंजुर असलेली शैक्षणिक पात्रता | सध्या कार्यरत असलेल्या कार्डीओलॉजीस्टची नावे व नेमणूकीचा प्रकार | शैक्षणिक पात्रता | कामाचे दिवस | वेतन |
|---|---|---|---|---|
| डीएम / डीएनबी अनुभव – २ वर्ष | डॉ. शिंदे, कंत्राटी | डीएनबी | पुर्णवेळ | ३,००,०००/- |
| | डॉ. जैन, कंत्राटी | डीएनबी | पुर्णवेळ | १,५०,०००/- |
| | डॉ. बजाज, व्हिजीटींग | डीएम | एक आड | प्रोत्साहन भत्ता |
| | डॉ. ठेंगे, व्हिजीटींग | डीएनबी | एक बुधवार | प्रोत्साहन भत्ता |
| | डॉ. काळे, व्हिजीटींग | डीएनबी | सोमवार | प्रोत्साहन भत्ता |
| | डॉ. पवार, व्हिजीटींग | डीएम | शुक्रवार | प्रोत्साहन भत्ता |

तदनंतर, रुग्णांच्या संख्येचा विचार करता उपरोक्त नमुद केलेले कंत्राटी व व्हिजीटींग कार्डीओलॉजीस्टची संख्या कमी पडत असल्याने मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन नं. ३९३७/२०१५ दाखल करणेत आले होते. त्यावर मा.न्यायालयाने दि. १०/०४/२०१५ रोजीचे आदेशानुसार चार कार्डीओलॉजीस्टना Ad hoc बेसिस वर नेमणूक करणेस मान्याता दिलेली आहे. सदर मंजुरीनुसार डॉ. धिरज मोरे, डीएम यांना नेमणूक देण्यात आलेली आहे.

सध्या कार्यरत असलेल्या कार्डीआलॉजीस्टचे कामकाजची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

| नाव | १ जुन २०१५ ते ३१ सप्टेंबर २०१५ | | |
|---|---|---|---|
| | ओपीडी | आयपीडी | सर्जरी |
| डॉ. शिंदे (कंत्राटी) | ४३९८ | ८७५ | ८५९ |
| डॉ. बजाज (व्हिजीटींग) | ६७४ | ७६ | ९१ |
| डॉ. ठेंगे (व्हिजीटींग) | ७२५ | १२३ | १४२ |
| डॉ. काळे (व्हिजीटींग) | ११०१ | २३५ | २८९ |
| डॉ. पवार (व्हिजीटींग) | ८५६ | १६५ | १९३ |
| डॉ. जैन (कंत्राटी) | १. डॉ. शिंदे यांना ओपीडी, एंजिओग्राफी, एंजिओप्लास्टी, बीएमव्ही, एएसडी, पीडीए शस्त्रक्रियेसाठी मदत करणे.<br>२. डॉ. शिंदे यांचे मार्गदर्शनानुसार आयसीसीयु, जीआयसीयु, सीआरयु-१/२ या विभागात प्रिऑपरेटीव्ह व पोस्ट ऑपरेटीव्ह रुग्णांवर उपचार करणे.<br>३. रुग्णांचे २ डीईको करणे.<br>४. अपघात कक्षात येणा-या रुग्णांसाठी (एकआडएक) २४ तास ऑनकॉल राहणे.<br>५. डॉ. शिंदे व डॉ. मोरे यांचे रजेचे मुदतीत काम पाहणे. | | |
| डॉ. धिरज मोरे (Adhoc Basis) | १. व्हिजीटींग डॉक्टर्स यांना ओपीडी, एंजिओग्राफी, एंजिओप्लास्टी, बीएमव्ही, एएसडभ्, पीडीए शस्त्रक्रियेसाठी मदत करणे.<br>२. व्हिजीटींग डॉक्टर्स यांचे मार्गदर्शनानुसार आयसीसीयु, जीआयसीयु, सीआरयु- १/२ या विभागात प्रिऑपरेटीव्ह व पोस्ट ऑपरेटीव्ह रुग्णांवर उपचार करणे.<br>३. रुग्णांचे २डीईको करणे.<br>४. अपघात कक्षात येणा-या रुग्णांसाठी (एकआडएक) २४ तास ऑनकॉल राहणे.<br>५. डॉ. शिंदे यांना सहाय्यक म्हणून काम करणे.<br>६. डॉ. शिंदे व डॉ. जैन यांचे रजेचे मुदतीत काम पाहणे. | | |

डॉ. भारत जैन व डॉ. धिरज मोरे यांना दररोज साधारणतः १२ ते १६ तासांपर्यत सेवा पुरवावी लागते सबब त्यांचेवरील कामाचा बोजा बघता आणखी तीन नियमीत कार्डीओलॉजीस्टची अत्यंत आवश्यकता आहे.

रुगणालयातील रिक्त पदे भरणेकामी वेळोवेळी जाहिरात प्रसिद्ध करणेत येते मात्र जाहिरातीत नमुद जात प्रवर्गानुसार वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत नाहीत.

सबब, खालील "अ" व "ब" प्रस्ताव सादर केले आहेत.

अ) डॉ. निखीला अंकुर पाचांणी, गुजरात, यांनी कार्डीओलॉजीस्ट पदावर सेवा करणेकामी अर्ज केला आहे. डॉ. पाचाणी यांचे शिक्षण एमबीबीएस, एमडी (मेडिसीन), डीएम (कार्डीयाक) असे आहे. त्यानुसार त्यांनी एमबीबीएस, एमडी (मेडिसीन) व डीएम (कार्डीयाक) चे पदवी प्रमाणपत्र व रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र सादर केलेले आहे. सदर प्रमाणपत्र प्र. वैद्यकीय संचालक व उपवैद्यकीय संचालक यांनी त्यांचे सत्यप्रतीवरुन तपासले आहे.

मंजुर आकृतीबंधात कार्डीओलॉजीस्ट पदासाठी डीएम/ डीएनबी ही शैक्षणिक पात्रता दर्शविलेली आहे. त्यानुसार डॉ.निखीला पाचाणी यांची शैक्षणिक पात्रता असल्याने त्यांना कार्डीओलॉजीस्ट या पदावर एक वर्ष किंवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात Ad hoc बेसिस वर नेमणुक देवुन त्यांना डॉ. जैन यांचेप्रमाणे रु. १,५०,०००/- मासिक एकत्रित मानधन देता येईल.

ब) उपरोक्त नमुद केलेले डॉ.धिरज मोरे यांनी दि. १०/१०/२०१५ रोजीचे अर्जान्वये वेतन वाढवून मिळणेबाबत विनंती केली आहे. डॉ.धिरज मोरे यांना सध्या रु. ६१,०००/- इतकेच मासिक मानधन देण्यात येत आहे मात्र त्यांचे इतकीच शैक्षणिक पात्रता व कामकाज असलेल्या डॉ.जैन यांना मात्र रु. १,५०,०००/- एकत्रित मासिक मानधन देण्यात येत आहे. डॉ.मोरे यांनी रुग्णालयाचे अडचणीच्या काळात दिलेली सेवा विचारात घेता डॉ.धिरज मोरे यांचेप्रमाणेच मासिक एकत्रित मानधन रुपये दीड लाख देता येईल, असे नम्र मत आहे.

उपरोक्त "अ" व "ब" प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.६२५ - **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील अ मध्ये नमुद केलेल्या डॉ.निखीला अंकुर पाचाणी, गुजरात यांच्या अर्जाचा व कार्डीओलॉजीस्ट पदासाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक पात्रतेचा विचार करता, त्यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्डीओलॉजीस्ट या पदावर एक वर्ष किंवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात Ad hoc बेसिसवर रु. १,५०,०००/- मासिक एकत्रित मानधनावर नेमणुक करण्यात यावी.**

**तसेच, ब मध्ये नमुद डॉ.धीरज मोरे यांनी मासिक मानधन वाढ मिळणेबाबत केलेली विनंती संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे निदर्शनास आणून द्यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०८** **श्री साईबाबा रुग्णालयातील प्रस्तावित Neuro ICU व SICU साठी आवश्यक असलेले मनुष्यबळ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१२/०६/२०१४ रोजीचे निर्णय क्र. ५२५ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटल मधील न्युरो ओटीतील रिकव्हरी रुम तसेच आर्थो ओटीतील रिकव्हरी रुम व Minor ओटी हे दोन्ही विभाग एकत्रित करुन तेथे १० ते १२ बेडचे न्युरो आयसीयु व सर्जीकल आयसीयु बनविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार आर्थो ओटी, रिकव्हरी रुम व Minor ओटी हे दोन्ही विभाग एकत्रित करण्याची कार्यवाही बांधकाम विभागा मार्फत पुर्ण झालेली आहे. तसेच सध्या मशिनरी खरेदी बाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच या कामी आरएमओ-०८, परीसेविका-०२, परीचारीका-३०, वार्डबॉय-०८, आया-०८, स्वीपर-०८ इतक्या मनुष्यबळाची आवश्यकता आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त् व्यवस्था शिर्डीच्या आस्थापनेवर साईबाबा रुग्णालयातील पदांचा आकृतीबंध शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मत्रांलय मुबई दि.०७/०८/२००९ अन्वये मंजुर आहे. सदरचा आकृतीबंध मंजुरझाला त्यावेळी साईबाबा हॉस्पिटलमधील बेडची संख्या २०० इतकी होती. त्यानंतर नव्याने न्युरो ओटी, सिव्हीटीएस ओटी-२, सिआरयु-३ हे विभाग कार्यरत करण्यात आलेले असुन सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमधील बेडची संख्या २४२ इतकी पर्यंत वाढलेली आहे. त्यामुळे सध्या असलेले कर्मचारी वर्ग आपुरा पडत असुन उपरोक्त विषयाकामी खाली तक्तात मागणी या शीर्षकाखाली नमुद केल्या प्रमाणे कर्मचा-यांची आवश्यक्ता आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल मंजुर आकृतीबंधातील मंजुर पदे व मागणी खालीप्रमाणे-

| अनं. | पदनाम | मंजुर पदे | | | कार्यरत | | | रिक्तपदे | | | मागणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ |
| ०१ | निवासी वैद्यकिय अधिकारी | ४० | ०० | ४० | २८ | ०२ | ३१ | १२ | -०२ | ०८ | ०८ |
| ०२ | परिसेविका | २१ | ०० | २१ | १४ | ०० | १४ | ०७ | ०० | ०७ | ०२ |
| ०३ | परिचारीका | १६० | ४० | २०० | १०२ | ९८ | २०० | ५८ | -५८ | ०० | ३० |
| ०४ | वॉर्डबॉय /मदतनीस | १३ | ७२ | ८५ | १९ | ७० | ८९ | -०६ | ०२ | -०४ | ०८ |
| ०५ | आया | ०८ | ३२ | ४० | ०५ | ५३ | ५८ | ०३ | -२१ | -१८ | ०८ |
| ०६ | स्विपर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०८ |
| | | | | | | | | | | एकूण- | ६४ |

उपरोक्त तक्तात दर्शविलेल्या परीसेविका या पदावर सेवाजेष्टतायादी नुसार ०२ परीचारीकांची प्रभारी परीसेविका म्हणुन नेमणुक करता येईल तसेच निवासी वैद्यिकय अधिकारी, परीचारीका, वार्डबॉय, आया, स्विपर यांची नेमणुक संस्थानला कत्रांटी कर्मचारी पुरविणा-यां कत्राटदारा मार्फत कंत्राटी (आऊटसोर्स) पध्दतीने घेण्यास व याकामी येणा-या अंदाचे मासिक रक्कम रु. ८,९८,९७२/- खर्चास मान्यता असावी सदरचा खर्च रक्कम रु. दहा लाखांच्या आतील असल्याने मा. उच्च न्यायालयाचे मान्यतेची आवश्यकता नाही असे नम्र मत आहे.

तथापी उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निवासी वैद्यकिय अधिकारी, परीचारीका, वार्डबॉय, आया, स्विपर यांची नेमणूक संस्थानला कत्रांटी कर्मचारी पुरविणा-यां कत्रांटदारा मार्फत कंत्राटी (आऊटसार्स) पध्दतीने घेणेकामी मात्र मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणे कामी निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.६२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील नवीन Neuro ICU व SICU विभाग सुरु करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेले मनुष्यबळ कंत्राटी (आऊटसार्स) पध्दतीने घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेत येऊन, नवीन ठेकेदाराची नेमणूक करणेत यावी. मात्र तत्पुर्वी याबाबत संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०९** **दि.२५.१२.२०१० चे जाहिरातीनुसार स्टाफ नर्स भरती प्रक्रियेतील गैरप्रकाराची चौकशी करणेबाबतचा श्री.गोवर्धन जानकू सिनारे यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री.गोवर्धन जानकु सिनारे यांनी वेळोवेळी मा अध्यक्ष सो,मा जिल्हाधिकारी सो, अहमदनगर व मा कार्यकारी अधिकारी सो यांचेकडेस अर्ज करुन संन २०१० च्या जाहिरातीनुसार स्टाफनर्स भरती प्रक्रियेत गैरकारभार झालेबाबत म्हटले आहे तसेच काही अर्जामध्ये सदर प्रकरणाची चैकशी करावी असेही म्हटले आहे. आता त्यांनी पुन्हा दि. १७/११/२०१५ रोचीचे अर्जान्वये दि. २५/१२/२०१० च्या जाहिरातीनुसार स्टफनर्स भरती प्रक्रियेतील गैरप्रक्राराची चौकशी करणेबाबत मागणी केली आहे सदर अर्जावर मा अध्यक्ष सो यांनी “EO to putup before Committee” असे निर्देश दिले आहेत. तसेच श्री गमे सो यांनी “कृपया मा का अ सो यांचे निर्देशाप्रमाणे चौकशी करुन संबंधीतांचे लेखी जबाब नोंदवुन मा व्य स सभेपुढे सादर करावयाचा प्रस्ताव तयार करणेत यावा ” असे निर्देश दिले आहेत.

सन २०१० चे स्टाफनर्स भरतीप्रक्रीयेची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

दि. ०७/०८/२०१० रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ६६१ खालीलप्रमाणे झाला आहे.

“१००बिंदू नामावलीप्रमाणे प्रवर्गातील व इतर वर्गवारीमधील दोनही हॉस्पिटलमधील परिचारीकांची रिक्त पदे भरणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवुन अर्ज मागणी करणेत यावी असे ठरले.”

उपरोक्त निर्णयास अनुसरुन रुग्णालयासांठी बिंदु नामावलीनुसार जात प्रवर्गाप्रमाणे आवश्यक तेवढया एकुण ६७ परिचारीकांची पदे भरणेकरीता अर्ज मागविणेसाठीदि. २५/१०/२०१० रोजी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. सदर जाहिरातीनुसार आलेल्या अर्जातील पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा घेऊन परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची त्याचप्रमाणे संस्थानचे दोन्ही रुग्णालयामध्ये ११ महिने कालावधीसाठी नेमणूक दिलेल्या २३ स्टार्फनर्स यांचीही दि.२७-२८ एप्रिल २०११रोजी प्रात्यशिक परिक्षा घेण्यात आली.

दि. १२/०६/२०११ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ३५९ खालील प्रमाणे आहे.

”दि.२७-२८/०४/२०११ रोजी परिचारक / परिचारीका भरतीकरीता घेण्यात आलेल्या प्रात्यक्षिक परिक्षेसाठी प्रवर्गानुसार हजर पात्र उमेदवारांच्या मुलाखती तीन टप्प्यात दि.२२/०६/२०११,दि,२८/०६/२०११ व दि. २९/०६/२०११ रोजी मा उपसमितीसमोर घेण्यात याव्यात व निवड केलेल्या उमेदवारांना नेमणूक आदेश देण्यात यावे असे ठरले.”

उपरोक्त निर्णयानुसार दि.२२/०६/२०११,दि,२८/०६/२०११ व दि. २९/०६/२०११ रोजी एकुण १७८ उमेदवारांना वैद्यकीय उपसमितीसमोर मुलाखतीसाठी बोलविणेत आले होते. त्यानंतर मुलाखतीस हजर असलेल्या उमेदवारांच्या लेखी, प्रात्यक्षिक व मुलाखतीचे गुणांनुसार याद्या तयार करुन तसा प्रस्ताव दि. २८/०८/२०११ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र ६६६ खालीलप्रमाणे झालेला आहे.

१) श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवरील सर्व पदांची बिंदु नामावली तयार करुन विभागीय आयुक्त नाशिक विभाग, मागास प्रवर्ग कक्ष यांचेकडून बिंदूनामावली तपासून घेण्यात यावी व तोपर्यंत परिचारक / परिचारीका या स्थायी पदावर अनुशेषाने नेमण्याची प्रक्रिया स्थगित करण्यात यावी.

२) प्रात्याक्षिक परिक्षा व मुलाखतीचे गुणवत्ता यादीतील मेरीटनुसार (प्रवर्गनिहाय पहिले) खालील १८ उमेदवारांची कंत्रादारामार्फत कंत्राटी पध्दतीने परिचारक / परिचारीका या पदावर घेणेकरीता निवड करण्यात आलीं.

| अ.नं | नाव | प्रवर्ग | एकूण |
|---|---|---|---|
| ०१ | कु.रेखा लक्ष्मण सुर्यवंशी | अनुसूचीत जमाती (एस.टी) | २ |
| ०२ | श्री.किरण माधव बर्डे | | |
| ०३ | श्री. सुनिल व्दारकानाथ चव्हण | विमुक्त जाती (व्ही.जे) | १ |
| ०४ | श्री. अर्चना अशोक दुबे | भटक्या जमाती-ब (एनटी-बी ) | २ |
| ०५ | श्री. तृप्ती जनार्दन चव्हाण | | |
| ०६ | श्री. संदीप वसंत लबडे | भटक्या जमाती-क (एनटी-सी) | २ |
| ०७ | श्री. सुनिल बाबुराव खेमनार | | |
| ०८ | श्री. रामेश्वर विष्णुराव पाळवंदे | भटक्या जमाती-क (एनटी-डी) | १ |
| ०९ | श्री. अभिजीत लक्ष्मण वासके | विशेष मागास प्रवर्ग (एसबीसी) | १ |
| १० | श्री.नवनाथ चांगदेव गायकवाड | इतर मागास प्रवर्ग (ओबीसी ) | ९ |
| ११ | श्री सुचित्रा जॉन दिवे | | |
| १२ | श्री. पंकज महिपते नेहे | | |
| १३ | कु. मंजिरी नारायणराव भास्कर | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | कु. कुमूदिनी डॅनियल कदम | | |
| १५ | श्री. अजिक्य संपत गायकवाड | | |
| १६ | श्री भावेश शामराव आहेर | | |
| १७ | श्री. शंकरानंद अशोक आहोळ | | |
| १८ | श्री. गोवर्धन जानकु सिनारे | | |

उपरोक्तप्रमाणे प्रवर्गनिहाय १८ उमेदवारांची परिचारक /परिचारीका या पदासाठी निवड करण्यात आलेली आहे.

तसेच उपरोक्त उमेदवारांव्यतिरिक्त आणखी परिचारक / परिचारीकांची आवश्यक्ता भासल्यास वैद्यकीय संचालक, रुग्णालये यांनी मुलाखतीस उपस्थित असलेल्या उमेदवारांमधून योग्य उमेदवारांची निवड करावी.

उपरोक्त निवडकरण्यात आलेल्या सर्व उमेदवारांना कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने परिचारक / परिचारीका या पदावर घेण्यात यावे.

३) सध्या ११ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या २३ परिचारक / परिचारीका यांचे पैकी श्री चांगदेव पंढरीनाथ काळे यांचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त असल्याने त्यांना पुढील मुदतवाढ देऊ नये.
तसेच श्रीमती सरीना एडवर्ड आढाव, श्रीमती शुभदा राफायल गायकवाड, श्रीमती सुनिता शिवशंकर कुंभार यांचे काम असमाधानकारक आहे, असा वैद्यकिय अधिक्षक/ वैद्यकिय संचालक यांनी अहवाल दिलेला असल्यायने त्यांना पुढील मुदतवाढ देऊ नये. उर्वरीत इतर १९ परिचारक/ परिचारीका यांना पुढील मुदतवाढ देण्यात यावी.

४) संध्या कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारमार्फत व ११ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या व नव्याने घेण्यात येणा-या परिचारक/ परिचारीका यांना प्रतिमहा रु. ११,०००/- वेतन देण्यात यावे, असे ठरले.

निर्णय क्र६६६ मध्ये नमुद केलेप्रमाणे दि. २६/०६/२०१४ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेत पुन्हां परिचारक/ परिचारीका यांच्या नेमणूकीबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला होता त्यास निर्णय क्र ५६१ अन्वये मान्यता देण्यात आली होती.

१) महाराष्ट्र शासनाचे मंजुर आकृतीबंधानुसार स्थायी परिचारक/ परिचारीका यांची यादी बिंदू नामावलीनुसार संस्थानचे मागास वर्ग कक्ष (सामान्य प्रशासन विभाग) यांचे मार्फत विभागीय आयुक्त नाशिक विभाग मागास प्रवर्ग कक्ष यांचेकडून तपासून घेणेस
२) उपरोक्त् प्रमाणे तपासणी झालेनंतर भरतीबाबतचा प्रस्ताव मा मुंबई उच्च् न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर सादर करणेस
३) मा उच्च न्यायालयाच्या दि. ०२/०८/२०१३ रोचीचे आदेशानुसार परिचारक/ परिचारीका यांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेस तसेच
४) कायम नेमणूकीबाबत नंतर विचार करणेबाबत

निर्णय क्र.६६६ मध्ये नमुद केलेल्या १८ उमेदवारांमध्ये श्री गोवर्धन जानकु सिनाने यांचेही नावाचा समावेश असल्याने त्यांना कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर हजर होणेसाठी कळविणेत आले होते. त्याप्रमाणे ते दि. २३/०९/२०११ रोजी कामावरही हजर झालेले होते. मात्र त्यानंतर ते दि. २८/११/२०११ पासुन कामावरुन विनापरवानगी गैरहजर होते. त्यानंतर त्यांनी प्रशासनाशी कोणत्याही प्रकारचा संपर्क न ठेवल्याने त्यांचे नाव हजेरीपटावरुन कमी करणेत आले होते.

श्री सिनारे यांचे नाव हजेरीपटावरुन कमी केल्याने दि. २६/०६/२०१४ रोजीच्या मा त्रिसदस्य समितीसमोर सादर केलेल्या प्रस्तावात ४७ जंणाचे यादीत (११महिने कालावधीसाठी कार्यरत असलेले १५ व कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेले ३२ अशा एकुण ४७ परिचारक / परिचारीका ) त्यांचे नावाचा समावेश करणेत आलेला नाही.

निर्णय क्र ५६१ नुसार दोन्ही रुग्णालयामध्ये स्थायी स्वरुपात आजतागायत परिचारीकांची भरती झालेली नसल्याने दि. २५/१२/२०१० च्या जाहिरातीनुसार भरतीमध्ये गैरप्रकार झाल्याचा प्रश्नच उदभवत नाही.
श्री सिनारे यांनी याकामी वेळोवेळी अर्ज केलेले आहेत. सदरच्या अर्जाबाबत दि. १७/१०/२०१४ रोजी कार्यालयीन टिपणी ठेवुन त्यात वस्तुस्थिती नमुद करुन वरिष्ठांचे निर्देशानुसार ते दप्तरी दाखल केलेले आहेत. श्री सिनारे यांनी माहिती अधिकार अंतर्गतही माहिती मागितल्याने त्यांना प्रशासनाकडून दि. १८/०९/२०१४ चे पत्रान्वये माहिती पुरविणेत आलेली आहे.

श्री सिनारे हे स्वतः विनापरवानगी गैरहजर राहील्याने त्यांचे नाव हजेरीपटावरुन कमी केल्याने त्याग्यातुन ते वेळोवेळी अर्ज करुन वरिष्ठांची दिशाभुल करीत आहेत त्यामध्ये संस्थान प्रशासनाचा तसेच वरीष्ठ अधिका-यांचा बहुमुल्य वेळ विनाकारण वाया जात आहे.

अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.६२७** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, दि.२५.१२.२०१० चे जाहिरातीनुसार स्टाफ नर्स भरती प्रक्रियेतील गैरप्रकाराची चौकशी करणेबाबतचा श्री.गोवर्धन जानकू सिनारे यांचा अर्ज दप्तरी दाखल करणेत यावा.**
(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१०** **संस्थान रुग्णालयामधील व्हिजीटींग डॉक्टरांच्या मानधन नियमावलीबाबत.**
**निर्णय क्र.६२८** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**
(कार्यवाही वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.११** **संस्थान रुग्णालयात कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने बीएएमएस वैद्यकीय अधिका-यांच्या नेमणूका करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान रुग्णालये हे साईबाबांच्या सेवेचे प्रतिक म्हणून ओळखले जाते. दिवसेंदिवस रुग्णालयाचा नावलौकिक वाढतच चालला आहे. रुग्णांच्या संख्येचा विचार करता गरजेनुसार वेळोवेळी रुग्णालयामध्ये नवीन विभाग चालु करणेत आलेले आहेत किंबहुना येथुन पुढेही आवश्यकता भासल्यास आणखी विभाग चालु करण्याचा मानस आहे. सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये पुढीलप्रमाणे विभागकार्यरत आहेत. कार्डीयाक, कार्डीओथोरॅसीक, मेडीसीन, जनरल सर्जरी, आर्थोपेडिक, न्युरोसर्जरी, युरोसर्जरी, रेडिओलॉजी, डायलेसीस, इकोकार्डीओग्राफी व टीएमटी, अपघात विभाग, फस्ट एड, फिरते वैद्यकीय पथक, कार्डीयाक ॲम्ब्युलन्स. तसेच श्री साईनाथ रुग्णालयात मेडिसीन, जनरल सर्जरी, आर्थोपेडिक, रेडिओलॉजी, अपघात विभाग, फस्ट एड, फिरते वैद्यकीय पथक, ॲम्ब्युलन्स, रक्तपेढीची शिबीरे, वृद्धाश्रमातील कायमस्वरुपी भेटी इ.मार्फत रुग्णांची सेवा केली जात आहे.

उपरोक्त विविध विभागातील रुग्णांचे सेवेसाठी तज्ञ वैद्यकीय अधिका-यांचे मार्गदर्शनाखाली निवासी वैद्यकीय अधिकारी (आरएमओ) सिस्टर इन्चार्ज, स्टाफनर्स, वॉर्डबॉय / आया इ. कर्मचारी अहोरात्र काम करत आहेत.

सन २००९ सालचे श्री साईबाबा व श्री रुग्णालयासाठी मंजुर आकृतीबंधानुसार निवासी वैद्यकीय अधिकारी/ आरएमओ (एमबीबीएस) पदाचा सद्यस्थिती अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| रुग्णालय | मंजुर पदसंख्या | स्थायी भरलेली पदे | कंत्राटी भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| श्री साईबाबा | ४० | २८ | ०२ | १० |
| श्री साईनाथ | १६ | १० | ०० | ०६ |
| एकूण | ५६ | ३८ | ०२ | १६ |

संस्थान रुग्णालयाचे मंजुर आकृतीबंधामध्ये एमबीबीएस शैक्षणिक पात्रता असलेले एकूण ५६ पदे मंजुर असुन सध्या फक्त ४० निवासी वैद्यकीय अधिकारी / आरएमओ कार्यरत आहेत.

परंतु, श्री साईबाबा हॉस्पिटलकडे स्थायी स्वरुपात भरलेल्या २८ आरएमओ पैकी १ अध्ययन रजेवर, १ राजीनामा दिल्याने तर १ विनापरवानगी गैरहजर असल्याने प्रत्यक्षात २५ आरएमओ कार्यरत आहेत.

तसेच श्री साईनाथ रुग्णालयाकडील स्थायी स्वरुपात भरलेल्या १० आरएमओपैकी १ अध्ययन रजेवर, १ राजीनामा दिल्याने व १ रक्तपेढी कडे असल्याने तसेच ३ आरएमओ ओपीडीमध्ये विशेष रुग्ण तपासणीचे (अस्थिरोग, नेत्ररोग व स्त्रीरोग) काम करत असल्याने प्रत्यक्षात ४ आरएमओ कार्यरत आहेत.

रुग्णालयात तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली रुग्णांना चोवीस तास तात्काळ सेवा देणेकामी निवासी वैद्यकीय अधिकारी यांची नितांत आवश्यकता असते. मात्र वेळोवेळी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुनही एमबीबीएस शैक्षणिक पात्रता असलेले डॉक्टर्स मिळत नाहीत. महतप्रयासाने जे निवासी वैद्यकीय अधिकारी मिळताता वे पुढील शिक्षणासाठी राजीनामे देऊन निघुन जातात. परिणामी इतर डॉक्टरांवर अतिरिक्त कामकाजाचा बोजा पडतो व रुग्णांना तात्काळ व चांगली सेवा देणे जिकीरीचे ठरते.

सण-उत्सवाचे वेळी शिर्डीमध्ये भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी वाढत असते अशा वेळी ठिकठिकाणी फस्ट एड सेंटर, ॲम्ब्युलन्स इ. सेवा उपलब्ध करावी लागते. अशावेळी उपलब्ध आरएमओंना अतिरिक्त वॉर्डची जबाबदारी देऊन त्यातुनच काही आरएमओंची ड्युटी अशा ठिकाणी लावण्यात येते. याशिवाय आता मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी २ मोबाईल व्हॅन सुरु करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. मात्र सध्या एकच मोबाईल व्हॅन क्लिनीक चालु असुन तीही कधीकधी डॉक्टरांच्या अभावी बंद ठेवावी लागते.

अ) श्री साईनाथ रुग्णालयात खालीलप्रमाणे आरएमओ/ वैद्यकीय अधिका-यांची आवश्यकता असलेबाबत वैद्यकीय अधिक्षक यांनी कळविले आहे.

| अ.नं. | वॉर्ड/ ओपीडी | बेडसंख्या | आवश्यक वैद्यकीय अधिकारी | |
|---|---|---|---|---|
| | | | बीएएमएस | एमबीबीएस |
| ०१ | आयसीयु | ०८ | ------ | ३१+= ४ |
| ०२ | सर्जरी वॉर्ड – १ | ५५ | ३१+= ४ | ------- |
| ०३ | सर्जरी वॉर्ड – २ | ३५ | | -------- |
| ०४ | आर्थोपेडिक वॉर्ड | ४७ | ३१+= ४ | ------- |
| ०५ | मेल मेडिसीन | २८ | ३१+= ४ | -------- |
| ०६ | फिमेल मेडिसीन | ३५ | | |
| ०७ | गायनिक | ३२ | ------- | ३१+= ४ |
| ०८ | बालरुग्ण विभाग | १५ | | --------- |
| ०९ | ईएनटी | २० | ३१+= ४ | -------- |
| १० | ऑप्थल्मिक | ३० | | -------- |
| ११ | एसपीआर | १० | | -------- |
| १२ | प्रथोमचर केंद्र | | २+१= 3 | |
| १३ | फिरते वैद्यकीय पथक | | २१+= 3 | -------- |
| १४ | अपघात कक्ष | | -------- | ३ १+= ४ |
| | | एकूण- | २२ | १२ |

आ) श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये खालीलप्रमाणे वैद्यकीय अधिका-यांची आवश्यकता आहे.

| अ.नं. | वॉर्ड ओपीडी / | बेडसंख्या | आवश्यक वैद्यकीय अधिकारी | |
|---|---|---|---|---|
| | | | बीएएमएस | एमबीबीएस |
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| ०१. | सीव्हीटीस | | ------- | ०२ |
| ०२. | कार्डीयाक | | -------- | ०२ |
| ०३. | मेडिसीन | | ०२ | -------- |
| ०४. | सर्जरी | | ०१ | ------- |
| ०५. | आर्थो | | ०१ | ------ |
| ०६. | कॅज्युल्टी | | ०३०१+ | -------- |
| ०७. | आयसीयु | | ---------- | ०४ |
| ०८. | जीआयसीयु | | ---------- | ०४ |
| ०९. | सीआरयु १ - | | ------------ | ०४ |
| १०. | सीआरयु – ३ | | ----------- | ०४ |
| ११. | मेल जनरल वॉर्ड | | ०१ | ------ |
| १२. | फिमेल जनरल वॉर्ड | | ०१ | -------- |
| १३. | फस्ट एड सेंटर | | ०३०१+ | ------- |
| १४. | मोबाईल व्हॅन | | ०२०१+ | --------- |
| १५. | कार्डीयाक ॲम्ब्युलन्स – २ | | -------- | ०६०१+ |
| १६. | सीआरयु – २ | | ------ | ०१ |
| १७. | सीआरयु – ४ | | --------- | ०१ |
| १८. | टीएसआर, एसपीआर, डिलक्स | | ०१ | --------- |
| | | एकूण | १८ | २९ |

आकृतीबंधानुसार वेळोवेळी मोठ्या प्रमाणात खर्च करुन वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुनही एमबीबीएस शैक्षणिक पात्रता असलेले निवासी वैद्यकीय अधिकारीशैक्षणिक पात्रता असलेले निवासी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत नसल्याने यावर उपाय म्हणून उपरोक्त “अ” व “ब” मधील स्तंभ क्र. ४ मध्ये नमुद केलेप्रमाणे एकुण २२+१८= ४० बीएएमएस वैद्यकीय अधिका-यांची नेमणूक करणे अत्यंत गरजेचे वाटत आहे.

तथापि, रुग्णालयाचे मंजुर आकृतीबंधामध्ये बीएएमएस डॉक्टरांच्या पदांचा समावेश नाही तसेच दि. ०९/०८/२००९ चे सभेतील निर्णय क्र.७२६ नुसार श्री साईबाबा सुपरस्पेशियालीटी इंटेनसिव्ह केअर व सुपर स्पेशियालिटी चे पेशंटस ॲडमिट असतात. त्यामुळे बीएएमएस आरएमओ नियुक्त करु नये व प्रस्ताव स्थगित ठेवावा, असे ठरले आहे.

परंतु, सेंट्रल कॉन्सिल ऑफ इंडिया मेडिसीन, दिल्ली चे नं. ८५/९६ दि. ३०/१०/९६ रोजीचे नोटिफिकेशन नुसार आयुर्वेद शैक्षणिक पात्रता असणा-या डॉक्टरांना ॲलिओपॅथिक प्रॅक्टीस करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यानुसार बीएएमएस शैक्षणिक पात्रता असलेल्या डॉक्टरांना महाराष्ट्र शासनाने शासकीय रुग्णालयांमध्ये कंत्राटी पद्धतीने नेमणूकही दिलेल्या आहेत. (सोबत नमुन्यादाखल नेमणूक आदेशची प्रत जोडली आहे.)

त्याचप्रमाणे, संस्थानला कुशल/ अकुशल कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत बीएएमएस शैक्षणिक पात्रता असलेल्या वैद्यकीय अधिका-यांची नेमणूक केल्यास संस्थानचे तिजोरीवरही भार कमी पडेल तसेच असे वैद्यकीय अधिकारीही मोठ्या प्रमाणात कायम उपलब्ध राहतील असे मत आहे. त्यासाठी त्यांना महाराष्ट्र शासन नियमाप्रमाणे प्रत्येकी रु. १६,२००/- एकत्रित मासिक मानधन देता येईल. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे ४० बीएएमएस वैद्यकीय अधिका-यांना प्रत्येकी रु. १६,२००/- एकत्रित मानधन दिल्यास त्यांचा एकूण ६,४८,०००/- इतका मासिक खर्च येईल त्यासाठी मा.उच्च न्यायालयाची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही असे मत आहे. बीएएमएस वैद्यकीय अधिका-यांच्या मानधनाच्या बाबतीत शासन नियमाप्रमाणे वेळोवेळी होणा-या बदलाप्रमाणे त्यांना मानधन देता येईल असे वाटते.

तरी, संस्थानला कुशल/ अकुशल कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत बीएएमएस शैक्षणिक पात्रता असलेले ४० निवासी वैद्यकीय अधिकारी / आरएमओ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पद्धतीने ११ महिने कालावधीसाठी टिपणी सादर केली होती.

सदर विषयाबाबत मा. उपकार्यकारी अधिकारी यांनी रुग्णालयाचे कामकाजासंबंधी दि. १०/१२/२०१५ रोजी झालेल्या सभेत सुपर स्पेशियालिटी हॉस्पिटलकडून माहिती घेऊन तपशिलासह फेरटिपणी सादर करणेबाबत निर्देश दिले होते. सदरचे निर्देशाप्रमाणे उपवैद्यकीय संचालक यांनी दि. १९/१२/२०१५ अन्वये अहवाल सादर केलाआहे. सदर अहवालात त्यांनी पुणे येथील दिनानाथ मंगेशकर, इनलेक्स बुद्रानी व रुबी हॉस्पिटलमधील कामकाजाविषयी माहिती सादर केली आहे. (सोबत प्रत जोडली आहे. या तिनही हॉस्पिटलमध्ये बीएएमएस डॉक्टरांना नेमणूक दिलेली असुनत्यांना कन्सल्टंट सहाय्यक म्हणून काम पहाणेस सांगणेत येते तथापि, बीएएमएसआयसीयु, ओटी, ॲम्ब्युलन्स, कॅज्युअल्टी या ठिकाणी ड्युटी दिली जात नाही व त्यांना साधारणतः रु. २०,०००/- पर्यंत वेतन दिले जाते.

सबब, पूर्वी नमुद केलेप्रमाणे ४० बीएएमएस वैद्यकीय अधिका-यांना प्रत्येकी रु. १६,२००/- मानधन दिल्यास त्यांचा एकूण रु. ६,४८,०००/- इतका मासिक खर्च येईल. तसेच त्यांचे मानधन बाबतीत शासननियमाप्रमाणे वेळोवेळी होणा-या बदलाप्रमाणे त्यांना मानधन देता येईल.

तथापि, संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत कंत्राटी (आऊटसोर्स) पद्धतीने बीएएमएस डॉक्टरांची नेमणूक करणेसाठी मा. उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करावे लागेल मा. न्यायालयाकडून मंजूरी मिळाल्यानंतर याबाबत शासनासही माहिती कळविता येईल.

निर्णय क्र.६२९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयासाठी बीएएमएस वैद्यकीय अधिकारी मिळणेबाबत डॉ.प्रविण सिनगारे, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य याचेबरोबर पत्रव्यवहार झालेला आहे. परंतु आजतागायत त्यांचेकडून बीएएमएस वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होऊ शकलेले नाहीत. याकरीता डॉ.सिनगारे यांचेकडे प्रत्यक्ष जाऊन पाठपुरावा करणेत यावा. तसेच परिसरातील मोठया वैद्यकिय महाविद्यालयामधील बीएएमएस वैद्यकीय अधिकारी मिळणेबाबत त्यांचेबरोबर पत्रव्यवहार करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.१२ **संस्थान रुग्णालयातील आवश्यक वैद्यकीय अधिका-यांची पद भरती करणेकामी जाहिरात प्रसिध्द करणे बाबत.**

प्रस्ताव- शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का. सोळा मंत्रालय, मुंबई दि.०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटलमधील संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील मंजूर करण्यात आलेला आहे. रिक्त पदांची संख्या जास्त असल्यामुळे रुग्णांच्या सेवेत अडचणी व अडथळे निर्माण होतात. अपेक्षेप्रमाणे रुग्णांना चांगली सेवा देणे काही वेळेस शक्य होत नाही. मात्र मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांनी पीआयएलनं. १८/२०११ मध्ये दि. १६/१०/२०१२ रोजी संस्थानच्या व्यवस्थापन मंडळाने संस्थानमध्ये नोकरभरती करण्यापूर्वी मा. न्यायालयाची परवानगी घेणे आवश्यक आहे असा आदेश दिलेला आहे.

रुग्णालयातील आवश्यक रिक्त पदांची भरती करणेकामीसिव्हील ॲप्लीकेशन नं. ९४१९/२०१३ मा. न्यायालयात दाखल केले होते त्यावर दि.१३/०८/२०१३ रोजी मा.न्यायालयाने रिक्त पदांवर भरती करणेसाठी विहीत पद्धतीचा अवलंब करावा. उमेदवारांच्या मुलाखती घेणेसाठी मा.न्यायालयाने मा.संचालक, आरोग्य सेवा महाराष्ट्र राज्य, मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य व व्यवस्थापनाचा त्या क्षेत्रातील तज्ञ प्रतिनिधी अशा तीन सदस्यांची समिती गठीत करुन त्यांचेसमोर उमेदवारांच्या मुलाखती घेणेत याव्यात असा आदेश दिलेला आहे. मात्र त्यातील काही आवश्यक पदे रिक्त राहिल्याने पुन्हा मा.त्रिसदस्य समिती दि. १८/०२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६७ नुसार मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर सिल ॲप्लीकेशन नं. ३९३९/२०१५ दाखल करणेत आले होते. त्यावर दि. १७/०४/२०१५ रोजी मा. न्यायालयाने खालीलप्रमाणे निर्देश आदेश दिला होता.

"सिव्हील ॲप्लीकेशनमधील परिच्छेद क्र. ६ मधील अ.नं. ०१ ते १९ ची पदे भरणेकामी डीन, गव्हर्नमेंट मेडीकल कॉलेज, गव्हर्नमेंट मेडीकल कॉलेजमधील संबंधीत विषयातील तज्ञ व सिव्हील सर्जन अहमदनगर या तीन सदस्यांचीसमिती गठीतकरुन त्यांचेसमोर मुलाखती घेणेत याव्यात."

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्णयानुसार सिव्हील ॲप्लीकेशन नं. ३९३९/२०१५ चे मधील पॅरा नं. ६ मधील अ.नं. ०१ ते १९ मध्ये दर्शविणेत आलेली पदे (परिशिष्ट अ) तसेच सिव्हील ॲप्लीकेशन नं. ९४१९/२०१३नुसार दिलेल्या जाहिरातीतील राहिलेली रिक्त पदे (परिशिष्ट ब) अशा एकूण ३८ पदांवर भरती करणेकामी दि. १८/०६/२०१५ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करणेत आली. जाहिरातीनुसार आलेल्या अर्जदारांचीददमा. न्यायालयामे नियुक्त केलेल्या समितीने दि. ०९/०८/२०१५ रोजी मुलाखती घेतल्या व मुलाखतीचा अहवाल बंद पाकीटात सिल करणेत आला. सदरचे बंद पाकीट दि. २०/०८/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत उघडणेत येऊन त्यावर निर्णय होऊन उमेदवारांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. (निर्णय क्र. २८५). संकेतस्थळावर प्रसिद्धकरण्यात आलेल्यायादीमधील अ. नं. २,४,५,६,७,८,१०,१२,१३,१५,१७, १९,२०,२१, २२, २३, २४, २५ व २७ या पदांसाठी योग्य व लायक उमेदवारमिळालेले नसल्यामुळे सदरहू पदे रिक्त ठेवण्यात यावीत तसेच अ.क्र. ३,९,११,१४,२६, ३०, ३१ व ३६ या पदांच्या काही तांत्रिकबाबींकरिता गोपनीयअहवाल शासनास पाठविणेकरिता मा. त्रिसदस्य समितीने निर्णय घेतला व तो पर्यंत सदर पदांच्या नेमणूकी विषयीचा निर्णय स्थगीत ठेवणेत आला व तसे संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आले.

संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या उमेदवारांना नेमणूक आदेश देण्यात यावा व ज्यांपदासाठी योग्यव लायक उमेदवार मिळाले नाहीत त्या पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करणेत यावी, असे ठरले.

तसेच वैद्यकीय अधिक्षक, नेत्ररोगतज्ञ, हिस्टोपॅथॉलॉजिस्ट, ज्यु.मायक्रोबायोलॉजिस्ट, ज्यु. रेडिओलॉजिस्ट, सीएमओ, सीएसएसडी टेक्निशियम पदांवर नियुक्ती झालेल्या वैद्यकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी कामावर हजर होणेबाबत अतिरिक्त अतिरिक्त कालावधीची मागणी केली होती. त्यास अनुसरुन दि. २९/०९/२०१५ रोजी प्रशासकीय टिपणीसादर करणेत आली होती. त्यावर ही बाब मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेसाठी दि. १९/१०/२०१५ रोजी सभाकामकाज विभागाकडे जमा केला होता.

यावर उपरोक्त नमुद केलेप्रमाणे अतिरिक्त कालावधीची मागणी मान्य करता येणारनाही व त्या पदांसाठी पुन्हाजाहिरात द्यावी अशी चर्चा मा. त्रिसदस्य समितीचे दि. १०/११/२०१५ रोजीचे सभेमध्ये झाली.

पुर्वी प्रसिद्ध करणेअगोदर संबंधीत पदांची जात प्रवर्गाची माहिती व जाहिरात द्यावयाचे पदांचा गोषवारा श्री. त्र्यं.अ.खैरे, लेखाधिकारी, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडून तपासून आणलेला आहे. तदनंतरच जाहिरात प्रसिद्ध करणेत आलेली होती.

तरी, मा.उच्च न्यायालयामार्फत अगोदरच मंजुरी मिळालेल्या रिक्त पदांची भरती करणेकामी सोबतचे परिशिष्ट अ आणि ब मध्ये नमुद केलेप्रमाणे देशातील प्रमुख शहरांमधील टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, महाराष्ट्र टाईम्स व सकाळ या वर्तमानपत्रांमध्ये त्यांचप्रमाणे अधिकृत संकेतस्थळावर तसेच विस्तृत स्वरुपात प्रसिद्धी मिळणेसाठी naukari.com या संकेतस्थळावरही जाहिरात प्रसिद्ध करणेस त्याकामी येणा-या खर्चासंसोबतचे नमुन्यात अर्जदारांची माहिती मागविणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.६३० **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयामध्ये आवश्यक असलेल्या वैद्यकीय अधिका-यांच्या पदांबरोबरच वैद्यकिय संचालक पद भरणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.१३ **श्री साई विभुती आरोग्य योजनेस (MOU) मसुद्यास मान्यता मिळणेबाबत.**

निर्णय क्र.६३१ **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षक)

---

विषय नं.१४ **एसएलपी नं.२९८७५/ २०१५ साखरबाई हरिभाऊ शेळके (मयत) करीता रजनी विश्वास जोगळेकर व इतर विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व इतर मध्ये वकिलपत्र देणेबाबत.**

प्रस्ताव- मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांचे कोर्टात एस.एल.ए. नं.२९८७५/२०१५ हे साखरबाई हरिभाऊ शेळके (मयत) करीता रजनी विश्वास जोगळेकर व इतर यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व इतर यांचे विरुध्द दाखल केले आहे.

प्रस्तुतचे एस.एल.पी. हे मौजे शिर्डी येथील स.नं. १४८/१ मधील क्षेत्र ४ हे. ५९ आर. संस्थानकरीता भूसंपादनाची कार्यवाही मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांचे मार्फत चालू आहे. त्याचे संदर्भात पिटीशनरने सदरचा एस.एल.पी. अर्ज दाखल केला आहे. यापुर्वी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीट औरंगाबाद यांचे कोर्टात रिट पिटीशन नं.३९०/२००२ दाखल करण्यात आले होते. त्यामध्ये अर्जदाराने सदरचे भूसंपादन करण्यात येवू नये, दि.२१/०९/२००० रोजीचे सेक्शन ४ चे नोटीफीकेशन व दि.०१/१०/२००१ रोजीचे सेक्शन ६ चे नोटीफीकेशन रद्द व्हावे, प्रस्तुतचे भूसंपादन जनतेच्या कामासाठी नाही. दि.०१/१०/२००१ चे नोटीफीकेशनला स्थगीती द्यावी. अशा आशयाची विनंती अर्जदाराने केली होती. त्यावर मा.उच्च न्यायालयाने दि. २५/०४/२०१४ रोजी खालील प्रमाणे आदेश करुन प्रकरण निकली काढले आहे.

The writ petition challenging the notification U/Sec. 4 and declaration U/Sec. 6 of the Land Acquisition Act 1894 is dismissed, however, it is clarified that the compensation shall be determined as per the provisions of the Act of 2013 relating to the determination of compensation. Rule accordingly disposed of. No costs.

उपरोक्त निर्णयाचे नाराजीने अर्जदाराने एस.एल. पी. नं. २९८७५/२०१५ मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी संस्थानचे वतीने मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे वकीलाची नेमणूक करावी लागणार आहे. मा. सर्वोच्च न्यायालयात संस्थानचे पॅनलवर वकीलाची नेमणूक केलेली नाही. यापुर्वी शिर्डी येथील मोफत स.नं. १ मधील दुकानदारांचे केस मध्ये ॲडव्होकेट श्री संजय खर्डे यांचे मार्फत १) ॲडव्होकेट श्री अरुण रामनाथ पेडनेकर , २) ॲडव्होकेट श्री अरविंद व्ही. सावंत, यांची नेमणूक करण्यात आली होती. सदरचे एस.एल.पी. मध्ये संस्थानचे वतीने कामकाज पहाणेकामी ॲडव्होकेट श्री संजय खर्डे यांची मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेवून नेमणूक करता येईल असे विधी विभागाचे मत आहे. व ॲडव्होकेट श्री संजय खर्डे यांचेशी चर्चा करुन मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विषया सादर करुन निर्णय घेणेबाबत दि. १७/११/२०१५ रोजी टिपणी सादर करण्यात आली होती.

प्रस्तुतचे मंजूर टिपणी नुसार दि. ०५/१२/२०१५ रोजी ॲडव्होकेट श्री संजय खर्डे यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा केली असता त्यांनी असे सांगीतले की, मी सध्या गव्हर्णमेंट प्लिडर नसल्याने सदरचे केस मध्ये कामकाज पहाण्यास मला कोणतीही अडचण नाही, माझ्या नावाचे वकीलपत्र दिल्यास प्रस्तुत केस मध्ये कामकाज पहाण्यास तयार आहे, असे त्यांनी सांगीतले. ॲडव्होकेट श्री संजय खर्डे, यांना वकील फी कळविण्याबाबत दि. १५/१२/२०१५ रोजी ई मेल पाठविला होता. त्यावर त्यांनी खालील प्रमाणे कळविले आहे.

"With reference to your letter regarding fee structure for appearing in Supreme Court for sansthan, my fees for appearing, ,filing affidavit in reply would be Rs. 1,10,000/- upto admission stage. If matter is admitted then separate fee will be charged for final hearing stage. This is for your information and record."

उपरोक्त ई मेल वर ॲडव्होकेट श्री संजय खर्डे यांना पुन्हा दि. १६/१२/२०१५ रोजीचे ई मेल व्दारे एस.एल.पी. नं. २९८७५/२०१५ ॲडमीट झाल्यानंतर फायनल हियरींगला स्वतंत्र फी आकारणार असल्याचे नमूद केले आहे. सदरचा परिपुर्ण प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावयाचा असल्याने प्रस्तुत केस मध्ये फायनल हियरींगला किती फी घेणार याबाबत कळविणेस विनंती केली होती. त्यावर त्यांनी खालील प्रमाणे कळविले आहे.

"If matter is admitted than only question arises of fees for final hearing. Considering present position of listing of final hearing matters, if our matter is unfortunately admitted it may take another 4 years to decide.Therefore I have not mentioned final hearing fees.still you insist for the same you please let me know."

ॲडव्होकेट श्री संजय खर्डे यांनी पुन्हा दि. १७/१२/२०१५ रोजी ई मेल पाठवीला असून त्यामध्ये खालील प्रमाणे नमुद केले आहे.

If matter is admitted than only question arises of fees for final hearing. Considering present position of listing of final hearing matters, if our matter is unfortunately admitted it may take another 4years to decide. Therefore I have not mentioned final hearing fees. As you have insisted for mentioning final hearing fees, same would be Rupees Two lac Twenty thousand.

ॲडव्होकेट श्री संजय खर्डे यांचे ई मेलचा विचार करता एस.एल. पी. नं. २९८७५/२०१५ साखरबाई हरिभाऊ शेळके (मयत) करीता रजनी विश्वास जोगळेकर व इतर. विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वसतव्यवस्था, शिर्डी. व इतर मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयात संस्थानचे वतीने कामकाज पहाणेकामी ॲडव्होकेट श्री संजय खर्डे यांचे वकीलपत्र देणेस व प्रस्तुत केस मध्ये त्यांना admission stage व affidavit filing कामी रु. १,१०,०००/- व जर सदर केस ॲडमीट झाली तर फायनल हियरींग पर्यंतची वकील फी रु. २,२०,०००/- अशी एकुण रु. ३,३०,०००/- वकील फी अदा करणेचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६३२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, एसएलपी नं.२९८७५/ २०१५ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयात संस्थानचे वतीने ॲडमिशन स्टेजपर्यतचे कामकाज पहाणेकामी ॲडव्होकेटे श्री.संजय खर्डे यांना वकीलपत्र देण्यास व त्यांना admission stage व affidavit filing कामी रु.१,१०,०००/- मात्र फी देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-प्र.विधी अधिकारी,विधी विभाग)

---

विषय नं.१५ **नाताळ उत्सव व शिर्डी महोत्सव- २०१५ मधील गर्दीचे कालावधीमध्ये साईभक्तांच्या सोयीसाठी एल.ई.डी. स्क्रीन बसविणेबाबत.**

प्रस्ताव- नाताळ सुट्टयांचा कालावधी व दि.३१/१२/२०१५ रोजी साज-या होणा-या शिर्डी महोत्सव-२०१५ व नविन वर्ष स्वागताचे निमीत्त होणा-या गर्दीचे नियोजन व पुर्वतयारीबाबत कामकाजाचा आढावा घेणेसाठी जा.नं.एसएसएस/वशी-काअ/ ३४८४/२०१५, दि.१४/१२/२०१५ रोजीचे परिपत्रकान्वये दि.१७/१२/२०१५ रोजी दु.३.०० वा. मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे अध्यक्षतेखाली सभा घेण्यात येवुन विभागवार कामकाजाचा आढावा घेण्यात आला. सदर सभेत चर्चेअंती मा. कार्यकारी अधिकारी सो. व उपकार्यकारी अधिकारी सो. यांनी श्री साईभक्तांना श्रीं चे Live दर्शन सुलभतेने होणेकरीता मंदिर परिसरात दि.२२/१२/२०१५ ते दि.०२/०१/२०१६ असे एकुण १२ दिवसांकरीता ०५ नग LED Screen साईकॉम्प्लेक्स (१६ गुंठे), गेट नं.४ (लेंडीबाग), दर्शनरांग (पिंपळवाडी रोड) व जुने साईप्रसादालय नं. १ याठिकाणी तातडीने बसविणेबाबतची कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी सदर LED Screen यापुर्वी सिंहस्थ कुंभमेळा -२०१५ चे कालावधीत दि. ११/०९/२०१५ रोजीचे आदेशान्वये बसविण्यात आलेल्या असुन त्यास सहा महिने देखील कालावधी झालेला नसल्याने संबंधीत पुरवठाधारकाकडुनच यापुर्वीचे त्यांना देण्यात आलेल्या कार्यादेशातील नमुद तपशीलाप्रमाणे/साईजप्रमाणे, दराप्रमाणे व उपरोक्त कालावधीत खालील तपशीलात नमुद केलेल्या ठिकाणी एकुण ०५ नग LED Screen तातडीने बसवुन कार्यान्वित करण्यात यावे, असे निर्देश दिलेले आहेत.

| अ.नं. | LED Screen बसविणेचे ठिकाणे | साईज स्वेअर फुट | नग/संख्या | प्रती दिन प्रती स्वेअर फुट (दि.२२/१२/२०१५ ते दि.०२/०१/२०१६ ) | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | जुने साईप्रसादालय नं.१ | ८ x १२ | १ | ९५ | १,०९,४४०/- |
| २ | दर्शन रांग (पिंपळवाडी रोड) | ८ x १२ | २ | ९५ | २,१८,८८०/- |
| ३ | गेट नं.४ (लेंडीबाग) | ८ x १२ | १ | ९५ | १,०९,४४०/- |
| ४ | साईकॉम्प्लेक्स (१६ गुंठे) | ८ x १२ | १ | ९५ | १,०९,४४०/- |
| | | | | **एकूण रक्कम रु. (सर्व करांसहित)** | रु.५,४७,२००/- |

त्यानुसार दि.१८/१२/२०१५ रोजी संबंधीत पुरवठाधारक यांचेशी मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे समवेत चर्चा करण्यात येवुन पुरवठाधारकाने यापुर्वीचे कार्यादेशातील दरानुसार काम करण्यास दि. १८/१२/२०१५ रोजीचे ई-मेलद्वारे सहमती दर्शविली असुन त्यांना सदरचे कामकाज सुरु करणेकामी सोबतचे पत्रान्वये कार्यादेश देणेस तसेच तसेच उपरोक्त नमुद ठिकाणी LED Screen बसविणेसाठीचे स्टॅड व विद्युत पुरवठा उपलब्ध करुन देणेकामी संस्थानचे बांधकाम विभाग व विद्युत विभागास आदेश होणेस आपली मान्यता असावी.

तरी, दि. २२/१२/२०१५ ते दि.०२/०१/२०१५ असे एकुण १२ दिवसांकरीता उपरोक्त तपशीलातील नमुद ठिकाणी एकुण ०५ नग LED Screen कार्यान्वित करणेकामी येणा-या रक्कम रु.५,४७,२००/- मात्रचे (सर्व करांसहीत) खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.६३३ नाताळ उत्सव व शिर्डी महोत्सव- २०१५ मधील गर्दीचे कालावधीमध्ये मंदिर परिसरातील साईभक्तांना श्री चे Live दर्शन सुलभतेने होणेकरीता प्रस्तावात नमुद केलेल्या ०५ ठिकाणी तातडीने LED Screen कार्यान्वित केलेल्या असल्याबाबतची माहिती कार्यकारी अधिकारी यांनी सभेस दिली.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, नाताळ उत्सव व शिर्डी महोत्सव- २०१५ मधील गर्दीचे कालावधीमध्ये साईभक्तांच्या सोयीसाठी एल.ई.डी. स्क्रीन बसविणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन, त्याकामी येणा-या रु.५,४७,२००/- (सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सीसीटीव्ही कन्टोल सेल प्रमुख)

---

**विषय नं.१६ सन २०१६ करीता संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणेबाबत.**

प्रस्ताव- पाणी पुरवठा विभागाकडील कनकुरी साठवण तलाव येथून शुध्द केलेले पाणी पिण्यासाठी व इतर वापरासाठी संस्थान परिसरामध्ये विविध ठिकाणी वितरीत केले जाते. सदरचे शुध्द केलेले पाणी पिण्यायोग्य आहे किंवा नाही याबाबत पाण्याची नमुन्यांची तपासणी होणे आवश्यक असल्याने त्याची दरमहा संस्थानचे कनकुरी साठवण तलाव येथील प्रयोगशाळेत, जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अहमदनगर व एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि. नाशिक येथे तपासणी करण्यात येते.

सन २०१५ करीता संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेकामी एजन्सीची नेमणूक करणेकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.०४-११ नुसार खालीलप्रमाणे निर्णय संमत करण्यात आलेला होता.

"सन २०१५ करीता संस्थानमधील पाण्याच्या नमुन्यांची तपासणी करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागवून एजन्सीची नेमणूक करणेत यावी, याकामी येणा-या जाहिरातीच्या व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

त्यानुसार संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२३/०७/२०१५ रोजीचे सभेत चर्चा होवून, संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणेसाठी मे.एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची प्रती नमुना रु.९००/- सर्व करसमावेशक, Mobilization charges per visit रु.३००/- मात्र असे एकुण रु.१२००/- मात्र निम्नतर दर स्विकारणेत येवून मे.एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची माहे डिसेंबर २०१५ अखेर संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी नेमणूक करण्यात आलेली होती. त्यांचेकडे दरमहा विविध ठिकाणचे आठ पाणी नमुने तपासणी करणेकरीता पाठविण्यात येत होते व पाणी नमुने तपासणी अहवाल मागविण्यात येवून त्यांनी केलेल्या सुचनां आमलात आणून पाणी शूध्दीकरणांसाठी उपाय योजिले जात आहेत. माहे डिसेंबर २०१५ अखेर मे.एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची मुदत संपुष्टात येणार असल्याने सन २०१६ करीता नव्याने निविदा प्रक्रिया राबवावी लागेल. सन २०१६ करीता संस्थानमधील दरमहा ०८ नमुने याप्रमाणे प्रती नमुना अंदाजे रु.११००/- सर्व करसमावेशक, Mobilization charges per visit रु.४००/- मात्र असे एकुण अंदाजे रु.१५००/- प्रती नमुना याप्रमाणे दरमहा ८ पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी वार्षिक अंदाजे एकुण रु.१,४४,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी सन २०१६ करीता संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी निविदा मागवून एजन्सीची नेमणूक करणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६३४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६ करीता संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी विहीत पध्दतीने निविदांची मागणी करणेत येऊन एजन्सीची नेमणूक करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,४४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१७ शिर्डी नगरपंचायत, शिर्डी पाणी पुरवठा साठवण तलावास कागद टाकणेसाठी वाढीव निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

प्रस्ताव- शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दि. ०९/०७/२०१३ रोजीचे पत्र संस्थान कार्यालयास प्राप्त झालेले होते. सदरचे पत्रात शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी साईभक्त व नागरीकांच्या मुलभुत सोयीसाठी खालील कामांसाठी अनुदान मंजुर करुन मिळणेबाबत विनंती केलेली होती.

अनुदान मागणीचा प्रस्तावांचा तपशिल खालीलप्रमाणे:-

१) शिर्डी नगरपंचायतच्या नविन साठवण तलावात कागद टाकणे. (G.O. Membarance Sheet) – रु. ४.०० कोटी.

२) शिर्डीनगरपंचायतीच्या साठवण तलावापर्यंत कॅनॉल इनटेक पाण्याची रॉ वॉटर पाईपलाईन टाकणेबाबत- रु.३.२५ कोटी.

३) शिर्डी नगरपंचायतीच्या जुना साठवण तलाव दुरुस्तीसाठी निधी मिळणेबाबत.- रु. २.०० कोटी.

तरी वरीलप्रमाणे शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी वरील काम करणेसाठी अंदाजित एकुण रुपये ९.२५ कोटी निधी संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना मिळावा अशी विनंती केलेली होती.

उपरोक्त कामांसाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे दि. ०५/०६/२०१४ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. सदरहू सभेत निर्णय क्रं. ४४९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

*" यावर सविस्तर चर्चा होवून, उपरोक्त प्रस्ताव विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचे मान्यतेसाठी सादर करणेत यावा व शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येवून, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठाची मान्यता घेण्यात यावी व खंडपिठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. "*

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना जा.क्रं. एसएसएस/ वशी/ पाणीपुरवठा/१९४४/२०१४, दि. १३ जुलै, २०१४ व जा.क्रं. एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/ ३८८३/ २०१४, दि. १६ नोव्हेंबर, २०१४ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

दरम्यानचे कालावधीत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी जा.क्रं.नप/टेक्रं-७/३७०२/२०१४, दि.२७ नोव्हेंबर, २०१४ अन्वये पत्र पाठवून नगरपंचायतचे साठवण तलावात कागद टाकणेचे काम सुधारित तांत्रिक मंजुरीनुसार करणे आवश्यक असल्याने तसेच यापुर्वी मागणी करण्यात आलेली रक्कम रु.४.०० कोटी ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे सन २०११-१२ चे दरसुचीनुसार असल्याने व सन २०१३-१४ चे दरसुचीनुसार यात वाढ होवून सदर कामांसाठी रु.४.०० कोटी रकमेऐवजी रु.६,८५,३५,७६४.०० इतके अनुदान मंजुर करणेस विनंती करण्यात आलेली होती.

महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं. सासंवि २०१४/६१०/प्र.क्रं.८७/का.सोळा, दि. २० जानेवारी, २०१५ अन्वये शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना वरील नमुद कामे करणेसाठी रु. ९.२५ कोटी निधी देण्यास शासनाकडुन मान्यता देण्यात येवून मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठाची मान्यता घेणबाबतची पुढील कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना उपरोक्त कामे करणेसाठी आवश्यक रु. ९.२५ कोटी निधी उपलब्ध करु देणेबाबतचे विषयास मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठात सिव्हील ॲप्लिकेशन नं. ४७४७/२०१५ दाखल करण्यात आलेले होते.

शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी नगरपंचायतचे साठवण तलावास कागद टाकणेचे कामांसाठी मागणी केलेली वाढीव रक्कम रु.२,८५,३५,७६४/- मात्रचे वाढीव रकमेस पुन्हा शासनाची मान्यता घ्यावी लागणार असल्याने शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचे साठवण तलावास कागद टाकणेचे कामांसाठी निधी उपलब्ध करुन देणेची कार्यवाही स्थगित ठेवणेत आलेली होती.

शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना शिर्डी शहर विकास कामांकरीता रु. ९.२५ कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत दाखल सिव्हील ॲप्लिकेशन नं. ४७४७/२०१५, दि.१९/०६/२०१५ रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

१. The permission is sought to pay an amount of Rs.9.25 crores for development activities by way of grant. The same is sanctioned by the Government vide resolution dated 20.01.2015.

२. We have head the learned counsel respective parties. At present we would allow the applicant to pay an amount of Rs. 2.00 crores (Rs. Two crores only) for repairs of old water reservoir and Rs. 3.25 crores (Rs. Three crores Twenty Five Lacks only) to lay down row water pipeline, as the same is sanctioned in the Government Resolution dated 20.01.2015. The civil application is disposed of.

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे दि. १९/०६/२०१५ रोजीचे आदेशान्वये शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना खालील कामांकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

१. शिर्डी नगरपंचायतीच्या साठवण तलावापर्यंत कॅनॉल इनटेक पाण्याची रॉ वॉटर पाईपलाईन टाकणेबाबत- रु. ३.२५ कोटी.

२. शिर्डी नगरपंचायतीच्या जुना साठवण तलाव दुरुस्तीसाठी निधी मिळणेबाबत.- रु. २.०० कोटी.

मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे दि. १९/०६/२०१५ रोजीचे आदेशास अनुसरुन वरील दोन्ही कामे करणेसाठी एकुण रु. ५.२५ कोटी निधी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडील जा.क्रं.पन/टेक्रं-७/३२०४/२०१५, दि.०७/१२/२०१५ रोजीचे पत्र संस्थान कार्यालयास प्राप्त झालेले असून, त्यामध्ये त्यांनी पाटबंधारे विभागाकडुन रोटेशन कालावधीत वाढ झालेली असल्याने पाटबंधारे विभागाकडुन साठवण तलाव पुर्ण क्षमतेने भरल्यानंतर त्यातील पाणी ३ महिने पुरणे आवश्यक असतांना नगरपंचायतचे साठवण तलावास मोठया प्रमाणावर पाझर असल्यामुळे साठवण तलावातील पाणी फक्त एक ते दीड महिनाच पुरते यामुळे भीषण पाणी टंचाईस सामारे जावे जागत असल्यामुळे मा.त्रिसदस्यीय समितीचे दि. ०५/०६/२०१४ रोजीचे व महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं. सासंवि २०१४/६१०/ प्र.क्रं.८७/ का.सोळा, दि. २० जानेवारी, २०१५ रोजीचे आदेशान्वये शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे पाणी साठवण तलावास जी.ओ.मेंबरन शीट टाकणेसाठी मंजुर करण्यात आलेली रक्कम रु.४.०० कोटी मात्रची रक्कम शिर्डी नगरपंचायत, शिर्डी मंजुर करणेत येवून नंतर उर्वरीत वाढीव रकमेस मान्यता घ्यावी अशी विनंती करण्यात आली.

शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना पाणी साठवण तलावास जी.ओ.मेंबरन शीट टाकणेसाठी मा.त्रिसदस्यीय समितीचे दि. ०५/०६/२०१४ रोजीचे व महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं. सासंवि २०१४/६१०/प्र.क्रं.८७/का.सोळा, दि. २० जानेवारी, २०१५ रोजीचे आदेशास अनुसरुन मंजुर करण्यात आलेली रक्कम रु.४.०० कोटी निधी संस्थानकडुन उपलब्ध करुन देणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेसाठीची पुढील कार्यवाही होणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

तरी शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना पाणी साठवण तलावास जी.ओ.मेंबरन शीट टाकणेसाठी आवश्यक रु.२,८५,३५,७६४/- मात्रचे वाढीव रकमेस पुन्हा शासनाची मान्यता घ्यावी लागणार आहे.

**निर्णय क्र.६३५** **शिर्डी नगरपंचायत, शिर्डी पाणी पुरवठा साठवण तलावास कागद टाकणेसाठी संस्थानने मंजूर केलेल्या निधीमध्ये वाढ कोणत्या कारणामूळे झाली याबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी आजचे सभेत शिर्डी नगरपालिकेचे मुख्याधिकारी, नगराध्यक्षा व नगरसेवक उपस्थित होते. त्यांचेशी चर्चा केली असता मुख्याधिकारी यांनी याबाबतचा सविस्तर प्रस्ताव वाढीव रकमेच्या समर्थनीय कारणमीमांसेसह दोन दिवसात सादर करीतो, असे समक्ष सांगितले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून निधीमधील वाढीबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेनंतर तो व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१८** **संस्थान परिसरात पाणी पुरवठा करणेकामी भाडोत्री टॅंकर लावणेस व त्यासाठी येणारे खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे सर्व विभागांना व परिसरातील इमारतींना कनकुरी साठवण तलाव येथील साठवण तलावातून पाणी पुरवठा करण्यात येतो. कनकुरी साठवण तलाव ते ओव्हर हेड टॅंक येथुन श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), श्री साईप्रसादालय इमारत, श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईआश्रम भक्तनिवास भाग ०१ व भाग ०२ इ. ठिकाणी पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

पाणी पुरवठा योजनेचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| ०१ | पाणी पुरवठा योजना कधीपासून कार्यान्वित करण्यात आलेली आहे . | सन १९९२ |
| ०२ | रोटेशन कालावधीत इरिगेशन विभागाकडून घेण्यात येणारे सरासरी पाणी . | अंदाजे १२.५ कोटी लिटर्स |
| ०३ | संस्थान साठवण तलावाची क्षमता. | ३३२ एम.एल. |
| ०४ | साठवण तलावातील पाणी किती दिवस पुरते. | ४० ते ४५ दिवस |
| ०५ | उन्हाळयात अथवा गर्दीचे कालावधीत किती दिवस पाणी पुरते. | ३० ते ३५ दिवस. |
| ०६ | २४ तासात अंदाजे किती दिवस पाणी पुरवठा करण्यात येतो . | ४० ते ४५ लाख लिटर्स. |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मौजे कनकुरी येथील ३३२ एम.एल. क्षमतेच्या साठवण तलावास ५०० मायक्रॉन जाडीचे HDPE Geomembrane Sheet टाकणेकामी निम्मतम दरधारक ठेकेदार R.K.Sawant, Civil Contractor, Nashik यांना मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.16/04/2015 रोजीचे सभेतील निर्णय व मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे दि.06/05/2015 रोजीचे आदेशास अनुसरुन जा.क्रं.एसएसएस/ वशी/पाणी पुरवठा/4352/ 2015, दि.04/11/2015 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

संबंधीत कामाचे ठेकेदार यांनी टप्प्या-टप्प्याने साठवण तलाव रिकामे करुन कामांस सुरुवात केलेली आहे. यामुळे संस्थानचे साठवण तलावातून संस्थान परिसरास पाणी पुरवठा करणेसाठी मोठया प्रमाणावर अडचणी येत आहेत. तसेच दि.२४/१२/२०१५ ते दि.०२/०१/२०१६ या कालावधीत नाताळ उत्सव साजरा होणार असल्याने श्री क्षेत्र शिर्डी येथे श्रीसाईचे दर्शनासाठी मोठया प्रमाणावर भाविकांची गर्दी वाढण्याची शक्यता आहे. यामुळे पाणी वितरण व्यवस्थेवर मोठया प्रमाणावर ताण पडण्याची शक्यता आहे.

तसेच मागील दोन ते तीन वर्षापासून पर्जन्यमान कमी होत असल्याने धरणे पुर्ण क्षमतेने भरली जात नाहीत. यामुळे पाटबंधारे विभागाकडुन उपलब्ध पाणी साठयाचे नियोजन करण्यात आलेले आहेत. तसेच धरणातील उपलब्ध पाणी हे जायकवाडी धरणात सोडण्याची कार्यवाही सुरु असून त्यामुळे आपणांकडील रोटेशन कालावधीत वाढ करण्यात आलेली आहे. त्यामुळे पाणी टंचाईचे कालावधीत संस्थानकरीता पाटबंधारे विभागाकडुन रोटेशन कालावधीत नियमीत पाणी पुरवठा होईलच याची शाश्वती नाही.

सध्या साठवण तलावातील पाण्याची पातळी कमी झालेली असल्याने, तसेच रोटेशन कालावधीतही साठवण तलावाचे कागद टाकण्याचे काम सुरु असल्याने पुर्ण क्षमतेने साठवण तलाव भरुन घेता येणार नाही. याकरीता आपणास भाडोत्री टॅंकरव्दारे पाणी पुरवठा करुन घेणेची व्यवस्था करावी लागणार आहे.

पाणी पुरवठा व्यवस्था खालीलप्रमाणे करुन घेता येईल.

| अं.नं. | तपशिल | टॅंकरची क्षमता लिटर्समध्ये | दर रुपये (प्रती खेप) |
|---|---|---|---|
| ०१ | स्वत: पाणी पुरवठा करण्याचे स्त्रोत शोधून स्व:मालकीच्या ट्रॅक्टर टॅंकरव्दारे वाहतुक करुन संस्थानने निश्चित केलेल्या ठिकाणी सर्वसमावेशक खर्चासह पाणीपुरवठा करणे. | अंदाजे ६००० ते ८००० लिटर्स. | |
| ०२ | स्वत: पाणी पुरवठा करण्याचे स्त्रोत शोधून स्व:मालकीच्या ट्रक टॅंकरव्दारे वाहतुक करुन संस्थानने निश्चित केलेल्या ठिकाणी सर्वसमावेशक खर्चासह पाणीपुरवठा करणे. | अंदाजे २०००० ते २२००० लिटर्स. | |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | स्वत: पाणी पुरवठा करण्याचे स्त्रोत शोधून स्व:मालकीच्या ट्रक टँकरव्दारे वाहतुक करुन संस्थानने निश्चित केलेल्या ठिकाणी सर्वसमावेशक खर्चासह पाणीपुरवठा करणे. | अंदाजे १२००० ते १५००० लिटर्स. | |
| ०४ | संस्थानने शोधलेल्या / सुचविलेल्या पाणी स्त्रोत्रापासून स्वतःमालकीच्या ट्रॅक्टर टँकरव्दारे वाहतूक करुन संस्थानने निश्चित केलेल्या ठिकाणी पाणीपुरवठा करणे (डिझेलव्यवस्था संस्थानचे वाहन विभागाकडून ) | अंदाजे ६००० ते ८००० लिटर्स. | |
| ०५ | संस्थानने शोधलेल्यातापासून स्व पाणी स्त्रोसुचविलेल्या/:मालकीच्या ट्रक टँकरव्दारे वाहतुक करुन संस्थानने निश्चित केलेल्या ठिकाणी पाणीपुरवठा करणे. (डिझेलव्यवस्था संस्थानचे वाहन विभागाकडून ) | अंदाजे २०००० ते २२००० लिटर्स. | |
| ०६ | संस्थानने शोधलेल्या / सुचविलेल्या पाणी स्त्रोतापासून स्वमालकीच्या ट्रक टँकरव्दारे वाहतूक करुन संस्थानने निश्चित केलेल्या ठिकाणी पाणीपुरवठा करणे (डिझेलव्यवस्था संस्थानचे वाहन विभागाकडून | अंदाजे १२००० ते १५००० लिटर्स | |
| ०७ | स्वत:/ संसथानने शोधलेल्या / सुचविलेल्या पाणी स्त्रोतापासून विनामूल्य स्वमालकीच्या ट्रक/ट्रॅक्टर टँकरव्दारे वाहतूक करुन संस्थाने निश्चित केलेल्या ठिकाणी पाणीपुरवठा करणे (डिझेलव्यवस्था संस्थानचे वाहन विभागाकडून | अंदाजे ६००० ते ८०००<br>अंदाजे १२००० ते १५०००<br>अंदाजे २०००० ते २२०००<br>**लिटर्स.** | प्रत्यक्ष येणारा डिझेल व पाणी खरेदी खर्च |

संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), श्री साईप्रसादालय इमारत, श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईआश्रम भक्तनिवास भाग ०१ व भाग ०२, व्दारावती भक्तनिवास, मंदिर परिसर या ठिकाणी दररोज साधारणत: कमीत-कमी अंदाजे १५० ट्रक/ट्रॅक्टर टँकरची गरज भासणार आहे. अ.नं.०७ नुसार जे साईभक्त टँकरधारक पाणी पुरवठा सेवा उपलब्ध करुन देणेस तयार असतील / इच्छुक असतील अशा टँकरधारकांना संस्थानचे वाहन विभागाकडुन डिझेल देणेची व्यवस्था करणेत येवून पाणी पुरवठा सुरु करता येईल.

तरी ज्या ठिकाणी पाण्याचे स्त्रोत उपलब्ध आहेत त्या ठिकाणचे पाणी विकत घेणेसाठी आदा करावयाची रक्कम व डिझेल पुरवून पाणी घेणेची व्यवस्था कमी पडल्यास अतिरिक्त भाडोत्री टँकरकरीता आवश्यक अंदाजे रक्कम रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी व भाडोत्री टँकरधारकांचे दर निश्चित करणेचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांना मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.६३६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे ज्या ठिकाणी पाण्याचे स्त्रोत उपलब्ध आहेत त्या ठिकाणचे पाणी विकत घेण्यात यावे. पाणी विकत घेणेसाठी आदा करावयाची रक्कम व डिझेल पुरवून टँकरद्वारे पाणी घेणेस तसेच सदरहू व्यवस्था कमी पडल्यास पाणी पुरवठाकामी अतिरिक्त भाडोत्री टँकर लावणेस मान्यता देण्यात आली. तसेच भाडोत्री टँकरचे दर निश्चित करणेचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

विषय नं.१९ **श्री साईप्रसादालयातील डिश वॉशर मशिन करीता व इतर भांडी धुणेसाठी लिक्वीड सोप खरेदीबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधी तरतुद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग- ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**प्रस्ताविक:-** श्री साई प्रसादालयात दररोज सरासरी ४० हजार साईभक्त प्रसादाचा लाभ घेतात. उत्सव व गर्दीच्या कालावधीमध्ये प्रसाद- भोजन घेणा-या भक्तांची संख्या ६० ते ६५ हजारापर्यंत जाते. प्रसाद भोजन घेणा-या साईभक्तांना जेवण देण्यासाठी स्टिल ताटांचा वापर करण्यात येतो. सदर पदार्थ बनविणेसाठी तेलाचा व तुपाचा वापर करण्यात येत असल्यामुळे पदार्थ बनवण्यासाठी लागणारे कढई, पातेले, प्रसाद भोजनाची ताटे व जेवण वाढण्यासाठी हॉलमध्ये वापरण्यात येणा-या स्टेनलीस स्टीलच्या फुड सर्व्हिस ट्रॉलीज, चमचे, भातवाढ्या तेलकट होतात परिणामी त्यांचा खराब वास येतो. सदर ताटे व डिशेस तेलकट व तुपाचे असल्यामुळे फक्त पाण्याने धुतल्यामुळे स्वच्छ होत नसल्याने लिक्विड सोपचा वापर करावा लागतो.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ११/०९/२०१४ निर्णय क्र.७७७ अन्वये प्रसादालयातील भांडी धुणेसाठी १०००० लिटर लिक्विड सोप व डिश वॉशिंग मशिन करीता जॉनसन डायव्हसीचे SUMO NOVA- D & SUMO RINSE १५०० लिटर प्रत्येकी खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रूपये ६,८५,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे व त्याअनुषंगाने प्रसादालयास दि.२५/११/२०१५ अखेर १०००० लिटर लिक्विड सोप पैकी ८२६५ लिटर लिक्विड सोप प्राप्त झालेले असून अद्याप १७६५ लिटर लिक्विड सोप येणे बाकी आहे व ते प्रसादालयास साधारण एक ते सव्वा महिने पुरेल इतकेच शिल्लक आहे. श्री साई प्रसादालयात भांडी धुणेसाठी दररोज अंदाजे ४० ते ५० लिटर लिक्विड सोपची आवश्यकता असून महिन्याला सुमारे १५०० लिटर लिक्विड सोपची गरज लागते. त्यानुसार पुढील कालावधीकरीता अंदाजे १८००० लिटर लिक्विड सोपची आवश्यकता आहे. सध्या खरेदी करण्यात येत असलेल्या लिक्विड सापेचा खरेदी दर रु.१९.९० पैसे प्रति लिटर आहे. श्री साई प्रसादालयास पुढील कालावधीसाठी अंदाजे १८००० लिटर लिक्विड सोपची आवश्यकता आहे. सध्याच्या लिक्विड सोपचा मान्य दर रु.१९.९० पैसे असून यामध्ये पुढील काळामध्ये खरेदी करावयाच्या लिक्विड सोपचा दर अंदाजे रु.३०/- मात्र गृहीत

धरल्यास पुढील कालावधीसाठी १८००० लिटर खरेदी करावयाच्या लिक्विड सोपसाठी अंदाजे रु.५,४०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च अंदाजपत्रकीय तरतूद सन २०१५-२०१६ मधील प्रसादालय खर्च या सदराखालील मंजूर असलेल्या रकमेतून करता येईल.

**मागणी**:- श्री साई प्रसादालयातील प्रसाद भोजनाची भांडी, कढया, पातेले, फुड सर्व्हिस ट्रॉलीज, चमचे, वाट्या व इतर तेलकट उपकरणे धुणेसाठी लिक्विड सोप खरेदी करणे आवश्यक आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान**:- आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत**:- तरी प्रसादालयातील भांडी धुणेसाठी १८००० लिटर लिक्विड सोप खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ५,४०,०००/- चे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६३७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील डिश वॉशर मशिन करीता व इतर भांडी धुणेसाठी १८००० लिटर लिक्विड सोप विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५,४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.२०** **श्री साईप्रसादालयातील हाऊसकिपींग/ स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे कामाबाबत विविध वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देणे व ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद**:- सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.14 (भाग-4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील 14 (2 घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच 21 (1 घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रस्तावना** :- श्री साई प्रसादालयाचे संपुर्ण परिसरातील व आतील भागाची हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलची कामे आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेतली जातात. त्यानूसार मे.अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हीसेस इंडिया प्रा.लि.,पुणे ही कंपनी दि.01 मार्च-2015 रोजीपासून श्री साई प्रसादालयातील स्वच्छता, हाऊसकिपींग व पेस्टकंट्रोलची कामे करत आहेत.

श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम मा.व्यवस्थापन समिती दि.12/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.467 नूसार व मा.उच्च न्यायालय, मुंबई औरंगाबाद खंडपीठ यांच्या मान्यतेने, कार्यादेश जा.एसएसएस/वशी/5880/2015 दि.27/02/2015 अन्वये मे.अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हीसेस इंडिया प्रा.लि.,पुणे यांना दि.01 मार्च-2015 ते 29 फेब्रुवारी-2016 या कालावधीकरीता दरमहा रक्कम रु.11,84,000/- सर्व करांसह याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेला आहेत. या कामाची मुदत दि.29/02/2016 अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे पुढील कालावधीसाठी हाऊसकिंपींग,स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे खर्चास मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता घ्यावी लागणार आहे.

**मागणी**:- प्रास्तविक नूसार दिनांक 01/03/2016 ते दिनांक 28/02/2018 या दोन वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलची कामे आऊटसोर्सीग पध्दतीने करणे संस्थानचे दृष्टीने हितावह असल्याने वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्याकडून नव्याने ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत**:- श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे कामाची मुदत दि.29/02/2016 अखेर संपुष्टात येत असल्याने दिनांक 01/03/2016 ते दि.28/02/2018 या दोन वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलची कामे आऊटसोर्सीग पध्दतीने करणेकामी, सध्या देण्यात आलेल्या वार्षिक रक्कम रु.1,42,08,000/- मध्ये अंदाजे 20% वाढ गृहीत धरल्यास एका वर्षासाठी अंदाजे रक्कम रु.1,70,49,600/- नूसार दि.01/03/2016 ते दिनांक 28/02/2018 या दोन वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.3,40,99,200/- (अक्षरी रक्कम रु.तीन कोटी चाळीस लाख नौव्यान्नव हजार दोनशे मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे खर्चास मा.त्रिसदस्सीय व्यवस्थापन समितीची तसेच सदर खर्च हा मेजर फायनान्शीयल खर्च असल्याने मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सदरचे खर्चास तसेच विषयांकितकामी ई-निविदा मागविणेकरीता मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल व संस्थान वकिलामार्फत मा.उच्च न्यायालयात सदरचे खर्चास मान्यता मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानूसार पुढील कार्यवाही करता येईल.

तरी दिनांक 01/03/2016 ते दिनांक 28/02/2018 या दोन वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलची कामे आऊटसोर्सीग पध्दतीने करणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.६३८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेसाठी नवीन ठेकेदाराची विहीत पध्दतीने एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करणेत यावी व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२१** **श्री साईप्रसादालयातील प्रसाद भोजनामध्ये मनुष्यबळाद्वारे चपाती/ पुरी तयार करणेकामी विविध वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देणे व ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद:-** सन **2004** चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.**14** (भाग-4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील **14 (2 घ)** नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच **21 (1 घ)** नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रस्तावना:-** श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनात देण्यात येणारी चपाती/पुरी ही उक्त ठेकेदारी पध्दतीने आऊटसोर्सिंग द्वारे तयार करुन घेण्यात येत आहे. त्यानूसार शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, द्वारा श्री चंद्रकांत शेळके, निमगांव-शिरडी यांना दि.01 मार्च-2015 रोजीपासून श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती/पुरी तयार करण्याचे काम करत आहेत.

श्री साई प्रसादालयातील चपाती/पुरी तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समिती दि.12/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.468 नूसार व मा.उच्च न्यायालय, मुंबई औरंगाबाद खंडपीठ यांच्या मान्यतेने, कार्यदेश जा.एसएसएस/ वशी/ 5878/2015 दि.27/02/2015 अन्वये शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर्स, द्वारा श्री चंद्रकांत शेळके, निमगांव-शिरडी यांना दि.01 मार्च-2015 ते 29 फेब्रुवारी-2016 या कालावधीकरीता प्रती क्विंटल कोरडा आटा+ मैद्यास रु.800/- (अक्षरी रक्कम रु.आठशे मात्र) सर्व करांसह याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेले आहेत. या कामाची मुदत दि.29/02/2016 अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे पुढील दोन वर्ष कालावधीसाठी चपाती/ पुरी तयार करणेकामी होणाऱ्या मजुरी खर्चास मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता घ्यावी लागणार आहे.

**मागणी:-** प्रास्तविक नूसार दिनांक 01/03/2016 ते दिनांक 28/02/2018 या दोन वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये आऊटसोर्सींग पध्दतीने चपाती/पुरी तयार करणे संस्थानचे दृष्टीने हितावह असल्याने वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्याकडून, ठेकेदारांकडून नव्याने ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:-** श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती/पुरी तयार करणेच्या कामाची मुदत दि.29/02/2016 अखेर संपुष्टात येत असल्याने दिनांक 01/03/2016 ते दि.28/02/2018 या दोन वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील चपाती व पुरी आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणेकामी, सध्या ठेकेदारास देण्यात येत असलेल्या प्रती क्विंटल कोरडा गहु आटा+मैद्यास रक्कम रु.800/- प्रमाणे मजुरी देण्यात येते. त्यानूसार वार्षिक साधारणत: 8000 क्विंटल कोरडा आटा+मैदा लागतो, म्हणजेच वार्षिक रक्कम रु.64,00,000/- इतकी मजुरी द्यावी लागते. सदर रकमेमध्ये अंदाजे 20% वाढ गृहीत धरल्यास एका वर्षासाठी अंदाजे रक्कम रु. 76,80,000/- नूसार दि.01/03/2016 ते दिनांक 28/02/2018 या दोन वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.1,53,60,000/- (अक्षरी रक्कम रु.एक कोटी त्रेपन्न लाख साठ हजार मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे.

सदरचे खर्चास मा.त्रिसदस्सीय व्यवस्थापन समितीची तसेच सदर खर्च हा मेजर फायनान्शीयल खर्च असल्याने मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सदरचे खर्चास तसेच विषयांकितकामी ई-निविदा मागविणेकरीता मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल व संस्थान वकिलामार्फत मा.उच्च न्यायालयात सदरचे खर्चास मान्यता मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानूसार पुढील कार्यवाही करता येईल.

तरी दिनांक 01/03/2016 ते दिनांक 28/02/2018 या दोन वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती व पुरी आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.६३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील प्रसाद भोजनामध्ये देण्यात येणा-या पु-यांबाबत साईभक्तांच्या तक्रारी येत असल्यामुळे फक्त मनुष्यबळाद्वारे चपाती बनविणेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेसाठी नवीन ठेकेदाराची विहीत पध्दतीने एक वर्ष कालावधीसाठी नेंमणूक करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी येणा-या अपेक्षित खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२२** **श्री साईप्रसादालयातील मनुष्यबळाद्वारे अन्न पाकिट (नाष्टा पाकिट) तयार करणेकामी विविध वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देणे व ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद:-** सन **2004** चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.**14** (भाग-4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील **14 (2 घ)** नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच **21 (1 घ)** नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रस्तावना:-** श्री साई प्रसादालयामार्फत सकाळी 6 ते 10 या वेळेत भक्तांना अल्पोपहार म्हणून अन्नपाकीटे (5 पुरी, कडधान्य भाजी, बर्फी वडी) ही उक्ती ठेकेदारी पध्दतीने आऊटसोर्सिंग द्वारे तयार करुन घेण्यात येत आहे. त्यानूसार शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, द्वारा श्री चंद्रकांत शेळके, निमगांव-शिरडी यांना दि.01 मार्च-2015 रोजीपासून श्री साई प्रसादालयामार्फत साईभक्तांना अल्पोपहार (नाष्टापाकीटे) तयार करण्याचे काम करत आहेत.

अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) करणेकामी मा.व्यवस्थापन समिती दि.12/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.468 नूसार व मा.उच्च न्यायालय, मुंबई औरंगाबाद खंडपीठ यांच्या मान्यतेने, कार्यादेश जा.एसएसएस/वशी/5877/2015 दि.27/02/2015 अन्वये शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर्स, द्वारा श्री चंद्रकांत शेळके, निमगांव-शिरडी यांना दि.01 मार्च-2015 ते 29 फेब्रुवारी-2016 या कालावधीकरीता प्रती अन्नपाकीटास मजुरी रु.1.45 पैसे (अक्षरी रु.एक पैसे पंचेचाळीस मात्र) सर्व करांसह याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेले आह. या कामाची मुदत दि.29/02/2016 अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे पुढील दोन वर्ष कालावधीसाठी चपाती/पुरी तयार करणेकामी होणाऱ्या मजुरी खर्चास मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता घ्यावी लागणार आहे.

**मागणी:-** प्रास्तविक नूसार दिनांक 01/03/2016 ते दिनांक 28/02/2018 या दोन वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयामार्फत भक्तांना अल्पोपहार (नाष्टापाकीटे) आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणे संस्थानचे दृष्टीने हितावह असल्याने वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्यांकडून, ठेकेदारांकडून नव्याने ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:-** श्री साई प्रसादालयामार्फत अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेच्या कामाची मुदत दि.29/02/2016 अखेर संपुष्टात येत असल्याने दिनांक 01/03/2016 ते दि.28/02/2018 या दोन वर्ष कालावधीसाठी अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणेकामी, सध्या ठेकेदारांस देण्यात येत असलेल्या प्रती अन्नपाकीटास मजुरी रु.1.45 पैसे प्रमाणे (माहे एप्रिल-15 ते ऑक्टो-15) अंदाजे दरमहा बिलाची रक्कम रु.4,58,000/- नूसार वार्षिक मजुरीची रक्कम अंदाजे रु.54,96,000/- इतकी मजुरी द्यावी लागते. सदर रकमेमध्ये अंदाजे 20% वाढ गृहीत धरल्यास एका वर्षासाठी अंदाजे रक्कम रु.65,95,200/- नूसार दि.01/03/2016 ते दिनांक 28/02/2018 या दोन वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.1,31,90,400/- (अक्षरी रक्कम रु.एक कोटी एकतीस लाख नव्वद हजार चारशे मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे.

सदरचे खर्चास मा.त्रिसदस्सीय व्यवस्थापन समितीची तसेच सदर खर्च हा मेजर फायनान्शीयल खर्च असल्याने मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सदरचे खर्चास तसेच विषयांकितकामी ई-निविदा मागविणेकरीता मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल व संस्थान वकिलामार्फत मा.उच्च न्यायालयात सदरचे खर्चास मान्यता मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानूसार पुढील कार्यवाही करता येईल.

तरी दिनांक 01/03/2016 ते दिनांक 28/02/2018 या दोन वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयामार्फत साईभक्तांना सकाळी अल्पोपहार (नाष्टापाकीटे) आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६४० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील मनुष्यबळाद्वारे अन्न पाकिट (नाष्टा पाकिट) तयार करणेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेसाठी नवीन ठेकेदाराची विहीत पध्दतीने एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी येणा-या अपेक्षित खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय/ विधी अधिकारी)

---

विषय नं.२३ **श्री साईप्रसादालयातील प्रसाद भोजनामध्ये चपाती मशिनद्वारे चपाती तयार करणेकामी विविध वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देणे व ई-निविदा मागविणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुद:-** सन **2004** चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.**14** (भाग-4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील **14 (2 घ)** नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच **21 (1 घ)** नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रस्तावना:-** श्री साई प्रसादालयामध्ये दरोज गर्दीचे प्रमाणानूसार 40,000 ते 85,000 पर्यंत साईभक्त प्रसादभोजन घेतात. गर्दीनूसार दरोज सुमारे 35 क्विंटल ते 60 क्विंटल आटयाच्या चपाती/पुरी बनवावी लागते. संस्थानचे सध्या 02 ॲटोमॅटीक चपाती मशिन्स देणगी आलेले आहेत. प्रत्येक चपाती मशिनवर तुंबवलेला (मळलेला) आटा टाकणे, भाजताना अडकलेली चपाती काढणे, तेल लावणे, चपाती थंड झाल्यावर कॅरेटमध्ये ठेवणे इत्यादीकामी पुरेसे कर्मचारी निविदाधारक यांनी चपाती मशिनवर पुरवावे लागतात. चपाती मशिनवर मनुष्यबळ पुरवून चपाती तयार करणेचे काम हे उक्त ठेकेदारी पध्दतीने आऊटसोर्सिंग द्वारे तयार करुन घेण्यात येत आहे. त्यानूसार साई केटरर्स, श्रीरामपूर हे दि.01 मार्च-2015 रोजीपासून श्री साई प्रसादालयात चपाती मशिनवर चपाती तयार करण्याचे काम करत आहेत.

श्री साई प्रसादालयात मशिनवर चपाती तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समिती दि.12/6/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.468 नूसार व मा.उच्च न्यायालय, मुंबई औरंगाबाद खंडपीठ यांच्या मान्यतेने, कार्यादेश जा.एसएसएस/वशी/ 5879/ 2015 दि.27/02/2015 अन्वये श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांना दि.01 मार्च-2015 ते 29 फेब्रुवारी-2016 या कालावधीकरीता प्रती क्विंटल कोरडा गहु आटा+मैद्यास रु.410/- (अक्षरी रक्कम रु.चारशे दहा मात्र) सर्व करांसह याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेले आहेत. या कामाची मुदत दि.29/02/2016 अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे पुढील दोन वर्ष कालावधीसाठी चपाती मशिनवर मनुष्यबळ पुरवून चपाती तयार करणेकामी होणाऱ्या मजुरी खर्चास मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता घ्यावी लागणार आहे.

**मागणी:-** प्रास्तविक नूसार दिनांक 01/03/2016 ते दिनांक 28/02/2018 या दोन वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर चपाती तयार करण्याचे काम हे आऊटसोर्सींग पध्दतीने देणे संस्थानचे दृष्टीने हितावह असल्याने वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्याकडून, ठेकेदारांकडून नव्याने ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:-** श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर चपाती तयार करणेच्या कामाची मुदत दि.29/02/2016 अखेर संपुष्टात येत असल्याने दिनांक 01/03/2016 ते दि.28/02/2018 या दोन वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर आऊटसोर्सींग पध्दतीने चपाती तयार करणेकामी, सध्या ठेकेदारास देण्यात येत असलेल्या प्रती क्विंटल कोरडा गहु आटा+मैद्यास रक्कम रु.410/- प्रमाणे मजुरी देण्यात येते.

त्यानूसार (माहे एप्रिल-15 ते ऑक्टो.15 यावरुन) अंदाजे मासिक बिलाची सरासरी रक्कम रु.1,1,300/- नूसार अंदाजे वार्षिक मजुरीची रक्कम रु.12,15,593/- इतकी मजुरी द्यावी लागते. सदर रकमेमध्ये अंदाजे 20% वाढ गृहीत धरल्यास एका वर्षासाठी अंदाजे रक्कम रु.14,58,711/- नूसार दि.01/03/2016 ते दिनांक 28/02/2018 या दोन वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.29,17,422/- (अक्षरी रक्कम रु. एकोणतीस लाख सतरा हजार चारशे बावीस मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे खर्चास मा.त्रिसदस्सीय व्यवस्थापन समितीची तसेच सदर खर्च हा मेजर फायनान्शीयल खर्च असल्याने मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सदरचे खर्चास तसेच विषयांकितकामी ई-निविदा मागविणेकरीता मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल व संस्थान वकिलामार्फत मा.उच्च न्यायालयात सदरचे खर्चास मान्यता मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानूसार पुढील कार्यवाही करता येईल.

तरी दिनांक 01/03/2016 ते दिनांक 28/02/2018 या दोन वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर आऊटसोर्सींग पध्दतीने चपाती तयार करणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.६४१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील प्रसाद भोजनामध्ये चपाती मशिनद्वारे चपाती तयार करणेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेसाठी नवीन ठेकेदाराची विहीत पध्दतीने एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी येणा-या अपेक्षित खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय/ विधी अधिकारी)

---

विषय नं.२४ **सन २०१६-१७ करीता मोतीचूर लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी बनविणेकामी ई-निविदा काढणेस व सदरकामी येणारे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४(भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील २१(१घ)नूसार साईभक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

**प्रस्ताविक-** उपरोक्तप्रमाणे अधिनियमास अनुसरुन लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती या विभागाची दि.०३/०१/२०१४ रोजी पासून स्थापना करणेत आलेली आहे.

श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना साईबाबांचा प्रसाद मिळावा या हेतूने मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व अधिनियमास अनुसरुन संस्थानचे लाडू प्रसाद विक्री काऊंटरवर मोतीचूर लाडू पाकीटे विक्री तसेच मंदिर दर्शनरांगेत भक्तांना मोफत बुंदी पाकीटे वाटप करण्यात येतात तसेच प्रसादालयात भक्तांना भोजनात बर्फी देण्यात येत आहे. सदरचे मोतीचूर लाडू, बुंदी, बर्फी प्रसाद तयार करण्याचे काम लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत करण्यात येत आहे.

त्यासाठी लागणारे कच्चे मटेरियल (हरबरा दाळ, गावरान तुप, साखर, काजू पाकळी, खिसमिस, हिरवी विलायची, जिलेबी रंग) हे संस्थानचे मध्यवर्ती खरेदी विभागामार्फत खरेदी करण्यात येते. खरेदी केलेले मटेरियल हे मध्यवर्ती भांडारकडून दैनंदिन गरजेनुसार घेऊन लाडू व बुंदी निर्मितीचे काम करण्यात येते. सध्या दोन लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत मोतीचूर बुंदी लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी तयार करुन घेणेत येत आहे.

सन २०१५-२०१६ (दिनांक दि.०१/०४/२०१५ ते दि.२९/०२/२०१६) या कालावधीसाठी दोन्ही लेबर कॉन्ट्रॅक्टर यांना कॉन्ट्रॅक्ट विभागून देण्यात आलेले आहे. आता सदरहू कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दि. २९/०२/२०१६ रोजी संपत आहे.

सन २०१६-२०१७ (दिनांक ०१/०३/२०१६ ते दि.२८/०२/२०१७) या कालावधीसाठी नव्याने मोतीचूर बुंदीचे लाडू, बुंदी, बर्फी निर्मितीचे उक्ते टेंडर पध्दतीने मजूरीची ई निविदा प्रसिध्द करुन नव्याने ठेकेदारांची नियुक्ती करणे क्रमप्राप्त आहे.

सन २०१२ पासून लाडू व बर्फी निर्मिती प्रक्रियेस ठेकेदारास खालीलप्रमाणे रक्कम आदा करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | तपशिल | झालेली खर्च रक्कम |
|---|---|---|
| १ | सन २०१२-२०१३ | १,३६,७०,४६४/- |
| २ | सन २०१३-२०१४ | १,३२,९९,६२०/- |

| | | |
|---|---|---|
| ३ | सन २०१४-२०१५ | १,४१,२९,२३४/- |
| ४ | दि.०१.०४.२०१५ ते दि. ३१.१०.२०१५ अखेर झालेला खर्च | ७८,१६,०६८/- |

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** आता सन २०१६-१७ करीता याकामी अंदाजे एकूण रक्कम रु. १,५०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पन्नास लाख) मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी येणारे अंदाजे खर्चाचे मान्यतेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे त्रिसदस्य समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६-२०१७ (दिनांक ०१/०३/२०१६ ते दि.२८/०२/२०१७) या कालावधीसाठी मोतीचूर बुंदीचे लाडू, बुंदी, बर्फी निर्मितीचे काम उक्ते टेंडर पध्दतीने करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून नवीन ठेकेदारांची नियुक्ती करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,५०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. मात्र सदरहू खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मीती विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२५** **सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता द्वारावती भक्तनिवास इमारत व परिसर स्वच्छता/ हाऊसकिपींग (आऊटसोर्सिंग) कामाबाबत.**

**प्रस्ताव-** व्दारावती भक्तनिवास विभागाचे इमारतीमध्ये ८० ए.सी. व २३६ नॉन ए.सी. अशा एकुण ३१६ खोल्या साईभक्तांना निवासासाठी देण्यात येतात. त्या खोल्या भक्तांनी खाली केलेनंतर त्याची साफ-सफाई तसेच हाऊसकिपींग व व्दारावती विभागाचे इतर परिसराची स्वच्छता इत्यादी कामे, आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेतली जातात.

संस्थानच्या व्दारावती भक्तनिवास विभागाकडे मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे ही कंपनी दि.०१/०४/२०१० पासुन स्वच्छता व हाऊसकिपींगची कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने सध्या काम करत आहे.

मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांना उपरोक्त कामासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६/११/२०१४ रोजी झालेल्या सभेतील विषय क्र.०५, निर्णय क्र.९२८ व कार्यादेश जा.नं.एसएसएस/ वशी-व्दारावती/ ६४७/२०१५ दि.२८/०३/२०१५ अन्वये स्वच्छतेसाठी आवश्यक असणा-या मशिनरी, केमिकल्स व प्रतिदिनी ७६ कर्मचा-यांसह दरमहा सर्व करांसह रु.९,९९,५००/- (अक्षरी रुपये- नऊ लाख, नव्यान्नो हजार, पाचशे मात्र) चा कार्यादेश देण्यात आलेला आहे. या कामाची मुदत दि.३१/०३/२०१६ अखेर संपुष्टात येत आहे.

**अधिनियम २००४ नुसार छाननी करुन अनुमान:-** व्दारावती भक्तनिवास इमारत व परिसराचे स्वच्छता व हाऊसकिपींग कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणे संस्थानचे दृष्टीने हितावह आहे. त्याकरीता मोठया विविध प्रकारच्या मशिनरी, लहान विविध उपकरणे, निविदेत नमुद केलेप्रमाणे स्वच्छतेचे केमिकल्स् व ७६ कर्मचा-यांसह स्वच्छता/ हाऊसकिपींग कामाकरीता (आऊटसोर्सिंग) उपरोक्त कालावधीसाठी. -

**व्दारावती विभागचा अभिप्राय / स्पष्ट मत:-**

| अ.नं. | सन | व्यवस्थापन सभा दिनांक,विषय/निर्णय क्र. | पात्र टेंडर | अपात्र टेंडर | एकुण | मंजुर रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | २०१०-११ | सभा दि. ०६/०३/२०१०, विषय नंबर :-०९ ,निर्णय क्रं.२८२ अन्वये | ६ | ३ | ९ | ४,५६,०००/- |
| ०२ | २०११-१२ | सभा दि. २६/०३/२०११, विषय नंबर :-०९, निर्णय क्रं.२०९ अन्वये | ६ | २ | ८ | ६,२५,०००/- |
| ०३ | २०१२-१३ | सभा दि.१९/०२/२०१२, विषय नंबर :- ७३,निर्णय क्र. २४३ अन्वये | दि.२४/०१/२०१२ रोजीचे विनंती पत्रानुसार २०% वाढीव मागणी केली होती परंतु चर्चा वाटाघाटीनंतर रु. १,००,०००/- वाढवून दिले. | | | ७,२५,०००/- |
| ०४ | २०१३-१४ | सभा दि.२७/०४/२०१३, विषय नंबर :- १०, निर्णय क्र. ३५३ | ३ | १ | ४ | ८,३०,०००/- |
| ०५ | २०१४-१५ अ) | सभा दि.१५/०२/२०१४, विषय नंबर :- १२, निर्णय क्र. १६३ | निविदा मागविणेस व नविन ठेकेदाराची नेमणूक होईपावेतो आहे त्याच दरात मुदतवाढ देण्यात आली. वर्तमान पत्रात जाहीरात देऊन ई-निविदा मागविण्यात आल्या. | | | ८,३०,०००/- |
| | | | २ | ३ | ५ | |
| | ब) | सभा दि.१२/०६/२०१४, आयत्या वेळेचा विषय :-०१, निर्णय क्र. ५२४ | एकुण ५ निविदा पैकी २ निविदा पात्र असल्याने व ई-टेंडर करीता कमीत कमी ३ पात्र निविदा असणे गरजेचे आहे. २ निविदेत चर्चा करता येत नाही तेव्हा फेर-निविदा मागविणेत याव्यात प्रत्येक महिन्याला मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले. | | | ८,३०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०६ | २०१५-१६ | सभा दि.०६/११/२०१४<br>विषय -५,<br>निर्णय क्र. ९२८, | हाऊसकिपींग कामासाठी तिसऱ्या वेळेस फेर-निविदा मागविणे व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.तसेच तिसऱ्या फेर ई-निविदामध्ये ३ पेक्षा जास्त् किंवा कमी पात्र निविदा प्राप्त् झाल्या तरीही निविदा प्रक्रिया अंतिम करण्यात यावी, असा निर्णय पारीत करण्यात आलेले आहे. | ९,९९,५००/- |
| | | | १ ३ ४ | |

उपरोक्त तक्त्यानुसार सन २०१० ते सन २०१६ अखेर प्रत्येक वर्षा अखेर मे.बी.व्ही.जी.इंडिया,पुणे यांना दरवर्षी टेंडर दरात वाढीव दराने कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यामुळे दरवर्षी ठेकेदारास रक्कम वाढवुन देण्यात आलेली आहे.

**अ)** नव्याने नामांकित कंपन्यांकडून निविदा मागविणे बाबत वर्तमान पत्रात जनसंपर्क कार्यालयामार्फत व माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत जाहिरात प्रसिध्द करावी लागेल.

**ब)** सदरील कार्यवाही पुर्ण होईपावेतो साई भक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता सध्या कार्यरत असलेले ठेकेदार मे.बी.व्ही.जी. इंडिया लि.पुणे, कॅम्प शिर्डी यांना मंजूर दरात प्रति महा रु. ९,९९,५००/- (अक्षरी रु- नऊ लाख नव्यान्नो हजार पाचशे मात्र) प्रमाणे पुढील कार्यादेश होईपावेतो आहे त्याच अटी व शर्तीनुसार हाऊसकिपींग काम करुन घेता येईल. याकामी पुढील कार्यादेश होईपावेतो येणारे अपेक्षित खर्चास मान्यता असावी.

**क)** एका महिन्यास अंदाजे रुपये १०,००,०००/- (अक्षरी रु. दहा लाख मात्र ) इतका खर्च असून त्यावर अपेक्षित १०% वाढ ग्राहय धरुन सरासरी प्रति महा रुपये ११,००,०००/- (अक्षरी रु.अकरा लाख मात्र) खर्च अपेक्षित आहे. या कामी एका वर्षासाठी एकुण रु.१,३२,००,०००/- (अक्षरी रु.एक कोटी, बत्तीस लाख, मात्र) खर्चास मा.व्यवस्थापन समितीसमोर मान्यतेसाठी सादर करता येईल. दरम्यानचे कालावधीत याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठास विधी विभागामार्फत अर्ज करणेत येऊन मा.खंडपीठाची मान्यता घेता येईल.

तरी उपरोक्त् अ, ब, क प्रमाणे कार्यवाही करणेस मा.व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६४३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या द्वारावती भक्तनिवास इमारत व परिसर येथे स्वच्छता/ हाऊसकिपींग (आऊटसोर्सिंग) चे काम करत असलेले ठेकेदार मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांची दि.३१.०३.२०१६ अखेर मुदत संपुष्टात येत असल्याने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता द्वारावती भक्तनिवास इमारत व परिसर येथे स्वच्छता/ हाऊसकिपींग (आऊटसोर्सिंग) चे काम करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,३२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**ई-निविदा मागविणेपुर्वी याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही त्वरीत करणेत यावी. तसेच नवीन ठेकेदाराची नेमणूक होण्यास विलंब झाल्यास तोपर्यंत सदरहू काम सध्या करत असलेले ठेकेदार मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांना आहे त्याच अटी/ शर्तीवर प्रत्येक महिन्यास मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-प्र.अधिक्षक, व्दारावती भक्तनिवासस्थान/ विधी अधिकारी)

---

विषय नं.२६ **श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरित पारायण सोहळा मंडप-२०१५ कार्यक्रमासाठी वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेकामी आलेले खर्चाबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:**– अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट– कलम (२) च्या खंड (ठ) अन्वये श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील या प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:** श्रावण महिन्यातील श्री साई सच्चरित पारायण सोहळा– २०१५ कार्यक्रमासाठी दि.१५/०८/२०१५ ते दि.२३/०८/२०१५ या कालावधीत मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३,४५,०००/- मात्रचे खर्चास मा. त्रिसदस्य समितीचे दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र. १६२ (१६) अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार सदरहू कामी विहीत पध्दतीने निविदा मागणी करुन निम्नतम दराचे ठेकेदार विजय मंडप साऊंड सर्व्हिस, औरंगाबाद यांना रु.३,१४,१५०/- मात्रचा कार्यादेश देणेस व याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस तसेच सदर कामासाठी येणारे रक्कम रु.३,१४,१५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच श्री साई सच्चरित पारायण सोहळा २०१५ चे कालावधीत ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणारे सर्वसमावेशक खर्चास मा.त्रिसदस्य समितीची मान्यता

मिळणेबाबतचा प्रस्ताव सभाकामकाज विभागाकडे दि.०४/०८/२०१५ रोजी सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८/१०/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.३४२ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरीत पारायण सोहळा मंडप– २०१५ कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी करणेकामीच्या प्रस्तावाचे अवलोकन करणेत येऊन, त्यांची नोंद घेण्यात आली व याकामी आलेल्या एकूण रु.३,१४,१५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

वरील निर्णयानुसार ठेकेदार यांनी कार्यादेशानुसार केलेल्या कामासाठी रु.३,०४,८८१/- मात्रचे बिल ठेकेदार यांना अदा करणेत येत आहे.

**प्रस्ताव:** श्री साईसच्चरीत पारायण सोहळा कार्यक्रमाचे कालावधीत श्री.विजयराव जगताप व इतर ०८ ग्रामस्थ यांनी श्री साईसच्चरीत पारायण सोहळयाचे आयोजनाबाबत तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांची दि.१५/०६/२०१५ रोजी भेट घेऊन, त्यांचेकडे मंडप व्यवस्थेची साईज वाढविणे व इतर अनुषंगीक व्यवस्था करुन देणेबाबत मागणी केली. त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग- कार्यासन-५ यांनी त्यांचेकडील दि.१८/०६/२०१५ रोजीचे इतिवृत्तावर तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

'या सोहळयासाठी संस्थान दरवर्षी आवश्यक ती व्यवस्था करीत आलेली आहे.त्याच धर्तीवर याही वर्षीच्या व्यवस्थेचे नियोजन संस्थानने केले असुन गरज तसे सोयीनुरुप वाढदेखील करण्याची प्रशासनाची तयारी असल्याचे संबंधितांना सांगण्यात यावे."

उपरोक्त इतिवृत्तात नमूद केलेनुसार मंडप व्यवस्थेची साईज वाढविणे व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी इकडील दि.१७/०७/२०१५ रोजीचे प्रशासकिय मान्यतेनुसार तसेच पारायणाचे काळात पारायणार्थींची संख्या वाढल्याने ठेकेदार यांचेकडून ६०'x४३' साईजचा वाढीव मंडप व कार्यक्रमाचे स्पिकर ठेवणेसाठी ८'x४' साईजचे ३ नग स्टेज तयार करणेचे काम ठेकेदार यांचे दराने करुन घेणेत आले असुन त्यासाठी रु.३९,१२०/- इतका वाढीव खर्च आलेला आहे.

तरी श्री साई सच्चरित पारायण सोहळा-२०१५ कार्यक्रमासाठी करणेत आलेल्या वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेकामी आलेले रु.३९,१२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६४४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरित पारायण सोहळा मंडप-२०१५ कार्यक्रमासाठी वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेकामी आलेल्या रु.३९,१२०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२७ संस्थानचे अग्निशमन व्यवस्थेसाठी साईनगर परिसरात शेड उभारणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** फायर अॅण्ड सेफ्टी विभागाकडील अग्निशमन वाहनांसाठी तसेच वॉचरुम/ कंट्रोल रुमसाठी दि.२०/११/२०१४ रोजीचे पत्राने संस्थानचे दोनही रुग्णालये, प्रसादालय गॅसप्लॅंट येथे तात्काळ पोहचता यावे म्हणून साईनगर मैदान येथील जागा सुचविलेली होती.

सध्या संस्थानचे फायर विभागाकडे दोन अग्निशमन वाहने उपलब्ध असून, याव्यतिरिक्त आणखी दोन अग्निशमन वाहने प्रस्तावीत असल्याचे कळविले आहे. अग्निशमन विभागाचा वाढता विस्तार पाहता भविष्यात अदययावत असे वॉचरुम/ कंट्रोल रुमची उभारणी शासनाचे नियमानुसार करणे प्रस्तावीत आहे. त्यासाठी किमान अंदाजे ४० गुंठे जागेत फायर विभागाचे स्वतंत्र कार्यालय, वॉचरुम/ कंट्रोलरुम, वाहनांचे सर्व्हिसींगसाठी सर्व्हिसींग रॅम्प, गॅरेज, स्टोअर रुम, परेड/ सराव ग्राऊंड व कर्मचारी निवासस्थाने असे सर्व सुविधांयुक्त वॉचरुम / कंट्रोलरुम निर्मिती करावयाची असलेबाबत तसेच सध्या उपलब्ध असलेली अग्निशमन वाहने व संस्थान परिसरातील संभावित अग्निसुरक्षिततेकरीता साईनगर मैदान येथे तात्पुरते स्वरुपात पत्राशेडचे वॉचरुम / कंट्रोलरुमची उभारणी चे काम करुन मिळणेबाबत उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये फायर अॅण्ड सेफ्टी विभागाने जा.नं.२४६/२०१५ दि.१३/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये इकडील विभागास कळविले आहे.

**प्रस्ताव:-** संस्थानचे साईनगर मैदानाचे इशान्य कोपऱ्यात अग्निशमन वाहन व वॉच रुम, कंट्रोल रुमसाठी पत्राशेडची उभारणी करणेसाठी सोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणे तसेच जिल्हा दरसुची २०१४-२०१५ नुसार इकडील विभागामार्फत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून याकामी अंदाजे रु.८,०५,७५५/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

साईनगर मैदानाच्या उत्तरेकडील भाग बांधकाम परवानगी नकाशात Open Space म्हणून दर्शविण्यात आलेला आहे. अग्निशमन वाहनाला मुख्य रस्त्यापर्यंत तातडीने पोहचता यावे याकरीता सदर भागात तात्पुरते शेड उभारावे लागणार आहे. DCPR for regional plans नुसार Open Spaces मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

" The following accessory buildings may be permitted in the marginal open spaces suction tanks, soak pits, pump room electric meter room, garbage shaft, space required for fire Hydrants, electrical & water fittings, water tanks, dustbins etc."

तरी याकामी वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे विहीत पध्दतीने ई- निविदा मागविणेस व येणा-या रक्कम रु.८,०५,७५५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६४५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानचे अग्निशमन व्यवस्थेसाठी साईनगर परिसरात शेड उभारणेकामी विहीत पध्दतीने ई- निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.८,०५,७५५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

विषय नं.२८ **साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळेचे साईभक्तांकरीता बस वेटींग शेडचे बांधकाम करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद-**

अधिनियमाचे कलम (२१) पोटकलम (१) चा खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे, अशी तरतूद आहे.

अ) **साईआश्रम भक्तनिवास:-**

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.१२ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

"…. यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत आली"

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.८८७ (१) खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

"…. यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भक्तनिवास येथे साईभक्तांकरीता बस वेटींग शेडचे बांधकाम करणेकामी अथर्व ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद यांचे निविदा दरापेक्षा १५.२६६८% कमी (रु.७,५१,०००/-) मात्र हे अंतिम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली."

ब) **साई धर्मशाळा:-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०२/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.८७ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

" …. यावर सविस्तर चर्चा होऊन,साई धर्मशाळा येथे निवास करणारे साईभक्तांचे सोयीसाठी बस वेटींग शेडचे बांधकाम करणेकामी सदर शेडचे डिझाईन साईआश्रम प्रकल्पाचे आर.सी.सी कन्सल्टंट श्री. आर. आर. कुलकर्णी, पुणे यांचेकडून करुन घेणेत यावे. तसेच, याकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व येणा-या अंदाजे रु.९.८६ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली"

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.८८७ (२) खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

"…. यावर सविस्तर चर्चा होऊन,साई धर्मशाळा येथे साईभक्तांकरीता बस वेटींग शेडचे बांधकाम करणेकामी अथर्व ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद यांचे निविदा दरापेक्षा १३.७४७६% कमी (रु.७,५१,०००/- मात्र) हे अंतिम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली."

**प्रस्तावना:-** मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार निम्नतम दरधारक ठेकेदार अथर्व ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद यांना इकडील जा.क्र.एसएसएसटी/बांध/४११७/२०१४, दि.२९/११/२०१४ व जा.नं.४११८/२०१४ दि.२९/११/२०१४ रोजी ठेकेदार यांना उपरोक्त विषयांकीत कामांचा कार्यादेश देणेत आला होता. कार्यादेशाप्रमाणे व करारनाम्यानुसार काम पूर्ण करणेसाठी ०६ महिन्यांचा (दि.१८/१२/२०१४ ते दि.१७/०६/२०१५) कालावधी देणेत आला होता. परंतू सदर मुदतीत ठेकेदार यांनी कोणत्याही प्रकारे कामास सुरुवात केलेली नाही. ठेकेदार यांना याबाबत खालील पत्रान्वये तसेच कार्यालयीन आढावा बैठकीमध्ये समक्ष सुचित करणेत आलेले आहे.

१. इकडील जा.क्र.एसएसएसटी/बांध/५१११/२०१५, दि.१५/०१/२०१५
२. इकडील जा.क्र.एसएसएसटी/बांध/५८२०/२०१५, दि.२४/०२/२०१५
३. इकडील जा.क्र.एसएसएसटी/बांध/६३२०/२०१५, दि.२३/०३/२०१५
४. इकडील जा.क्र.एसएसएसटी/बांध/१०५०/२०१५, दि.२५/०५/२०१५
५. इकडील जा.क्र.एसएसएसटी/बांध/५२०१/२०१५, दि.१८/१२/२०१५
६. इकडील जा.क्र.एसएसएसटी/बांध/५२०२/२०१५, दि.१८/१२/२०१५

**प्रस्ताव:-** विषयांकीत कामासाठी ठेकेदार अथर्व ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद यांना कार्यादेश देऊन निविदा शर्तीनुसार काम पूर्ण करणेसाठी ०६ महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता. सदरचे कालावधीत ठेकेदार यांनी कुठल्याही प्रकारे कामास सुरुवात केलेली नाही. उपरोक्त नमूद पत्रव्यवहार करुन देखील ठेकेदार यांनी काम करणेस स्वारस्य दाखविलेले नाही. यावरुन त्यांची काम करण्याची इच्छा दिसत नाही. इकडील जा.क्र.५२०१/२०१५ व जा.क्र.५२०२/२०१५ दि.१८/१२/२०१५ रोजीचे पत्रान्वये ठेकेदार यांचा करारनामा रद्द करुन त्यांना Terminate करण्यात आले आहे.

तरी ठेकेदार अथर्व ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद यांची उपरोक्त विषयांकीत कामांसाठी संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा ठेव जप्त करणेस तसेच ठेकेदार अथर्व ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद यांना संस्थानचे काळया यादीत टाकणेस व विषयांकीत कामी फेरनिविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा येथे निवास करणा-या साईभक्तांच्या सोयीसाठी बस वेटींग शेडचे बांधकाम करणारे ठेकेदार अथर्व ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद हे सदरहू काम करण्यास असमर्थ असल्याने त्यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा ठेव जप्त करण्यात येऊन त्यांना संस्थानचे काळया यादीत टाकण्यात यावे व या कामासाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२९** **जुने प्रसादालय परिसरामध्ये असलेल्या सुलभ प्रसाधन गृहाबाबत.**

**प्रस्ताव-** सुलभ इंटरनॅशनल यांचेमार्फत सदर प्रकल्प संस्थान निधीतून सन 1997 मध्ये उभारणेत आला असून, त्यासाठी एकुण रु. 1,42,78,539/- मात्र खर्च करणेत असून, सदरहू सुलभ कॉम्पलेक्समध्ये खालील प्रमाणेच्या सुविधा आहेत.

01. 120 संडास (60 स्त्रीयांसाठी व 60 पुरुषांसाठी)
02. 108 बाथरुम (54 स्त्रीयांसाठी व 54 पुरुषांसाठी) व वॉटर स्टोअरेज टँक.
03. 28 विशेष स्वरुपाची स्पेशल सुलभप्रसाधनगृहे (14 स्त्रीयांसाठी व 14 पुरुषांसाठी)
04. कपडे बदलण्यासाठी स्त्रीयांसाठी व पुरुषांसाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था.
05. साईभक्तांना आपले सामान, बॅग लगेज ठेवण्यासाठी लॉकर रुमची विशेष सोय.
06. प्रसाधन गृहाच्या मलमुत्रा पासून बायोगॅस व त्यापासून अपारंपारिक उर्जा निर्मीतीवरुन प्रकल्पात स्नानासाठी गरम पाण्याची सोय वलाईट लाईट व्यवस्था.
07. प्रसाधन प्रकल्पापुढे प्रसन्न् बगीचा.

वरिल प्रमाणे सोयी सुविधा असलेली इमारत सुलभ इंटरनॅशनल यांना 30 वर्षेपर्यन्त् त्याचे सर्व सुरळीत व्यवस्थापण व दैनंदिन देखभाल (उदा. स्वच्छता, नळदुरुस्ती, दिव्यांची दुरुस्ती, स्वच्छता साहीत्य, तुटलेली सर्व सॅनेटरी फिटींग, लाद्या आदी बदलणे, खिडक्या व दरवाजांची दुरुस्ती, नोकरांची नेमणूक व त्यांचे पगार अदा करणे, नगरपंचायत कर भरणे.) इत्यादी यांची सर्व जबाबदारी मे. सुलभ इंटरनॅशनल यांच्याकडे दि.०१/०५/१९९६ रोजी झालेल्या करारनाम्यानुसार सोपविण्यात आली आहे.

तसेच संस्थानमार्फत सदर इमारतीस पाणी पुरवठा केला जातो. विद्युत आकाराबाबत मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार सुलभ इंटरनॅशनल यांचेकडून वसुल केला जात असून, सदरहू इमारतीमध्ये असलेली लॉकर व्यवस्था सध्या श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांचेमार्फत चालविणेत येत आहे.

सुलभ शौचालयाची सुविधा वापरणा-यांकडून सुलभ इंटरनॅशनल यांचेमार्फत घेण्यात येणारे सेवा शुल्क् खालील प्रमाणे स्विकारणेबाबत ठरले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 01. मुतारी | : | विनाशुल्क् | |
| 02. संडास वापरणेस प्रती व्यक्ती | : | रु. | 01.00 मात्र. |
| 03. बाथरुम वापरणेस प्रती व्यक्ती | : | रु. | 02.00 मात्र. |
| 04. बाथरुमसाठी (गरमपाणी) | : | रु. | 02.00 मात्र. |

संस्थानचे आरोग्य विभागामार्फत दररोज राउंड घेऊन स्वच्छता व इतर सोयी सुविधा बाबत पाहणी-आढावा चांगली स्थिती राहील याबाबत कार्यवाही करणेत येत आहे.

आता, सुलभ इंटरनॅशनल यांनी त्यांचेकडील दिनांक 03/11/2015 रोजीचे पत्रान्वये मुतारीचे साफ-सफाई साहीत्य, विद्युत आकार, कुशल अकुशल स्वयंसेवककाकडून काम करुन घेण्याचे खर्चामध्ये वाढ झाली असल्याने खालील प्रमाणे सुधारीत दर मिळणेबाबत विनंती केली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 01. पुरुष मुतारी | : | रु. | 01.00 मात्र |
| 02. संडास वापरणेस प्रती व्यक्ती | : | रु. | 04.00 मात्र. |
| 03. बाथरुम वापरणेस प्रती व्यक्ती | : | रु. | 05.00 मात्र. |

सुलभ इंटरनॅशनल यांनी वरीलप्रमाणे केलेले विंनती बाबत त्यांचेशी झालेले करारनाम्यानुसार सदरहू इमारतीमध्ये प्रसाधनगृह चालविणेसाठी त्यांचे समवेत 30 वर्षाचा करारनामा करणेत आलेला आहे. सदर करारनाम्यातील पान नं. 08 मधील अ. नं. 15 मध्ये खालील प्रमाणे नमूद आहे.

The complex will remain open for public use for 21 hours in a day. On pay and retained by the party of the second part. The charges to be so recovered and retained by the party of the second part from the users shall be at rates to be mutually settled from time to time by the parties to this agreement. Soap powder will be provided free of cost by sulabh international to users of W. C. S.

तरी सुलभ इंटरनॅशनल यांनी सादर केलेले विनंती नुसार प्रसाधनगृहामधील वापरावयाचे सुविधांसाठी आकारावयाचे शुल्क मध्ये दुपटीपेक्षा जास्त रकमेची वाढ मागणी केली आहे. सुलभ इंटरनॅशनल यांचे प्रतिनिधीशी याबाबत समक्ष चर्चा करुन सुधारीत शुल्काबाबत (पुरुष मुतारी-रु.1/-, संडास-रु.4/- व बाथरुमसाठी- रु.5/-) निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.६४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, जुने प्रसादालय परिसरामध्ये साईभक्तांच्या सोयीसाठी उभारणेत आलेल्या सुलभ प्रसाधनगृहामधील वापरावयाचे सुविधांसाठी सुलभ इंटरनॅशनल यांनी सध्या आकारणेत येत असलेल्या शुल्कामध्ये दुपटीपेक्षा जास्त रकमेची वाढ केलेली असल्यामुळे इतर सार्वजनिक ठिकाणी प्रसाधनगृह वापराबाबत किती शुल्क आकारले जाते, याचा तौलानिक अभ्यास करुन सविस्तर फेरप्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३०** **मौजे निमगाव को-हाळे गट नं.१६९ मध्ये वर्ग-०४ कर्मचारी निवासस्थान बांधकाम ठेकेदार मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांचे लवाद (Arbitration) वकील फी अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :**

01. अधिनियम 17 (2) (च) विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असे कोणतेही दावे, खटले व इतर कादेशीर कार्यवाही, न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा इतर प्राधिकरणामुळे दाखल करील व त्या संबंधात बचाव करील; अशी तरतुद आहे.

02. अधिनियम कलम 21 (1) (छ) कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकाकरणाचा किंवा कोणत्याही प्राधीकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही रकमांचे प्रदान; अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :**

01. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 19/07/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक 637.
02. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 27/02/2011 रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक 186.
03. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 08/10/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक 810.
04. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 23/05/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक 299.
05. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 03/08/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक 615.

**प्रस्तावना :** संस्थानचे मौजे निमगांव कोन्हाळे येथील गट नं. 169 मधील जागेत संस्थानचे वर्ग 04 कर्मचारी यांचे करीता निवासस्थानचे बांधकाम करण्यात आले आहे. ठेकेदार मे. अस्मिता इंडीया लि. व संस्थान यांचेमध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय येथे Arbitration application no 142/ 2010 वरील सुनावणी नुसार प्रस्तुत प्रकरणी Arbitration दि. 01 मार्च, 2012 पासुन चालू आहे.

प्रस्तुत प्रकरणी संस्थानचे वतीने सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ अॅड अमृत वेर्नेकर, मुंबई हे काम पहात असून, मा. मुंबई उच्च् न्यायालयाचे ऑर्डर नुसार Presiding Arbitrator म्हणून एफ. आय. रिबेलो, अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधिश व संस्थानचे वतीने Arbitrator डॉ. कृष्णभुषण एकनाथ महाशब्दे व वादी (Claimant) यांचेवतीने श्री. एन. ए. बढेका यांची नेमणूक करणेत आलेली आहे.

अस्मिता इंडीया लि., मुंबई यांनी रु. 2,07,50,441/- मात्र इतक्या रकमेचा क्लेम लवादाकडे दाखल केला आहे. संस्थानमार्फत रुपये 1,35,00,000/- मात्र रकमेचा काउंटर क्लेम करणेत आला असून प्रस्तुत प्रकरणी खालील तारखांना Arbiration च्या मिटींग झालेल्या आहेत.

| अ.नं. | तारीख | अ.नं. | तारीख |
|---|---|---|---|
| 01. | दि.01 मार्च, 2012 | 16. | दि.03 ऑक्टोबर, 2013 |
| 02. | दि.18 जुन, 2012 | 17. | दि.28 नोव्हेंबर, 2013 |
| 03. | दि.26 जूलै, 2012 | 18. | दि.12 फेब्रुवारी, 2014 |
| 04. | दि.21 ऑगस्ट्, 2012 | 19. | दि.17 जुन, 2014 |
| 05. | दि.22 ऑक्टोबर, 2012 | 20. | दि.16 सप्टेंबर, 2014 |
| 06. | दि.23 ऑक्टोबर, 2012 | 21. | दि.09 ऑक्टोबर, 2014 |
| 07. | दि.08 जानेवारी, 2013 | 22. | दि.16 फेब्रुवारी, 2015 |
| 08. | दि.09 जानेवारी, 2013 | 23. | दि.17 फेब्रुवारी, 2015 |
| 09. | दि.10 जानेवारी, 2013 | 24. | दि.27 जून, 2015 |
| 10. | दि.21 मार्च, 2013 | 25. | दि.10 ऑगस्ट्, 2015 |
| 11. | दि.17 जूलै, 2013 | 26. | दि.11 ऑगस्ट्, 2015 |
| 12. | दि.18 जूलै, 2013 | 27. | दि.12 ऑगस्ट्, 2015 |
| 13. | दि.07 ऑगस्ट्, 2013 | 28. | दि.13 ऑगस्ट्, 2015 |
| 14. | दि.08 ऑगस्ट्, 2013 | 29. | दि.30 सप्टेंबर, 2015 |
| 15. | दि.01 ऑक्टोबर, 2013 | | |

दोन्ही बाजूकडील Cross Examination पुर्ण झाले असून, दि.30 सप्टेंबर, 2015 रोजी Presiding Arbitrator यांनी Procedural Order Sheet No.36 खालील प्रमाणे केली आहे.

**PROCEDURAL ORDER SHEET NO.36.**

1. The hearing of oral arguments is concluded.

2 Respondents to file their Response to the Chart filed by the Claimants on or before 30th November, 2015.

3. Parties to file Written Arguments on or before 28th December, 2015.

वरील ऑर्डरमधील अ. नं. 02 नुसार वादी (Claimants) यांनी सादर केलेले Chart बाबतचा अहवाल तयार करुन अॅड. शानबाग यांचेमार्फत Arbitral Tribunal यांचेकडे सादर करणेत आला आहे. तसेच अ. नं. 03 नुसार सादर करावयाचे Written Arguments दि.28 डिसेंबर, 2015 पर्यंत सादर करणेत येत आहे.

सदरहू Arbitration आता अंतिम टप्प्यात आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि. 27/02/2011 रोजीचे सभेत निर्णय क्र. 186 अन्वये उपरोक्त कायदेशीर कारवाई करणेकामी अॅड. सचिन शानबाग व अॅड. अमृत वेरनेकर, मुंबई यांची नियुक्ती करणेस तसेच त्यांचे सल्ल्याने Arbiration ची नेमणूक करणेस व त्यांची फी अदा करणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी सदरहू लवादाबाबत संस्थानचे वतीने सचिन शानबाग व त्यांचें वरिष्ठ विधीज्ञ अमृत वेर्नेकर, मुंबई हे कायदेविषक काम पहात आहेत. प्रस्तुत लवादाच्या एकुण 48 बैठका झाल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणी संस्थानचे वतीने कायदेविषयक काम पहात असलेले सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ, अमृत वेर्नेकर, मुंबई यांनी खालील प्रमाणे कामकाज केले असून, करीत आहे.

01. मा. मुंबई उच्च न्यायालय येथे प्रस्तुत प्रकरणाच्या सुनावणीसाठी उपस्थित राहणे.

02. Presiding Arbitrator व Co- Arbitrator नेमणूकीसाठी वेळोवेळी न्यायालयात हजर राहणे व त्याच्या होणारे सुनावणीस अपील करणे.

03. Arbitration सुरु झालेनंतर त्यासाठी आवश्यक असणारे कागदपत्रांची वेळोवेळी पुर्तता करणे.

04. संस्थानचे वतीने Arbitration मध्ये सादर करावयाचा काउंटर क्लेम तयार करणे, उचित असे लिखीत स्टेटमेंट तयार करणे, व सर्व कागदपत्रांचे संग्रहन करुन 06 पुस्तके तयार करुन इ. कामे करणे.

05. Affidavit तयार करुन फाईल सादर करणे.

06. Arbitration hearings साठी उपस्थित राहणे व संस्थानमार्फत बाजू मांडणे.

07. Arbitration hearings पुर्वी व नंतर आवश्यक माहिती तयार करणे.

प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी नेमलेले Presiding Arbitrator, Hon'ble Justice F.I. Rebello (Retd.) Former Chife Justice High Court Of Allahabad & Co- Arbitrators, Shri. N. A. Badheka & Dr. K.E. Mahashabde यांना आजपावेतो एकुण रु.46,66,215/- मात्र इतकी फी व अॅड. सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ, अमृत वेर्नेकर, मुंबई यांना आजपावेतो रु. 24,75,950/- मात्र इतकी फी अदा करणेत आली आहे.

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 03 ऑगस्ट, 2014 रोजीचे सभेत अॅड. सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ अॅड. अमृत वेर्नेकर यांचे फी बाबत त्यांचेशी चर्चा करुन निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरचे सभेत निर्णय क्र. 615 खालील प्रमाणे झालेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. 169 मध्ये वर्ग 04 कर्मचारी निवास्थान बांधकामाचे ठेकेदार मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचे लवादाबाबत चर्चा करणेसाठी अॅड. शानबाग आजचे सभेत उपस्थित होते, समितीने त्यांचेबरोबर वकील फी व लवाद प्रकरण याबाबत चर्चा झाली. वकील फीचे दर पूर्वी ठरलेले आहेत असे दिसते. परंतू प्रकरणाची अद्याप निर्गती (Decision) झालेला नाही. तेंव्हा श्री. शानबाग यांचेकडे विचारणा करता 8-9 सिटींगमध्ये पुर्ण होईल असे त्यांनी सांगीतले. त्यावरुन समितीने असा निर्णय घेतला की, श्री. शानबाग यांना यापुढे जास्तीत जास्त 10 सिटींगची फी पूर्वीचे दराने द्यावी, तो पर्यंतही प्रकरणाची निर्गती (Decision) झाली नाही तर फीचे बाबतीत त्यांना वाटाघाटीसाठी बोलविणेत यावे.

तसेच अॅड. शानबाग यांचेकडून पुढील कालावधीच्या फीचे दराबाबत मागणीपत्रक घेण्यात यावे व सध्या त्यांनी मागणी केलेल्या रु.8,85,000/- मात्र वकील फी पैकी 50% रक्कम रु.4,42,500/- मात्र त्यांना आदा करणेत यावी असे ठरले."

मा. व्यवस्थापन समितीचे दि.03/08/2015 रोजीचे सभेतील निर्णयानंतर एकुण 18 सिटींग झाल्या आहेत. अॅड. शानबाग यांना त्यांनी मागणी केलेल्या रु.8,85,000/- मात्र वकील फी पैकी 50% रक्कम रु.4,42,500/- मात्र व त्यापुढील 08 सिटींगची फी अदा करणेत आली असून, उर्वरीत 02 सिटींगची फी अदा करणेबाबत कार्यवाही करणेत येत आहे.

आता, अॅड. शानबाग यांनी त्यांचेकडील दि.27/11/2015 रोजीचे पत्रान्वये प्रस्तुत लवादाचे सिटींगसाठी केलेल्या कामांचे व 08 सिटींगचे खालील प्रमाणे बिले सादर केली आहेत.

| Sr. No. | Decripaction | Total Arbitratio Meeting | Fees Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | Attending the Arbitration Meeting before the Arbitral Tribunal for final Arguments On<br>01. Dated 11th August 2015 from 11:00 a.m. | 8.00 | 50,000/- | 4,00,000/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | to 2:00 p.m. & 3:00 p.m. to 5:30 p.m. (Two sessions).<br>02. Dated 12th August 2015 from 11:00 a.m. to 2:00 p.m. & 3:00 p.m. to 5:30 p.m. (Two sessions).<br>03. Dated 13th August 2015 from 11:00 a.m. to 2:00 p.m. & 3:00 p.m. to 5:30 p.m. (Two sessions).<br>04. Dated 30th September 2015 from 11:00 a.m. to 2:00 p.m. & 3:00 p.m. to 5:30 p.m. (Two sessions). | | | |
| 2. | For venue Charges, Steno typing charges, Tea and Snacks etc. Arbitration meeting Fort, Mumbai for the following dates<br>01. Dated 11th August 2015 from 11:00 a.m. to 2:00 p.m. & 3:00 p.m. to 5:30 p.m. (Two sessions).<br>02. Dated 12th August 2015 from 11:00 a.m. to 2:00 p.m. & 3:00 p.m. to 5:30 p.m. (Two sessions).<br>03. Dated 13th August 2015 from 11:00 a.m. to 2:00 p.m. & 3:00 p.m. to 5:30 p.m. (Two sessions).<br>04. Dated 30th September 2015 from 11:00 a.m. to 2:00 p.m. & 3:00 p.m. to 5:30 p.m. (Two sessions). | Per day @ of Rs.5000/- For 1 days Total 04 days | 5,000/- | 20,000/- |
| 3. | Holding conference with senior Counsels chamber on following dates for preparing the line of Arguments and compilation of Exhibits<br>03. Dated 9th August, 2015 (From 11 a.m. to. 5 p. m. (Two session)<br>04. Dated 12th August, 2015 (From 5.30 p.m. to.9.30 p. m. (One session)<br>05. Dated 29th September 2015 from 4:00 p.m. to 8:00 p.m. (OneTwo sessions). | | 40,000/Per sessions (Total 04 sessions) | 1,60,000/- |
| | | | **Total Bill Amount** | **5,80,000/-** |

तरी मा. त्रिसदस्य समितीचे दि.03/08/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 615 नुसार प्रस्तुत प्रकरणी 10 सिटींग होऊनही निर्गती (Decision) झाली नसल्याने, वरील प्रमाणे उर्वरीत 08 सिटींग व त्यासाठी केलेले कामांचे व त्यापुढील होणारे सिटींगची फी अदा करणेबाबत अॅड. सचिन शानबाग, मुंबई यांना अदा करणेबाबत व फीचे बाबतीत वाटाघाटीसाठी त्यांना मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे बोलविणेत येऊन, त्यांचेशी चर्चा करुन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.६४८ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, अॅड. सचिन शानबाग, मुंबई यांना सदरहू प्रकरणाच्या प्रगती अहवालासह पुढील सभेपुढे बोलविणेत यावे. तोपर्यंत त्यांच्या फीची रक्कम आदा करणेत येऊ नये.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

विषय नं.३१ **श्री साईनाथ रुग्णालयातील एम एस खिडक्यांऐवजी अॅल्युमिनियम स्लायडींग विंडो बसविणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय :** मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक १५/०३/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.१९१ खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील एम. एस. खिडक्यांऐवजी अॅल्युमिनियम स्लायडींग विंडो बसविणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२०,८३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच, याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च् न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले."

**मा. मुंबई उच्च् न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश. :** C.A. No. 8699 of 2014 In P.I.L. NO. 18 of 2011 dt. 26/09/2014 अन्वये परवानगी मिळालेली आहे.

**प्रस्तावना :** श्री साईनाथ रुग्णालय इमारतीस असलेल्या खिडक्यांपैकी ९२ नग खिडक्याना ॲल्युमिनिअम स्लायडींग विंडो बसविण्यात आलेले असून, उर्वरीत २९२ खिडक्या ह्या काचेचे शटर असलेल्या एम. एस. ओपनेबल आहे. सदरचे खिडक्यांमधून डासांचा प्रादुर्भाव होत असल्याने रुग्णालय इमारतीच्या उर्वरीत सर्व खिडक्या ॲल्युमिनिअम स्लायडींग बसविणेकामी ठेकेदार मे. एम. बी. शेख, अहमदनगर यांना दि. १६/०९/२०१५ अन्वये रु.१६,५४,५२७/- मात्र रकमेचा कार्यादेश देणेत आलेला असून, सदर कामाची मुदत दि.२३/०९/२०१५ ते दि.२२/१२/२०१५ अखेर ०३ महिने आहे.
**प्रस्ताव :** विषयांकीत कामाचे निविदेमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे अहमदनगर जिल्हा दरसूची २०१३-१४ मधील स्पेसिफीकेशननुसार थ्री ट्रॅक ॲल्युमिनीअम खिडक्या तयार करुन बसविणे व याकामी ॲल्युमिनियम मटेरिअल जिंदाल अथवा समकक्ष कंपनीचे व काच मोदीफ्लोट / सेंट गोबेन अथवा समकक्ष कंपनीची वापरणेची तरतुद असुन निविदा स्पेसिफिकेशन्स खालीलप्रमाणे आहेत.

" Supplying and fixing in position aluminium extruded section three track sliding window up to 1.5 meter height, outer frame made from section of overall size 92 mm x 45 mm bottom section with or without drains track section weighing 0.901 kg per running meter and top and side section weighing 0.838 kg per running meter with shutters of sections made of 19 mm x 40 mm size having average weight of 0.6 kg per running meter (or as per required size with change in proportionate weight) with 5.5 mm selected quality plain sheet glass fixed with nylon encased stainless rollers, necessary locks and handles etc. complete. (i) Powder coated. DSR Page No. 61, Item No. 44-b, Spec. No. As directed by Engineer-in-charge. (Deviated) "

ठेकेदार मे. एम. बी. शेख, अहमदनगर यांनी त्यांचेकडील दि.०२/११/२०१५ व दि.१८/११/२०१५ रोजीचे पत्राने जिंदाल कंपनीचे मटेरिअल उत्पादनाचे वजन व माप कमी अधिक प्रमाणात आढळून आले असल्याचे कळवून खालील प्रमाणे विनंती केली आहे.

*"... कामासाठी लागणारे मटेरिअल मार्केटमध्ये उपलब्ध नसल्याने गेली दोन महिन्यापासून आम्ही पुणे, मुंबई, नाशिकच्या मार्केटमध्ये चौकशी केली परंतू सदरील जिंदाल कंपनीचे मटेरिअल उत्पादनाचे वजन व माप कमी अधिक प्रमाणात आढळून आले आहे. तरी आपल्या टेंडर प्रमाणापेक्षा आम्ही देणारे जिंदाल कंपनीचे मटेरिअलचे वजन १.०३६ ग्रॅमने जास्त आहे. हे वजन देण्यास आम्हांस परवडत नाही परंतू बाबांचे काम असल्याने आम्ही तो तोटा सहन करण्यास तयार आहोत व सदरील काम करुन देण्यास आम्ही तयार आहोत.*

*तसेच याकामासाठी लागणारी ५ .५ एम. एम. ची काच मार्केटमध्ये उपलब्ध नसल्याने, ५ एम. एम. ची काच वापरण्याची परवानगी द्यावी व येणा-या दराचा फरक आम्हाला मान्य होईल."*

तसेच दि.१७/१२/२०१५ रोजीचे पत्राने ठेकेदार यांनी सदर कामासाठी लागणारे मटेरियल मार्केटमध्ये उपलब्ध नसल्याने काम पूर्ण करण्यासाठी दोन महिने मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे.

निविदेतील स्पेसिफीकेशननुसार १.२०मी.x १.२०मी. साईजच्या एका खिडकीचे वजन १०.४३२ कि.ग्रॅ. (७.२४४ कि.ग्रॅ./चौ.मी.) येते. ठेकेदार यांनी त्याचे पत्रात नमुद केल्यानुसार एका खिडकीचे वजन ११.४० कि.ग्रॅ. (७.९१७ कि.ग्रॅ./चौ.मी.) होण्याची शक्यता असल्याने एका खिडकीचे वजनात ०.९६८ कि.ग्रॅ. इतकी वाढ होण्याची शक्यता आहे.

उपरोक्त प्रमाणे निविदेतील सेक्शनचे वजनापेक्षा जादा वजनाचे ॲल्युमिनीअम सेक्शन वापरुन काम करणेस ठेकेदार यांनी सहमती दर्शविली असुन त्यासाठी येणा-या अतिरीक्त खर्चाची मागणी ठेकेदार करणार नसल्याचे कळविले आहे.

तरी ठेकेदार यांचे विनंतीनुसार उपरोक्त प्रमाणे ॲल्युमिनीअम सेक्शन व काच वापरुन सदरचे काम करुन घेणेस मान्यता मिळणेस तसेच सदरहु काम प्रत्यक्ष सुरु झाल्यानंतर ठेकेदार यांना कामासाठी दोन महिने मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६४९ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील एम.एस. खिडक्यांऐवजी ॲल्युमिनीअम स्लायडींग विंडो बसविणेकामी विहित पध्दतीने फेरनिविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.३२ **महत्वाच्या/ अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी भक्तनिवास इमारतींचे बांधकाम करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः** अधिनियमाचे कलम २१ (१) मधील पोट कलम (त्र) अन्वये भक्तांचे निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना-** श्री क्षेत्र शिर्डी येथे श्रीं चे दर्शनासाठी दररोज हजारो साईभक्त देश विदेशातून येत असतात. तसेच श्रीरामनवमी, श्री गुरुपौर्णीमा व श्री पुण्यतिथी या तिन उत्सवां बरोबर दिपावली, नाताळ, नववर्षामध्ये उन्हाळयाचे कालावधी तर लाखोच्या संख्येने साईभक्त शिर्डी येथे येत असतात. साईभक्तांचे सोयीसाठी (निवास व्यवस्थेसाठी) साईप्रसाद निवासस्थान, साई धर्मशाळा, साई आश्रम, व्दारावती भक्तनिवास, साईनिवास अतिथीगृह व साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) या ठिकाणी निवासव्यवस्था करणेत येत असते.

शिर्डी येथे येणारे साईभक्तांचे सोयीसाठी सेंट्रल रेल्वेतर्फे साईनगर रेल्वे स्थानकाची निर्मीती करणेत आलेली असून, भारताच्या काना-कोप-यातून श्रींचे दर्शनासाठी येणा-या भक्तांची गर्दी ही दिवसें दिवस वाढत असून, नविन रेल्वे

गाड्यांचे प्रमाणही वाढलेले आहे. तसेच शिर्डीसाठी महाराष्ट्र शासनाने विमानतळाची उभारणीचे काम मौजे काकडी येथे हाती घेतले असून, सदरहु काम अंतिम टप्यात असून लवकरच हवाई सेवा सुरु होणार असल्याने त्यामुळे शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी विदेशातून येणारे साई भक्तांचे संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होणे अपेक्षीत आहे. करीता त्यांना चांगल्या दर्जाची निवास व्यवस्था होणे गरेजेचे आहे. सध्या त्यांचे निवासासाठी संस्थानकडे पुरेशी निवास व्यवस्था उपलब्ध नसलेने ते खाजगी हॉटेलचा वापर करतात.

**प्रस्ताव-** शिर्डी येथे विदेशातून (NRI) येणारे साईभक्तांचे निवासव्यवस्थेसाठी उच्च दर्जाचे (सर्व सोयी सुविधांयुक्त असे) निवासस्थानांचे बांधकाम करणे आवश्यक आहे. त्यामुळे विदेशातून येणारे साईभक्त किमान दोन तिन दिवस सदर निवास्थानमध्ये राहतील. सदरचे निवासस्थानांचे बांधकाम संस्थानचे मौजे निमगांव-को-हाळे येथील गट १८६ मध्ये करुन घेता येतील, तुयामध्ये खालील काही ठळक बाबींचा समावेश करता येईल.

A & B Type Bhaktaniwas (G + 4) including Parking:

- लिव्हींग रुम, बेडरुम, किचन, व्हरांडा, टॉयलेट व बाथरुम इ. सुविधा असलेल्या १९२ सदनिका.
- इंटेरिअर व फर्निचर
- लिफ्ट (उद्वाहक).
- संरक्षक भिंत, लॅण्डस्केपींग इ.

सदर प्रकल्पासाठी ढोबळ अंदाजपत्रकानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Details | Amount (Crs.) |
|---|---|---|
| 01. | **A Type Bhaktaniwas (G + 4) including Parking:**<br>I) Flats / Rooms on each floor = 24.<br>II) Total Flats / Rooms = 96.<br>III) Area of One Flat = 49.52 Sqm (533.00 Sq. Ft.)<br>IV) Total Builtup Area = 6668 Sqm.<br>V) Approx. Rate = Rs.21520/- Per Sqm. | 14.35 |
| 02. | **B Type Bhaktaniwas (G + 4) including Parking:**<br>I) Flats / Rooms on each floor = 24.<br>II) Total Flats / Rooms = 96.<br>III) Area of One Flat = 45.24 Sqm (487.00 Sq. Ft.)<br>IV) Total Builtup Area = 5884 Sqm.<br>V) Approx. Rate = Rs.21520/- Per Sqm. | 12.66 |
| 03. | Architect Fee @ 2.5% (On 01 & 02) | 0.68 |
| 04. | Interior & Furniture @ Rs.2,00,000/- per flat | 3.84 |
| | **Total Amount:** | **31.53 Crores** |

विषयांकीत प्रकल्पासाठी वरीलप्रमाणे ढोबळमानाने रु.३१.५३ कोटी मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी याकामी येणारे खर्चास व सदरहू कामी आर्किटेक्ट संस्थेची नेमणूक करुन, त्यांचेकडून सविस्तर बांधकाम आराखडे व अंदाजपत्रके तयार करुन घेता येईल. तसेच संस्थानने शेती महामंडळाकडून भूसंपादनाने घेतल्या जमिनी हरित पट्यात असल्याने, त्या रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबतचा प्रस्ताव शासनाचे नगर विकास विभागाकडे सादर करणेत आलेला असून, त्यावर शासनस्तरावर कार्यवाही चालू आहे. त्यामध्ये गट नं. १८६ चा समावेश असून, सदर क्षेत्राचा रहिवास विभागात समाविष्ट झालेनंतर सदरहू प्रकल्प हाती घेता येईल.

तरी सध्या उपरोक्त प्रकल्पास तत्वतः मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महत्वाच्या/ अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी भक्तनिवास इमारतींचे बांधकाम करणेसाठी तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी टाटा कन्सल्टींग इजिनियर्स लि. यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेत येऊन, त्यांचेकडून सविस्तर बांधकाम आराखडे व अंदाजपत्रके तयार करुन घेण्यात यावे. परंतु याकामी टाटा कन्सल्टींग इजिनियर्स लि. तयार नसलेस आर्किटेक्ट कन्सल्टंट नेमणूकीसाठी निविदा काढणेत याव्यात. तसेच या भक्तनिवास बांधकामासाठीच्या खर्चास साईभक्तांना आवाहन करणेत येऊन, "नवीन इमारत बांधकाम निधी योजना" सुरु करणेकामी सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख/ मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३३** **नवीन भांडार इमारतीचे बांधकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम 2004 मधील तरतुद:** अधिनियम कलम 21 (1) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 06 एप्रिल, 2012 रोजीचे सभेत निर्णय क्रमांक 318 खालील प्रमाणे झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीच्या स.नं.124 पैकी मधील सध्याचे मध्यवर्ती भांडार इमारती लगत मोकळया असलेल्या जागेत तळमजला अधिक दोन मजले असलेल्या नविन मध्यवर्ती भांडार इमारतीचे बांधकाम करण्यात यावे. याकामी मा.कार्यकारी अधिकारी यांनी या क्षेत्रातील विशेषतः स्टोअर मॅनेजमेंट क्षेत्रातील अनुभवी वास्तू विशारदांची नेमणूक करावी. सदर वास्तू विशारदांकडून प्रथमतः प्राथमिक बांधकाम आराखडे व बांधकाम खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात यावे व ते मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करण्यात यावे, असे ठरले."

**प्रस्तावना:** संस्थानचे स.नं.124 मधील जागेत मध्यवर्ती भांडार इमारत सन 2002 मध्ये बांधण्यात आलेली आहे. सदर इमारत ६५ मी. X २८.५० मी. आकाराची असून आर.सी.सी. कॉलमवर लोखंडी कैच्या (Truss) वर जी.आय. पत्रे वापरुन करणेत आली आहे. संस्थानचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. त्यादृष्टीने नवीन भांडार इमारत बांधणे आवश्यक असल्याने भांडार विभागाने दि.१२.०१.२०१२ चे पत्रान्वये अन्नधान्य, किराणा माल तसेच संस्थान प्रकाशित पुस्तके/ फोटो ठवणेकामी सिमेंट शीटचे छत असलेली भांडार इमारत बांधकाम करणेबाबत कळविले होते.

सदरचे जागेत सुमारे ४५ मी. X ३० मी. आकाराची तळमजला अधिक दोन मजले अशी इमारत बांधल्यास अतिरिक्त जागा उपलब्ध होईल. अन्नधान्य, किराणा माल तळमजल्यावर ठेवता येईल. वरच्या मजल्यावर पुस्तके, रुग्णालयाकडील औषधे, रेकॉर्ड आदि मटेरियल ठेवता येईल तसेच सदरची इमारत बांधकामाचे वेळी परिसराचे साफसफाईचे दृष्टीने कॉक्रीटीकरण अथवा पेव्हिंग ब्लॉक बसविणे आदि कामांचा समावेश सदरचे निविदेत करता येईल. याकामी तळमजला अधिक दोन मजले नवीन भांडार इमारत बांधकाम करणेसाठी (बांधकाम क्षेत्रफळ १३५० x ३ = ४०५० चौ.मी. x २१,०००) = रु.८,५०,५०,०००/- खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयाने मान्यता देण्यात आली आहे.

**प्रस्ताव:** इकडील दि.21/07/2013 रोजीचे टिपणी अन्वये सदरहु कामाचे बांधकाम आराखडे व अंदाजपत्रके तयार करणेकामी आर्कीटेक्ट काबरे चौधरी नाशिक यांचेकडून आर्कीटेक्चरल सेवा घेणेकामी प्रस्तावीत करणेत आले होते. त्यावर तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी *"N.A. झालेनंतर Architect नेमावे व पूढील कार्यवाहीसाठी सादर करावे"* असे निर्देश दिल्याने सदरहु क्षेत्राचे बिनशेती प्रस्तावाबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

करिता सदरहु क्षेत्र बिनशेती झाल्यानंतर नविन भांडार इमारत बांधकाम करणेकामी पुढील कार्यवाही करता येईल. सदरहु कामाचा समावेश श्रींचे महाशताब्दी निमित्त करावयाचे कामात असल्याने याकामी येणारे अंदाजे रु.8,50,50,000/- खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगीसाठी अर्ज सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, नवीन भांडार इमारतीचे बांधकाम करणेस तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी प्रथमतः टाटा कन्सल्टींग इजिनियर्स लि. यांची आर्किटेक्ट नेमणूक करणेत येऊन, भांडारासाठीची जागा निश्चित करावी व संस्थानमधील सर्व भाडारगृहांचे त्या ठिकाणी बांधकाम करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३४** **मौजे रुई येथे अध्यात्मिक शैक्षणिक संकुल विकास प्रकल्प उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५/१२/२०१० रोजीचे सभेत निर्णय क्रमांक १००४ (०४) खालील प्रमाणे झालेला आहे.

".. राधा कलियनदास दर्यानानी चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई यांनी मौजे रुई, ता. राहाता येथील विनामोबदला बक्षिस पत्राने दिलेल्या जमिनीपैकी अंदाजे १० एकर जमिनीत उभारावयाचे आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे, पुणे यांनी सादर केलेल्या शैक्षणिक व आध्यात्मिक संकुलाचे बांधकाम आराखड्यास प्राथमिक मान्यता देण्यात आलेली असून, आर्किटेक्ट यांनी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेस सुरुवात केलेली आहे. या शैक्षणिक व आध्यात्मिक संकुलाचे बांधकामासाठी दर्यानानी ट्रस्ट, मुंबई हे देणगीदाखल खर्च करणेस तयार आहेत. दर्यानानी ट्रस्ट, मुंबई यांची सदरहू विनंती मान्य करण्यात यावी असे ठरले.

त्याच अनुषंगाने मौजे रुई येथील बक्षिसपत्राने मिळालेल्या उर्वरीत जमिनीत साईसृष्टी प्रकल्प उभारणेत यावा. त्यासाठी प्रसिध्द कलानेपथ्थकार नितिन देसाई यांची नेमणूक करण्यात यावी. याकामी श्री. नितिन देसाई यांचेशी संपर्क साधुन साईसृष्टी उभारणेसाठी प्रकल्प अहवाल तयार करुन घेणेची कार्यवाही करणेत यावी असे ठरले."

**प्रस्तावना:** उपरोक्त निर्णयानुसार सदरहु क्षेत्रात साईबाबांचे आचार-विचार व शिकवणींचा प्रचार प्रसार करणेसाठी अध्यात्मिक व शैक्षणिक संकुल उभारणी प्रस्तावित आहे. याकामी तज्ञ सल्लागार द ऑडी ग्रुप, पुणे यांचेकडून प्रकल्पाचे आराखडे तयार करणेत आलेले आहे. तथापि, सदरहु क्षेत्र हरित क्षेत्रातून (Green zone) वगळून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे विविध सार्वजनिक/ निमसार्वजनिक उपक्रमांचे वापरासाठी रहिवास क्षेत्रात समाविष्ट करणेसाठी दि.२८/१२/२०१०चे पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असुन, त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही. तसेच राधा कलियनदास दर्यानानी ट्रस्ट मुंबई यांचे समवेत अद्याप करारनामा झालेला नाही.

श्री क्षेत्र शिर्डी ता. राहाता, जिल्हा अहमदनगर येथील थोर संत श्री साईबाबा यांच्या महासमाधिस सन २०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होणार आहेत. त्या निमीत्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा महासमाधि शताब्दी वर्ष दि.०१/१०/२०१७ ते दि.१८/१०/२०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करणेत येणार आहे. शतक महोत्सवी पुण्यतिथीचे मुख्य दिवशी सुमारे २० लक्ष व महोत्सवाचे इतर दिवशी असे एकुण ४० लक्ष भक्त येतील व वर्षभरात इतर उत्सवांना सुमारे २० ते २५ लक्ष साईभक्त साईबाबांचे दर्शनार्थ भेट देतील असा अंदाज आहे. त्यासाठी शिर्डी शहर व परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा करणे व नविन प्रकल्प उभारणे आवश्यक आहे. याकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन, विधीव न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३/ प्र.क्र.०१/का. १६ दि.२२/१०/२०१३ चे अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली अंतिम कृती आराखडा तयार करण्यासाठी समिती गठीत केलेली आहे. या समितीची बैठक शुक्रवार दि.११/१२/२०१५ रोजी विधान भवन, नागपूर येथे मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली आहे. वर नमूद केलेप्रमाणे कृती आराखडा समितीचे बैठकीत उपरोक्त विषयाबाबत सादरीकरण करणेत आलेले आहे.

**प्रस्ताव :** मौजे रुई येथिल गट नं.२९३ मधील राधा कलियनदास दर्यानानी ट्रस्ट मुंबई याचेकडून संस्थानला बक्षिसपत्राने मिळालेले क्षेत्र हरित क्षेत्रातून (Green zone) वगळून रहिवास क्षेत्रात समाविष्ट करणेबाबतची कार्यवाही पूर्ण झालेनंतर, तसेच राधा कलियनदास दर्यानानी ट्रस्ट, मुंबई यांचेसमवेत करारनामा झालेनंतर याबाबत पुढील कार्यवाही करता येईल.

तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु.७,१५,००,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता मिळणेस व याकामी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगीसाठी सिव्हील अर्ज सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मौजे रुई येथे अध्यात्मिक शैक्षणिक संकुल विकास प्रकल्प उभारणेस तत्वतः मान्यता देण्यात आली. श्रींच्या महासमाधी शताब्दीमधील विकास कामांचा आराखडा तयार करणेसाठी टाटा कन्सल्टींग इजिनियर्स लि., मुंबई यांची सल्लागार म्हणून नेमणूक करावयाची असून विषयांकीत कामही त्याच आराखडयाचा भाग असल्यामुळे याबाबत टाटा कन्सल्टींग इजिनियर्स लि., मुंबई यांचेकडून आराखडा व अंदापत्रक तयार करणेत यावे व त्याकामी येणा-या खर्चास एकत्रित मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३५** **मौजे रुई येथे साईसृष्टी प्रकल्प उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५/१२/२०१० रोजीचे सभेत निर्णय क्रमांक १००४ (०४) खालील प्रमाणे झालेला आहे.

"... राधा कलियनदास दर्यानानी चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई यांनी मौजे रुई, ता. राहाता येथील विनामोबदला बक्षिस पत्राने दिलेल्या जमिनीपैकी अंदाजे १० एकर जमिनीत उभारावयाचे आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे, पुणे यांनी सादर केलेल्या शैक्षणिक व आध्यात्मिक संकुलाचे बांधकाम आराखड्यास प्राथमिक मान्यता देण्यात आलेली असून, आर्किटेक्ट यांनी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेस सुरुवात केलेली आहे. या शैक्षणिक व आध्यात्मिक संकुलाचे बांधकामासाठी दर्यानानी ट्रस्ट, मुंबई हे देणगीदाखल खर्च करणेस तयार आहेत. दर्यानानी ट्रस्ट, मुंबई यांची सदरहू विनंती मान्य करण्यात यावी असे ठरले.

त्याच अनुषंगाने मौजे रुई येथील बक्षिसपत्राने मिळालेल्या उर्वरीत जमिनीत साईसृष्टी प्रकल्प उभारणेत यावा. त्यासाठी प्रसिध्द कलानेपथ्यकार नितिन देसाई यांची नेमणूक करण्यात यावी. याकामी श्री. नितिन देसाई यांचेशी संपर्क साधुन साईसृष्टी उभारणेसाठी प्रकल्प अहवाल तयार करुन घेणेची कार्यवाही करणेत यावी असे ठरले."

**प्रस्तावना :** या प्रकल्पात श्रीं चे जिवनावर अधारीत चलचित्र स्वरुपातील देखावे, लाईट व साऊंड इफेक्टसह सादर करण्यात येणार आहे. तसेच यामध्ये साईभक्तांचे सोयीसाठी ग्रंथालय, मेडीटेशन हॉल, उपहारगृह, स्वच्छतागृह इत्यादी सुविधा निर्माण करण्यात येणार आहे. सदरहु साईसृष्टी प्रकल्पासाठी रु.३५ कोटी खर्च अपेक्षित आहे.

सदरहु क्षेत्र हरित क्षेत्रातून (Green zone) वगळून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे विविध सार्वजनिक / निमसार्वजनिक उपक्रमांचे वापरासाठी रहिवास क्षेत्रात समाविष्ट करणेसाठी दि.२८/१२/२०१०चे पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असुन, त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही. दरम्यान दि.०३/१२/२०१५ रोजी शिर्डी येथे मा. कार्यकारी अधिकारी व मा. उपकार्यकारी अधिकारी यांचेसमवेत श्री. नितिन देसाई यांचे झालेल्या चर्चेदरम्यान वर नमूद जागा अहमदनगर-मनमाड रस्त्यापासून दुर असल्याने व येणे-जाणेच्या दृष्टीने गैरसोयीची असल्याने साईसृष्टी प्रकल्प या जागे ऐवजी साई गार्डन येथे करणेत यावा असे सुचविले आहे.

**प्रस्तावः** श्री क्षेत्र शिर्डी ता. राहाता, जिल्हा अहमदनगर येथील थोर संत श्री साईबाबा यांच्या महासमाधिस सन २०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होणार आहेत. त्या निमीत्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा महासमाधि शताब्दी वर्ष दि.०१/१०/२०१७ ते दि.१८/१०/२०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करणेत येणार आहे. शतक महोत्सवी पुण्यतिथीचे मुख्य दिवशी सुमारे २० लक्ष व महोत्सवाचे इतर दिवशी असे एकुण ४० लक्ष भक्त येतील व वर्षभरात इतर उत्सवांना सुमारे २० ते २५ लक्ष साईभक्त साईबाबांचे दर्शनार्थ भेट देतील असा अंदाज आहे. त्यासाठी शिर्डी शहर व

परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा करणे व नविन प्रकल्प उभारणे आवश्यक आहे. याकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन, विधीव न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३/ प्र.क्र.०१/का. १६ दि.२२/१०/२०१३ चे अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली अंतिम कृती आराखडा तयार करण्यासाठी समिती गठीत केलेली आहे. या समितीची बैठक शुक्रवार दि.११/१२/२०१५ रोजी विधान भवन, नागपूर येथे मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली आहे. वर नमूद केलेप्रमाणे कृती आराखडा समितीचे बैठकीत उपरोक्त विषयाबाबत सादरीकरण करणेत आलेले आहे.

सदरहु प्रकल्प हा साई गार्डनमधिल जागेत करता येईल. तरी साईसृष्टी प्रकल्प साईगार्डन मधिल जागेत उभारणेस व त्यासाठी श्री. नितिन देसाई यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेसाठी तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगीकरीता सिव्हील अर्ज दाखल करणेसाठी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.६५३ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावित प्रकल्पामध्ये प्रामुख्याने श्री साई सच्चरित ग्रंथातील प्रसंगावर आधारित देखावे तसेच मुर्त्या उभारणे अशा कलात्मक स्वरुपाच्या कामाचा समावेश असल्यामुळे तत्कालीन व्यवस्थापन समितीने या प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून सिनेसृष्टीतील आघाडीचे व सुप्रसिध्द कला नेमथ्यकार श्री.नितीन देसाई यांची नेमणूक केलेली आहे. तरी आता प्रस्तावित प्रकल्प साईगार्डनमधील जागेत करणेसाठी श्री.नितीन देसाई यांचेकडून आराखडा व अंदाजपत्रक तयार करुन त्यानुसार येणा-या अनुषंगीक खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.३६ शौचालय, स्नानगृहे, तात्पुरते निवारा शेडस् वाहनतळे व कॅम्पींग ग्राऊंड विकसीत करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद –**

१) अधिनियमाचे कलम १७ (१) नुसार, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मीक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील, अशी तरतूद आहे.

२) अधिनियमाचे कलम २१(१) मधील खंड (ग) अन्वये, "भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे "

३) अधिनियमाचे कलम २१ (१) मधील खंड (घ) अन्वये, " भक्तांना जेवण देणे आणि अन्नछत्र चालवणे अशी तरतूद आहे. "

- **मा उच्च न्यायालयाचे आदेश –**

पी.आय.एल.१८/२०११ मधील सिव्हील अर्ज क्र. १२०५६/२०१२ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.१६/१०/२०१२ रोजीचे आदेशान्वये मा. उच्च न्यायालयाचे पूर्वपरवानगी शिवाय समितीने मोठया स्वरुपाचे आर्थिक निर्णय घेऊ नयेत असे निर्देश दिलेले आहेत.

- **प्रस्तावना –**

श्री क्षेत्र शिर्डी, ता. राहाता, जिल्हा. अहमदनगर येथील थोर संत श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. शतक महोत्सवी पुण्यतिथीचे मुख्य दिवशी सुमारे २० लक्ष व महोत्सवाचे इतर दिवशी असे एकूण सुमारे ४० लक्ष भक्त येतील व वर्षभरात इतर उत्सवांना सुमारे २० ते २५ लक्ष साईभक्त साईबाबांचे दर्शनार्थ भेट देतील असा अंदाज आहे. त्यासाठी शिर्डी शहर व परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये मोठया प्रमाणावर सुधारणा करणे व नविन प्रकल्प उभारणे अत्यावश्यक आहे. याकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/ प्र.क्र.०१/का.१६ दि.२२/१०/२०१३ चे अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली अंतिम कृती आराखडा तयार करण्यासाठी समिती गठीत केलेली आहे. या समितीची बैठक शुक्रवार दि.११/१२/२०१५ रोजी विधान भवन, नागपूर येथे मा. ना. श्री देवेंद्र फडवणीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली आहे.

सदर बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष सन २०१७-१८ चे कालावधीत होणा-या गर्दीचे अनुषंगाने व आपत्ती व्यवस्थापनाचे दृष्टीकोनातून साईभक्तांचे सोयीसाठी वाहनतळे विकसीत करुन सदर वाहनतळांवर खालील व्यवस्था करणे गरजेचे आहे.

१) शिर्डी व लगतचे परिसरातील खाजगी मालकीच्या व महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मालकीच्या वाहनतळास अनुकूल अशा सुमारे २०० ते २५० एकर जमिनी अधिग्रहीत करुन त्यावर पार्कींग वाहनतळे विकसीत करणे. यासाठी जागेच्या सपाटीकरणासह मुरुमीकरण करुन अंतर्गत रस्ते विकसीत करणे.

२) विकसीत केलेल्या वाहनतळांवर साईभक्तांना निवा-यासाठी पत्र्याचे छत असलेले निवाराशेडस् उभारुन तिनही बाजूने बंदीस्त करणे तसेच बॅरेकेडींग, पत्रा पार्टीशन करणे.

३) वाहनतळांचे व्यवस्थेचे ठिकाणी साईभक्तांचे सोईसाठी पिण्याचे पाण्याचे व्यवस्थेसह क्लोक रुम, स्वच्छतागृहे, अल्पोपहार स्टॉल, माहिती व सुविधा केंद्र, प्रथमोपचार केंद्र, सुरक्षा चौक्या इत्यादी सुविधा तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे.

४) पोलीस विभागाकरीता सदर वाहनळांवर संरक्षणाच्या दृष्टीकोनातून पोलीस वॉच टॉवर, होणा-या गर्दीचे अनुषंगाने वाढीव दर्शनरांगेकरीता पत्रा शेड व्यवस्था करणे.

५) संस्थानचे सर्व भक्तनिवासस्थांन परिसरात निवाराशेडस् उभारुन त्यामध्ये टॉयलेटस स्नानगृहे तसेच साईभक्तांना सामान ठेवणेसाठी क्लोकरुमची व्यवस्था करणे.

उपरोक्त नमूद कामांसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु. २७ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरहु खर्च हा "Major Financial Decision" या स्वरूपाचा असल्याने त्यासाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी PIL NO.18/2011 मधिल CA NO.12056/2012 मध्ये दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशान्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६५४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शौचालय, स्नानगृहे, तात्पुरते निवारा शेडस् वाहनतळे व कॅम्पींग ग्राऊंड विकसीत करणेस तत्वत: मान्यता देण्यात आली. श्रींच्या महासमाधी शताब्दीमधील विकास कामांचा आराखडा तयार करणेसाठी टाटा कन्सल्टींग इजिनियर्स लि., मुंबई यांची सल्लागार म्हणून नेमणूक करावयाची असून विषयांकीत कामही त्याच आराखडयाचा भाग असल्यामुळे याबाबत टाटा कन्सल्टींग इजिनियर्स लि., मुंबई यांचेकडून आराखडा व अंदापत्रक तयार करणेत यावे व त्याकामी येणा-या खर्चास एकत्रित मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.३७ शताब्दी कक्ष व आपत्ती व्यवस्थापनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री क्षेत्र शिर्डी, ता. राहाता, जिल्हा. अहमदनगर येथील थोर संत श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. शतक महोत्सवी पुण्यतिथीचे मुख्य दिवशी सुमारे २० लक्ष व महोत्सवाचे इतर दिवशी असे एकूण सुमारे ४० लक्ष भक्त येतील व वर्षभरात इतर उत्सवांना सुमारे २० ते २५ लक्ष साईभक्त साईबाबांचे दर्शनार्थ भेट देतील असा अंदाज आहे. त्यासाठी शिर्डी शहर व परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये मोठया प्रमाणावर सुधारणा करणे व नविन प्रकल्प उभारणे अत्यावश्यक आहे. याकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/प्र.क्र.०१/का.१६ दि.२२/१०/२०१३ चे अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली अंतिम कृती आराखडा तयार करण्यासाठी समिती गठीत केलेली आहे. या समितीची बैठक शुक्रवार दि.११/१२/२०१५ रोजी विधान भवन, नागपूर येथे मा. ना. श्री देवेंद्र फडवणीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली आहे.

वर नमूद केलेप्रमाणे कृती आराखडा समितीचे बैठकीत आपत्ती व्यवस्थापन व शताब्दी कक्षाची स्थापना करणेबाबत सादरीकरण करणेत आलेले आहे. नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ चे कालावधीत कामकाजाचा समन्वय राखणे व नियोजन करणेसाठी तेथील जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्र सिंहस्थ कुंभमेळा कक्षाची स्थापना करणेत आली होती. त्याच धर्तीवर शिर्डी येथे श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव कामकाजासाठी दि.०१ जानेवारी,२०१६ ते ३१ डिसेंबर,२०१८ या तीन वर्षाचे कालावधीसाठी शताब्दी कक्षाची स्थापना करुन त्यामध्ये खालील अधिका-यांची प्रतिनियुक्ती करणे आवश्यक आहे.

- अप्पर जिल्हाधिकारी – ०१ उपजिल्हाधिकारी - ०२
- पोलीस उपअधिक्षक - ०१ उपअभियंता – ०२
- नायब तहसिलदार – ०१ लिपीक - ०२

यासाठी जिल्हाधिकारी स्तरावर शताब्दी कक्ष तसेच आपत्ती व्यवस्थापन करणेसाठी रु. १० कोटी इतक्या निधीची तरतूद करणे आवश्यक आहे. सदरहु शताब्दी कक्षाचे कार्यालय शिर्डी येथे ठेवणे आवश्यक राहील.

तरी श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षानिमित्त शिर्डीत होणा-या गर्दीचे अनुषंगाने कामकाजाचा समन्वय राखणे तसेच उपलब्ध केलेल्या सोयी सुविधांचे योग्य नियोजन व आपत्ती व्यवस्थापन करणेसाठी जिल्हाधिकारी स्तरावर शताब्दी कक्षाची स्थापना करणेस व यासाठी रु. १० कोटी इतक्या निधीची तरतूद करणेकामी मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६५५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षानिमित्त शिर्डीत होणा-या गर्दीचे अनुषंगाने कामकाजाचा समन्वय राखणे तसेच उपलब्ध केलेल्या सोयी सुविधांचे योग्य नियोजन व आपत्ती व्यवस्थापन करणेसाठी जिल्हाधिकारी स्तरावर ०२ वर्ष कालावधीसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे शताब्दी कक्षाची स्थापना व त्यासाठी रु. १० कोटी मात्र इतक्या निधीची तरतूद करणेकामी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३८** **शिर्डी येथील रस्ते भू-संपादीत करुन विकसीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) २००४ चे कलम २१ (२) खालील प्रमाणे तरतुद आहे.

पोट कलम (१) आणि (१ क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | निर्णय क्र. २६३ दि. २४/०४/२००६. | ०५. | निर्णय क्र. ७८ दि. ०८/०१/२०१४. |
| ०२. | निर्णय क्र. १६ (ब) दि. १०/०१/२०१०. | ०६. | निर्णय क्र. ७५० दि. ११/०९/२०१४. |
| ०३. | निर्णय क्र. ५३८ दि. २४/०७/२०११. | ०७. | निर्णय क्र. ७९९ दि. ११/०९/२०१४. |
| ०४. | निर्णय क्र. ७०६ दि. २४/०९/ २०११. | ०८. | निर्णय क्र. ४६७ दि. १०/११/२०१५. |

**मा. शासन निर्णय:** मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.

१. सासंवि/२००६/८७६/(१३१)का.सोळा, दि.०४/०९/२०१४

२. सासंवि-२०११/५१४/ प्र. क्र. ७४/का.१६, दि.२१/०८/२०१४

**प्रस्तावना:** शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरुन शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पातंर्गत संस्थान निधीतून शिर्डी शहरातील रस्ते विकसीत करणेकामास मा. व्यवस्थापन समिती ठराव क्र.२६३ दि.२४/०४/२००६ अन्वये मान्यता देण्यात आली होती. सदरहु रस्ते विकसन प्रकल्पाची सद्यस्थिती खालीप्रमाणे आहे.

**(अ) प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्ते विकसीत करणे-** उपरोक्त मान्यतेनुसार शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावांतर्गत प्रथम प्राधान्य गटातील अकरा रस्ते विकसीत करणेकामीचे प्रस्तावास दि.०४ सप्टेंबर, २०१४ अन्वये रुपये ८८ कोटी खर्चास मान्यता देण्यात आली असून, आजअखेर सदरहू प्रकल्पावर रु. ७०,०४,०७,८५०/- रक्कम खर्च करणेत आलेली आहे. सदरहू ११ रस्त्यांपैकी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत ५ रस्ते पूर्ण झाले असून संस्थान ठेकेदार रोमन टारमॅट लि. यांचेमार्फत ६ रस्त्यांपैकी ५ रस्त्यांचे उपलब्ध भागातील कामे पुर्णत्वावर आहेत. रस्ता क्र. ०९ अ चे काम भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण न झाल्यामुळे प्रलंबीत आहे.

**(ब) शिर्डी येथील ६ रस्ते भूसंपादन करून विकसीत करणे-**

उपरोक्त निर्णय क्र. ५३८ दि. २४/०७/२०११ नुसार भुसंपादनाची आवश्यकता असलेल्या सात रस्त्यांपैकी ४.८८ कि. मी. लांबीचे सहा रस्त्यांचे कामासाठी येणारे अंदाजे रु.१०१.०१ कोटी खर्चाचा प्रस्ताव इकडील जा. नं. १००/२०१२ दि. ०४/०४/२०१२ रोजीचे पत्रान्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर करणेत आला होता. त्यानंतर सदरचे सहा रस्त्यांचा भूसंपादन खर्च रु.४३.७३ कोटी ऐवजी उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग यांनी कळविलेल्या रु. ५४.२६ या सुधारीत भूसंपादनखर्चासह रु. १११.५४५ कोटी सुधारीत खर्चास मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. ७८ दि. ०८/०१/२०१४ अन्वये मान्यता देण्यात आली.

त्यानुसार जा. नं. ४६६७/२०१४ दि. १०/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये सादर केलेल्या सुधारीत प्रस्तावाचे अनुषंगाने शासनाचे विधी व न्याय विभागाने दि.१८/०२/२०१४ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

"..भुसंपादनाची आवश्यकता असणारे ७ रस्ते विकसीत करण्याबाबतच्या प्रस्तावास सद्यस्थितीत कार्यरत त्रीसदस्य समितीची मान्यता घेऊन मा.उच्च न्यायालयाच्या सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१२०५६/२०१२ दि. १६/१०/२०१२ च्या आदेशानुसार उच्च न्यायालयाकडे जाऊन प्रथम मान्यता घेण्यात यावी ".

सदर निर्णयानुसार व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता असलेल्या ०७ रस्त्यांचे भूसंपादनासाठी आवश्यक असणारा रु.१११.५४५ कोटी मात्रचा निधी उपलब्ध करुन देणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील अर्ज क्र. ८७०९/२०१४ अन्वये सादर करणेत आला आहे. उपरोक्त सहा रस्त्यांचे भूसंपादन करणेकामी मा. उपविभागीय अधिकारी यांनी पुर्वी कळविलेला खर्च रु.५४.२६ कोटी ऐवजी आता रु.१,५०,१८,८८,७९७/- इतका कळविलेला आहे. याकामी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. ७५० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, यापूर्वी प्रस्तावित कामी येणा-या रु.१११.५४५ कोटी मात्र रकमेच्या खर्चास मान्यता मिळणेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज सादर केलेला असून, अद्याप पर्यंत या अर्जावर काहीही निर्णय झालेला नाही. मा. औरंगाबाद खंडपीठाकडे याबाबत पाठपुरावा करणेत यावा व मा. औरंगाबाद खंडपीठाचे मंजूरी मिळालेनंतर वाढीव रकमेचा प्रस्ताव समितीपुढे सादर करणेत यावा असे ठरले."

सदरहु प्रकल्पाचे भूसंपादनासाठी रु.१५०.०० कोटी व विकसनासाठी रु.७०.०० कोटी असा एकूण रु.२२० कोटी इतका सुधारीत खर्च अपेक्षित आहे.

**(क) शिर्डी शहरातील ०९ रस्ते विकसित करणे-**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०९/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७०६ अन्वये ठरल्यानुसार भूसंपादनाची आवश्यकता नसलेले व साईभक्त/ नागरीकांचे दैनंदिन वापरातील २१.३६ कि.मी. लांबीचे १७ रस्ते प्रथमतः विकसीत करणेस मान्यता मिळणेकामी इकडील जा. नं. ३५५९/२०११ दि. ०७/१०/२०११ रोजीचे पत्रान्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे रु.३५ कोटी खर्चाचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. तसेच या रस्त्यांचे विकसनांसाठी सुधारीत अंदाजे रु.४७,०२,४४,९७८/- निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. विधी व न्याय विभाग यांचेकडे इकडील जा. नं. ४६२०/२०१४ दि.०७/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आला. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७८ अन्वये सुधारीत रु. ४७,०२,४४,९७८/- इतक्या खर्चास व केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक सासंवि-२०११/ ५१४/ प्र. क्र. ७४/का. सोळा, दि. २१/०८/२०१४ रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे शासन निर्णय झाला असल्याचे कळविले आहे.

''श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतून शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्प- शिर्डी शहरातील व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता नसलेले १७ रस्ते विकसीत करण्यासाठी येणा-या रु.४७,०२,४४,९७७/- इतक्या खर्चाचा प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून शासनाची तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.''

शासन मान्यतेतील अटीशर्तीनुसार मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगीसाठी सिव्हील ॲप्लीकेशन नं.५०७२/२०१५ सादर करणेत आले आहे.

सदरचे १७ रस्त्यांपैकी शिर्डी नगरपंचायतीने १२.४५ कि.मी. लांबीचे ०८ रस्त्यांचे विकसनासाठी सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजनेअंतर्गत मान्यता घेतली आहे. उर्वरीत नऊ रस्त्यांचे विकसनासाठी अंदाजे रु.२८ कोटी खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्ताव :** १७ रस्त्यांपैकी शिर्डी नगरपंचायतीने १२.४५ कि.मी. लांबीचे ०८ रस्त्यांचे विकसनासाठी सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजनेअंतर्गत मान्यता घेतली असल्याने सदरचे रस्ते वगळणेबाबत व ९ रस्ते विकसित करणेबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दि.१०/११/२०१५ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"...यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, व्दितीय प्राधान्य गटात नमूद केलेल्या १७ रस्त्यांपैकी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजनेत मंजूर झालेले ०८ रस्ते वगळणेत येऊन, उर्वरीत ०९ रस्त्यांची सद्यःस्थिती, निकड, खर्चाची रक्कम यासह सुधारीत खर्चाचा प्रस्ताव तयार करावा तसेच भूसंपादनाची आवश्यकता असलेल्या ०६ रस्त्यांचे भूसंपादन व इतर अनुषंगीक खर्चाबाबतचा सुधारीत तपशील शिर्डी नगरपंचायतीकडून घेण्यात यावा व त्यासह सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. "*

उपरोक्तप्रमाणे भूसंपादनाची आवश्यकता असलेले ०६ व भूसंपादनाची आवश्यकता नसलेले ०९ अशा एकूण १५ रस्त्यांची सद्यःस्थिती, निकड, खर्चाची रक्कम आदि बाबी तपासून सुधारीत प्रस्ताव शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून मागविण्यात आलेला आहे. सदरहू कामासाठी ढोबळमानाने रु.२४८ कोटी इतका सुधारीत खर्च अपेक्षीत आहे.

सदर कामाचा समावेश श्रीं चा शताब्दी महोत्सवा निमीत्त करावयाचे कामामध्ये असल्याने, याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच शिर्डी नगरपंचायतीकडून प्राप्त होणा-या प्रस्तावान्वये अपेक्षित खर्चास मा. उच्च न्यायालयाकडील सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१२०५६/२०१२ दि. १६/१०/२०१२ मधील आदेशानुसार परवानगी घ्यावी लागेल व त्यानंतर शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी सुधारीत प्रस्ताव सादर करावा लागेल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील ०६ रस्ते भू-संपादीत करुन विकसीत करणे व ०९ रस्ते विकसीत करणेबाबतचे प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. तसेच याबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून सुधारीत सविस्तर अंदाजपत्रकासह प्रस्ताव मागविणेत यावा, त्यांचेकडून प्रस्ताव आल्यानंतर मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालयामध्ये सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३९** **बहुउद्देशीय सभागृहाचे बांधकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये,मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग करणे तसेच (झ)अन्वये विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनासाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे,अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना-** श्री क्षेत्र शिर्डी येथे प्रतिदिनी सरासरी ५० हजार साईभक्त भेट देऊन श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतात. दिवसेंदिवस शिर्डी येथे येणा-या साईभक्तांच्या प्रमाणात वाढ होत आहे. उत्सव काळात तसेच उन्हाळी सुट्टया, दिपावली व नाताळच्या सुट्टया, गुरुवार व रविवार तसेच या दिवसांना जोडून येणा-या सरकारी सुट्टया इत्यादी काळात श्री क्षेत्र शिर्डीस दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची संख्या सुमारे २ ते ३ लाखापर्यंत जाते. शिर्डी येथे दर्शनार्थ येणा-या साईभक्तांना संस्थानतर्फे निवास, प्रसाद भोजन व इतर मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करण्यात येतात.

संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं. १७२ पैकी मधील जमिनीची पहाणी मा.कार्यकारी अधिकारी, मा.उप कार्यकारी अधिकारी व उप कार्यकारी अभियंता यांनी दि.१४/१०/२०१४ रोजी केली होती. सदरहू पहाणी

दरम्यान या जागेत बहूउद्देशीय सभागृहाचे बांधकाम करणेबाबत चर्चा झाली. त्यानुसार सदरहू जागेत बहूउद्देशीय सभागृह (Convention Centre) चे बांधकाम करणेसाठी इकडील दि.१९/११/२०१४ रोजीचे टिपणीद्वारे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तथापी याबाबत दि.०९/१२/२०१४ रोजी तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांचेशी झालेल्या चर्चेनुसार या प्रस्तावाबाबत पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही. आता प्राप्त मौखिक निर्देशान्वये सदर प्रस्ताव खालीलप्रमाणे फेर सादर करण्यात येत आहे.

**प्रस्ताव:-** मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१७२ मध्ये संस्थान मालकीचे एकूण ७ हेक्टर ९६ आर क्षेत्र आहे. सदर जागेत साईभक्तांचे सोयीसाठी साईधर्मशाळा प्रकल्पांतर्गत प्रत्येकी ३२ हॉल्स असलेल्या एकूण ६ इमारतींचे बांधकाम पूर्ण झालेले असून सदर इमारतींचा वापर साईभक्तांचे निवासाकरिता सुरु करणेत आलेला आहे. गट नं. १७२ मध्ये सध्या २ हेक्टर ५० आर वापरयोग्य क्षेत्र शिल्लक आहे. सदर जागेत बहुउद्देशीय सभागृह (Convention Centre) चे बांधकाम करता येईल. त्यामध्ये प्रामुख्याने खालिल सुविधांचा अंतर्भाव करता येईल.

**Convention Center: -**

- Main Auditorium :

An air conditioned Auditorium having capacity of 2000 seats, with modern audio – visual facilities and large foyer.

- Conference Hall :

A well furnished medium conference hall with seating capacity of 200 persons.

- Meeting Halls :

Two seminar / board rooms with seating capacity of 30 persons.

- VIP lounge for receiving and entertaining VIPs.
- Banquet Hall with a capacity of 500 seats.
- Exhibition Hall for the use of various kind of exhibitions.
- Restaurant / Cafeteria for catering services for convention and self seating of 200 seats.
- Lawn of 6000 sft. area.
- Service area for water, electrical, HVAC, CCTV, STP and other allied services.
- Office area for accounts, marketing, administration, and security.

वरीलप्रमाणे सुविधा असलेले बांधकाम करणेसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

A) Built – up area (Approx) : 9000 Sqm.

Cost of Construction @ Rs.21,520/-

Per Sqm = Rs. 19.37 cr.

B) Parking, Landscape and external development : 20000 Sqm.

Cost @ Rs.5,500/- per Sqm. = Rs.11.00 cr.

---

**Total Estimated Cost = Rs. 30.37 cr.**

विषयांकीत प्रकल्पासाठी वर नमूद केलेनुसार प्राथमिक ढोबळ अंदाजाप्रमाणे रु.३०.३७ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

मौजे निमगांव को-हाळे ता. राहाता गट नं.१७२, १८३, १८६ सह संस्थान मालकीच्या इतर काही जमिनी शेती विभागातून वगळून रहीवास विभागात समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २०(३) अन्वये दि.०३/०६/२००९ रोजी महाराष्ट्र शासनाद्वारे अधिसूचना जाहीर करणेत आलेली आहे. ही कार्यवाही पूर्ण होऊन याबाबत अंतिम शासन निर्णय झालेनंतरच उपरोक्त प्रकल्पाचे बांधकामास विहीत पध्दतीने बांधकाम परवानगी घेऊन प्रकल्पाचे बांधकाम सुरु करता येणार आहे.

तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे पुढील PIL No.18/2011 CA No.12056/2012 मधिल दि.१६/१०/२०१२ चे आदेशातील कलम 6(c) अन्वये विषयांकीत प्रकल्प हा major financial decision या सदरात मोडत असल्याने त्यासाठी मा. कोर्टाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

तरी वरीलप्रमाणे बहुउद्देशीय सभागृहाचे बांधकामासाठी येणारे खर्चास व सदर प्रकल्पासाठी आर्किटेक्ट नेमणूकीकरीता प्रथम आर्किटेक्टचे पॅनेल बनविणेकरीता (Empanelment of Architects) वर्तमानपत्रातील जाहीरातीद्वारे अर्ज (Experession of Interest ) मागविणेसाठी मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.६५७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, बहुउद्देशीय सभागृहाचे बांधकाम करणेस तत्वत: मान्यता देण्यात आली. श्रींच्या महासमाधी शताब्दीमधील विकास कामांचा आराखडा तयार करणेसाठी टाटा कन्सल्टींग इजिनियर्स लि., मुंबई यांची सल्लागार म्हणून नेमणूक करावयाची असून विषयांकीत कामही त्याच आराखडयाचा भाग असल्यामुळे याबाबत टाटा कन्सल्टींग इजिनियर्स लि., मुंबई यांचेकडून आराखडा व अंदापत्रक तयार करणेत यावे व त्याकामी येणा-या खर्चास एकत्रित मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.४० श्री साईबाबा महासमाधी शताब्दी निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी या क्षेत्रातील सल्लागार अथवा संस्थेची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-**

श्री क्षेत्र शिर्डी, ता. राहाता, जिल्हा. अहमदनगर येथील थोर संत श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. शतक महोत्सवी पुण्यतिथीचे मुख्य दिवशी सुमारे २० लक्ष व महोत्सवाचे इतर दिवशी असे एकूण सुमारे ४० लक्ष भक्त येतील व वर्षभरात इतर उत्सवांना सुमारे २० ते २५ लक्ष साईभक्त साईबाबांचे दर्शनार्थ भेट देतील असा अंदाज आहे. त्यासाठी शिर्डी शहर व परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये मोठया प्रमाणावर सुधारणा करणे व नविन प्रकल्प उभारणे अत्यावश्यक आहे. याकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/प्र.क्र.०१/का.१६ दि.२२/१०/२०१३ चे अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली अंतिम कृती आराखडा तयार करण्यासाठी समिती गठीत केलेली आहे. या समितीची बैठक शुक्रवार दि.११/१२/२०१५ रोजी विधान भवन, नागपूर येथे मा. ना. श्री देवेंद्र फडवणीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली आहे.

शताब्दी वर्षात करावयाचे नियोजनाबाबत कृती आराखडा समितीची शुक्रवार दि.११/१२/२०१५ रोजी विधान भवन, नागपूर येथे मा. ना. श्री देवेंद्र फडवणीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करणेत आलेली होती. सदर बैठकीमध्ये संस्थानचे वेगवेगळया २७ प्रकल्पांबाबत चर्चा करणेत आली. यामध्ये प्रामुख्याने श्री साईबाबा मल्टीमिडीया थिम पार्क व लेजर शो, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांचेकडील जमिन खरेदी, शिर्डी शहरातील रस्ते विकसीत करणे, मंदिर परिसर पुनर्विकास या प्रकल्पांचा विकास करणेबाबत प्रामुख्याने चर्चा करणेत आली. शताब्दी वर्षात करावयाचे नियोजनसाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात यावी. यासाठी संस्थानने सल्लागारांची नेमणूक करुन सदर सल्लागारामार्फत आराखडा तयार करुन समितीपूढे सादर करावा व त्यांचे मान्यतेनंतर तो आराखडा अंतिम मान्यतेसाठी कृती आराखडा समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षामध्ये शिर्डीत येणा-या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारणे तसेच सदर काळात भाविकांसाठी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करणे आवश्यक आहे. शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्षात संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करुन साईभक्तांचे मनोरंजनासाठी साईचरीत्रावर आधारीत वेगवेगळे इव्हेंन्ट तयार करुन त्याचे सादरीकरण करणे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल.

याबाबत श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवानिमित्त इव्हेंन्ट मॅनेजमेंटसाठी श्री.नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि. यांची सल्लागार म्हणून नेमणूक करता येईल. श्री.नितिन देसाई यांचे आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि.या कंपनीची महाराष्ट्र विधानमंडळाच्या अमृत महोत्सव कार्यक्रमानिमित्त इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी म्हणून नियुक्ती करणेत आली होती. सदर कंपनीने महाराष्ट्र विधानमंडळाच्या अमृत महोत्सव कार्यक्रमानिमित्त दि.१९/०७/२०११ रोजी होणा-या विधानमंडळ अमृत महोत्सव समितीने करारात नमूद केलेल्या प्रत्येक इव्हेंटचे अविस्मरणीय असे सादरीकरण केलेले आहे.

श्री.नितीन देसाई यांना सिनेसृष्टीतील २८ वर्षाचा प्रदीर्घ असा अनुभव आहे. त्यांचे या प्रदीर्घ अनुभवामुळे त्यांचे सिनेसृष्टीतील कामांना आर्ट डायरेक्टर म्हणून चार नॅशनल अॅवार्ड मिळालेले आहेत. श्री. नितीन देसाई यांचे कंपनीने देवदास या चित्रपटात सादर केलेल्या इव्हेंटला चार फिल्म फेअर अॅवार्ड व सात स्क्रिन अॅवार्ड मिळालेले आहेत. तसेच या कंपनीने हम दिल दे चुके सनम, मिशन काश्मीर, परींदा, हु-तू-तू, जोश, मुन्नाभाई एम.बी.बी.एस. व खाकी या चित्रपटांसाठी अविस्मरणीय असे इव्हेंट सादर केलेले आहेत. याशिवाय खालीलप्रमाणे मालिका व चित्रपटांचे दिग्दर्शन केलेले आहे.

१) श्री.नितीन देसाई यांचे कंपनीने प्रथमतः सन २००१ मध्ये "मा आशापूरा" या चित्रपटाचे दिग्दर्शन केलेले आहे.

२) सन २००८ मध्ये "राजा शिवछत्रपती" या नावाने महाराष्ट्राचे कुलदैवत राजे शिवाजी यांचेवर आधारीत टिव्ही सिरीयलची निर्मिती केली असून सदरची मालिका स्टार प्रवाहवरुन प्रदर्शित झालेली आहे.

३) सन २००९ मध्ये "चित्तोर कि रानी पद्मिनी का जोहर" या नावाने राणी पद्मीनी यांचेवर आधारीत टिव्ही सिरियलची निर्मिती केलेली असून सदरची मालिका सोनी टिव्ही वरुन प्रदर्शित झालेली आहे.

४) सन २०१० मध्ये "श्रीमंत पेशवा बाजीराव मस्तानी" या नावाने पेशवे बाजीराव यांचेवर आधारीत टिव्ही सिरियलची निर्मिती केलेली असून सदरची मालिका ईटिव्ही वरुन प्रदर्शित झालेली आहे.

५) सन २०११ मध्ये "मराठी पाऊल पडते पुढे" तसेच त्याच वर्षात ४८ व्या मराठी राज्य चित्रपट पुरस्कार २०११ साठी मुंबईमध्ये गेटवे ऑफ इंडीया नरीमन पॉईट येथे मराठी फिल्म फेअर पुरस्कारासाठी भव्य असा इव्हेंट सादर केलेला होता. तसेच याच वर्षात महाराष्ट्र सुवर्ण महोत्सव सांगता समारोह साठी दि. ०२ मे २०११ मध्ये गिरगाव चौपाटी येथे १५०० कलाकार एकाच वेळी कार्यक्रम सादर करतील असा भव्य सेट उभारलेला होता.

६) संस्थानचे साईसृष्टी प्रकल्पाकरीता मा. व्यवस्थापन समितीचे दि. २६/०३/२०११ रोजीचे सभेत ठरलेप्रमाणे ND'S Art world Pvt Ltd, Mumbai यांची प्रकल्प सल्लागार म्हणून दि. २७/०४/२०११ रोजी नियुक्ती करणेत आलेली आहे.

अशा प्रकारे उपरोक्त नमूद कार्यक्रमांव्यतीरीक्त इतरही अनेक शासकिय समारंभामध्ये श्री देसाई यांचे कंपनीने इव्हेंट सादर केलेले आहेत.

तरी श्री साईंचे शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्ष भव्य साजरे करण्यासाठी पूर्वतयारी करण्याचे दृष्टीने उपलब्ध करावयाच्या सोई सुविधा तसेच धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा नियोजनाचा कृती आराखडा तयार करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी इव्हेंन्ट मॅनेजमेंटसाठी श्री.नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि.मुंबई यांची सल्लागार म्हणून नेमणूक करता येईल. त्यासाठी सल्लागार नेमणुकीविषयी शासनाचे निर्देश अथवा मार्गदर्शक तत्वे यांचे पालन करुन याबाबत पुढील कार्यवाही करता येईल. याशिवाय यासाठी येणारा खर्च हा "Major Financial Decision" या स्वरूपाचा असल्याने त्यासाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी PIL NO.18/2011 मधिल CA NO.12056/2012 मध्ये दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६५८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईंचे शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्ष भव्य प्रकारे साजरे करण्यासाठी पूर्वतयारी करण्याच्या दृष्टीने उपलब्ध करावयाच्या सोई सुविधा तसेच धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा नियोजनाचा कृती आराखडा तयार करणे तसेच त्याची प्रभावी अंमलबजावणी करणेकामी इव्हेंन्ट मॅनेजमेंटसाठी या क्षेत्रातील श्री.नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा.लि., मुंबई यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेस तत्वतः मान्यता देण्यात आली.**

**त्यासाठी सल्लागार नेमणुकीविषयी शासनाचे निर्देश अथवा मार्गदर्शक तत्वे यांचे पालन करणेसाठी याकामी शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता घेण्यात यावी. तसेच यासाठी येणारा खर्च हा "Major Financial Decision" या स्वरूपाचा असल्याने या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबद खंडपीठाची पूर्व परवानगी घेणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख/ विधी अधिकारी)

---

विषय नं.४१ **संस्थानचे अग्निशमन वाहन वापराचे विमानतळ, हेलिपॅड व इतर ठिकाणांसाठी दर निश्चित करणेबाबत.**

प्रस्ताव- महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कं.लि.यांचे दि.११.१२.२०१४ रोजीचे पत्र बांधकाम विभागामार्फत दि.२३.१२.२०१४ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झाले आहे. सदर पत्रात त्यांनी संस्थानकडे काकडी गावातील शिर्डी एअरपोर्टवर प्रत्येक फ्लाईट येणे व जाणेचे वेळेत अग्निशमन सुविधा पुरविणेबाबत मागणी केलेली आहे.

अग्निशमन सेवा पुरविणेबाबत मा.का.अ.सो.यांचेशी दि.०८.०१.२०१५ रोजीचे टिपणीवरील झालेल्या चर्चेनुसार नुसार मा.व्हाईस चेअरमन महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कं.यांना संस्थानमार्फत संस्थानचे पारित होणारे नियम व M.A.D.C. कं. यांचे मागणी नुसार त्यांना वेळोवेळी संस्थानची अग्निशमन सेवा पुरविणेबाबतचे पत्र पाठविणेत आलेले आहे. त्यानुसार फायर विभागामार्फत संस्थानचे अग्निशमन वाहनांचे कार्यक्षेत्र व दर निश्चिती करणेबाबत व शिर्डी विमानतळावर सुसज्ज अग्निशमन सेवा पुरविणेबाबत असे दोन विषय दि.२८.११.२०१५ रोजी मा.व्य.समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करणेत आलेले होते. त्यावर खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

मा.व्य.समितीचे दि.२८.११.२०१५ रोजीचे सभेमध्ये विषय नं.५२ नुसार संस्थानचे अग्निशमन वाहनांचे कार्यक्षेत्र व दर निश्चिती करणेबाबत निर्णयार्थ प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यावर निर्णय क्र.५७०- नुसार अग्निशमन वाहन हे आपत्ती व्यवस्थापनाचा भाग असल्यामुळे इमर्जन्सीमध्ये सदरहू अग्निशमन वाहनाची बाहेरुन मागणी झालेस पाठविणेत यावे तसेच वापरासाठी प्रत्यक्ष किती खर्च येतो यावरुन अग्निशमन सेवा आकार निश्चित करावा, त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च व आकारणेयोग्य सेवा आकार याच्या तक्त्यासह प्रस्ताव फेरसादर करणेत यावा.

**परिशिष्ट- ०१** अग्निशमन वाहनासाठी कॉलचे वेळी येणा-या प्रत्यक्ष खर्चा नुसार खालिलप्रमाणे दर आकारणी करता येईल.

| अ.नं. | कर्मचारी / साहीत्य | प्रत्यक्ष येणारा खर्च | आकारणी दर |
|---|---|---|---|
| ०१ | ०१ चालक | रु.६५०/- प्रती दिन | पहिले तिन तास रु.४,०००/- त्यानंतर प्रती तास रु.१,०००/- याप्रमाणे तसेच फोमचा,सि.ओ.टू व ड्राय पावडर सिलेंडरचा वापर झालेस खरेदी दराप्रमाणे. |
| ०२ | ०२ फायरमन रु.५००/- प्रती दिवसाप्रमाणे | रु.१०००/- प्रती दिन | |
| ०३ | इंधन खर्च | रु.१०/- रु प्रति कि.मी. | |
| ०४ | पाणी क्षमता ५००० लि. X०.०२१२ प्रती लिटर | रु.१०६ रु.पाच हजार लिटर्स करीता | |
| ०५ | फोम क्षमता ५०० लिटर्स | वापरानुसार खरेदी दरा प्रमाणे | |
| ०६ | सि.ओ.टू.सिलेंडर क्षमता २२.५ कि. | वापरानुसार खरेदी दरा प्रमाणे | |
| ०७ | डी.सी.पी.सिलेंडर क्षमता २५ कि. व सि.ओ.टू. कार्टेज ५०० ग्रॅम क्षमता | वापरानुसार खरेदी दरा प्रमाणे | |

तसेच मा.व्य.समितीचे दि.२८.११.२०१५ रोजीचे सभेमध्ये विषय नं.५३ नुसार शिर्डी विमानतळावर सुसज्ज अग्निशमन सेवा पुरविणेबाबत निर्णयार्थ प्रस्ताव सादर करणेत आलेला होता त्याबाबत प्रस्तावातील मुद्यांबाबत निर्णय क्र.५७१ नुसार खालील प्रमाणे ठरले आहे.

<u>परिशिष्ट – २</u> शिर्डी विमानतळावर सुसज्ज अग्निशमन सेवा पुरविणेबाबत झालेला निर्णय-

| अ.नं. | दि.२८.११.१५ रोजीचे सभेमध्ये विषय नं.५३ निर्णयार्थ सादर विषय | निर्णय क्र.५७१ नुसार मा.व्य.स. निर्णय |
|---|---|---|
| अ. | शिर्डी एअरपोर्ट करीता संस्थानचे अग्निशमन वाहन (फोम टेंडर) संस्थानचे कर्मचारी, इंधन व इतर आवश्यक बाबींसह सशुल्क अथवा निशुल्क पुरवावे. | महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट लि.मुंबई यांचे मागणीनुसार शिर्डी विमानतळावर सुसज्ज अग्निशमन सेवा पुरविणेसाठी संस्थानचे अग्निशमन वाहन, कर्मचारी, इंधन व इतर आवश्यक बाबींसह सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावे. |
| ब. | शिर्डी एअरपोर्टवर I.C.A.O.चे नियमानुसार संस्थानचे अग्निशमन वाहनातील उपलब्ध अग्नि सुरक्षा साहीत्यांचे २००% अतीरीक्त साहीत्य संस्थानमार्फत उपलब्ध करुन दयावयाचे किंवा कसे. | सदर साहीत्यांची व्यवस्था महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट लि.,मुंबई यांनी पहावी. |
| क. | अग्निशमन वाहनातील उपलब्ध अग्निसुरक्षा साहीत्यांचे २००% राखीव साहीत्य उपलब्ध करुन दयावयाचे असलेस त्याकरीता येणा-या अंदाजे रु.२,१५,०००/- खर्च अपेक्षित आहे. | |

संस्थानचे अग्निशमनं वाहन वापराचे विमानतळ,हेलिपॅड व इतर ठिकाणासाठी दर निश्चिती बाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्थायी निर्देश क्रःनप्रसं/अग्निशमन सेवा/२००५/प्र.क.३१४/९ दि.२५ एप्रिल २००५ स्थायी निर्देश क्र.३१ नुसार परीशिष्ट– ड मधील अ.क्र.६ मधील अ नुसार खालील प्रमाणे शिर्डी विमानतळ, हेलिपॅड व इतर ठिकाणाचे अग्निशमन मागणीधारकांकडून संस्थानचे अग्निशमन वाहनासाठी खालील प्रमाणे दर आकारणी करता येतील.

**<u>परिशिष्ट– ३</u>** शिर्डी विमानतळ, हेलिपॅड व इतर ठिकाणांचे अग्निशमन वाहन मागणीदारांकडून खालील प्रमाणे दर आकारणी करता येईल.

| स्थायी निर्देश क्र.३१ परिशिष्ट - ड | अग्निशमन सेवा | शिर्डी विमानतळ, हेलिपॅड व इतर ठिकाणाचे अग्निशमन मागणीधारकांकडून आकारणी करावयाचे दर नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्थायी निर्देश क्र.३१ परिशिष्ट -ड नुसार |
|---|---|---|
| ०६/अ | स्थायी निर्देश क्र.३१ क्रःनप्रसं/अग्निशमन सेवा/२००५/ प्र.क.३१४/९ दि.२५ एप्रिल २००५ नूसार संबंधीतांकडून दर आकारणी करता येईल. | पहिले तिन तास रु.४०००/- त्यानंतर प्रती तास रु.१०००/- या प्रमाणे तसेच फोमचा, सि.ओ.टू. व ड्राय पावडर सिलेंडरचा वापर झालेस खरेदी दराप्रमाणे. |
| ०६/क | बंदोबस्त डयुटी (संस्थानचे हेलिपॅड किंवा विमानतळावर शासकिय मान्यवर आलेस) | अ. शासकिय कार्यक्रमासाठी व्ही.आय.पी. आले असतील तर अग्निशमन सेवा शुल्क आकारणेत येवू नये.<br>ब. खाजगी कार्यक्रमासाठी व्ही.आय.पी. आले असल्यास कार्यक्रम संयोजकांकडून अ.क्र.६ (अ) प्रमाणे शुल्क वसूल करता येतील. |

विमानतळावर अग्निशमन वाहनासोबत पाठविणेत येणारे संस्थानचे कर्मचारी यांना विमानाचे स्पेशल ट्रेनिंग बाबत M.A.D.C. यांचे कार्यालयाचा ई- मेल संस्थानकडे प्राप्त झालेला होता त्यानुसार फरीदाबाद, दिल्ली येथे महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कं.यांचे मार्फत देणेत येणारे प्रशिक्षणासाठी फायर विभागाकडील ०७ कायम (महाराष्ट्र राज्य प्राथमिक प्रशिक्षण ३ महीने पाठयक्रम पुर्ण केलेले) कर्मचा-यांची नावे कळविणेत आलेली आहेत. सदरचे ट्रेनिंग आयोजन M.A.D.C. कं. मार्फत जानेवारी २०१६ मध्ये केलेले आहे.सदर प्रशिक्षण कालावधी ०४ महीणे ११ दिवस असून संस्थानचे ०७ कर्मचारी यांचे प्रशिक्षणाकरीता येणारा रु.८,०३,०००/- खर्च संस्थानने करावा असे M.A.D.C. यांनी संस्थानला दि.०२ जूलै २०१५ रोजीचे इ-मेल नुसार कळविलेले होते. परंतू सदर खर्च हा M.A.D.C. यांनी करावा असे संस्थानने दि.१३.०७.२०१५ रोजीचे पत्राव्दारे त्यांना कळविणेत आले आहे. अदयापपर्यंत त्यांनी उलट टपाली इकडील कार्यालयास याबाबत काही एक कळविलेले नाही.

संस्थानचे अग्निशमन वाहन शिर्डी एअरपोर्ट,हेलिपॅड व इतर ठिकाणांसाठी पुरविणेकामी खालील बाबतीत निर्णय होणेस विनंती.

**अ.** शिर्डी एअरपोर्ट,हेलिपॅड व इतर ठिकाणी मागणी झाल्यास संस्थानचे अग्निशमन वाहन (फोम टेंडर ) संस्थानचे कर्मचारी, इंधन व इतर आवश्यक बाबींसह सशुल्क पुरविणे बाबत परिशिष्ट -३ मधील अ.नं.०६/अ व ०६/क नुसार दर आकारणी करता येईल.

**ब.** शिर्डी एअरपोर्टवर संस्थानचे अग्निशमन वाहनावरील ०७ कर्मचारी यांना M.A.D.C. कं. मार्फत ट्रेनिंगसाठी पाठविणे झालेस कर्मचा-यांसाठी लागणा-या (सशुल्क अथवा निशुल्क) एकूण खर्चाची तपशिलाची सविस्तर माहीती M.A.D.C. यांचे कडून प्राप्त करुन घेवून पुढील कार्यवाही करता येईल.

तरी उपरोक्त 'अ' व 'ब' बाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६५९ यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी एअरपोर्ट,हेलिपॅड व इतर ठिकाणी मागणी झाल्यास संस्थानचे अग्निशमन वाहन (फोम टेंडर) संस्थानचे कर्मचारी, इंधन व इतर आवश्यक बाबींसह सशुल्क पुरविणे बाबत प्रस्तावातील परिशिष्ट- ३ मधील अ.नं.०६/अ व ०६/क नुसार दर आकारणी करण्यात यावी. तसेच शिर्डी एअरपोर्टवर संस्थानचे अग्निशमन वाहनावरील ०७ कर्मचारी यांना M.A.D.C. कं. मार्फत ट्रेनिंगसाठी पाठविणे झालेस कर्मचा-यांसाठी लागणारा खर्च संस्थाने करावा याकामी येणा-या एकूण खर्चाच्या तपशिलाची सविस्तर माहीती M.A.D.C. यांचे कडून प्राप्त करुन घेण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही-फायर अॅण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

विषय नं.४२ गावरान तुप खरेदीबाबत.

प्रस्ताव- भांडार विभागाकडील माहे नोव्हेंबर २०१५ चा किराणा मालाचा मागणी तक्ता दि.२८/१०/२०१५ रोजी खरेदी विभागाकडे प्राप्त झालेला होता. तक्त्यातील अ.नं.७६ गावरान तूपाची मागणी १२०० क्विंटल नमूद केलेली आहे. तथापि संस्थानने ऑक्टोबर ते डिसेंबर २०१५ या तीन महिन्यांसाठी २५०० क्विंटलचा पुरवठा आदेश मे.कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघाला दिलेला आहे. त्यापैकी १४०० क्विंटल गावरान तूपाची मागणी माहे ऑक्टोबर २०१५ या महिन्यात केलेली आहे. तर उर्वरित ११०० क्विंटल गावरान तूपाचे मागणीचे चलन माहे नोव्हेंबर २०१५ या महिन्यात काढलेले आहे. थोडक्यात संस्थानने माहे ऑक्टोबर ते डिसेंबर २०१५ या महिन्याचे मंजूर केलेले २५०० क्विंटल तूपाची मागणी पूर्ण झाली आहे.

तथापि दि.१३/११/२०१५ अखेर भांडार विभागाकडे २७१.५० क्विंटल गावरान तूप शिल्लक आहे. तसेच संस्थानने चलनाद्वारे मागणी केलेले २५०० क्विंटल तूपापैकी २०२० क्विंटल तूप मे.कोल्हापूर दूध संघाकडून येणे बाकी आहे. सध्याची दिवाळीची गर्दी व डिसेंबरमध्ये होणारी नाताळची गर्दी विचारात घेता हे तूप साधारण डिसेंबर २०१५ अखेरपर्यंत पुरेल असे वाटते. मात्र पुढील जानेवारी २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीसाठी गावरान तूप खरेदीबाबत निर्णय होणे गरजेचे आहे.

सन २०१५-१६ साठी आवश्यक गावरान तूप खरेदीकामीचा पूर्वोइतिहास खालीलप्रमाणे:-

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०.०१.२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक १८ अन्वये सन २०१५-१६ चे किराणा माल खरेदीसाठी रु.७७,५०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात येऊन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेबाबत निर्देशित केले होते. यामध्ये गावरान तुप खरेदीसाठी रक्कम रु.२८,२८,००,०००/- मात्र रकमेचा समावेश होता.

संस्थानने एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ या वर्षासाठी रक्कम रु.७७,५०,००,०००/- मात्रचे किराणा माल व भाजीपाला खरेदीसाठी तसेच नामांकित कंपन्यांकडून ई-निविदा प्रक्रिया न राबविता किंवा टेंडरींग प्रोसेसमध्ये नामांकित कंपन्यांशी वाटाघाटी करुन गावरान तूप खरेदीसाठी मा.उच्च न्यायालयाचे मान्यतसाठी सिव्हील अॅप्लीकेशन क्रं.३४९६ अर्ज सादर केला होता.

त्यावर "The civil application is allowed in terms of prayer clause "B" and disposed of, excluding the estimate price of Ghee to be purchased for next year." असे निर्देश दिले होते.

त्यामूळे मा.उच्च न्यायालयाकडे गावरान तूप खरेदीसाठी स्वतंत्र सिव्हील अर्ज क्रं.३५०४ दाखल करण्यात आला होता.

यामध्ये मा.उच्च न्यायालयाकडे सन २०१५-१६ साठी १०,१०० क्विंटल गावरान तुप खरेदीकामी केलेल्या सिव्हिल अॅप्लिकेशन नं.३५०४/२०१५ मध्ये संस्थानने जाहिर निविदा मागविल्यास ई-निविदा प्रक्रियेत कुठल्यातरी कंपनीकडून निविदेमध्ये Lowest दर भरले जातात व त्यांना Contract Award केल्यानंतर तुप पुरविताना मात्र त्याचा दर्जा राखला जात नाही. त्यामूळे भक्तांच्या तक्रारी येतात व त्याला संस्थानला तोंड दयावे लागते. तसेच काही चांगले दर्जाचे तूप पुरवितात, तर काही तूप योग्य दर्जाचे पुरवित नाहीत. ही बाब मा.न्यायालयाचे निदर्शनास आणून देणेत आली होती. तसेच सदर अर्जातील Prayer clause मध्ये मा.उच्च न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे ६ ब्रॅण्डेड कंपन्यापैकीच टेंडरींग प्रक्रिया करुन किंवा संस्थानला ई-निविदा प्रक्रियेमध्ये जी एजन्सी नामांकित व विश्वासू आढळून येईल त्यांना पुरवठा आदेश देणेबाबत मान्यता मिळणेकामी विनंती करण्यात आली होती. त्यावर

The C.A.is allowed in terms of Prayer Clause "B" and disposed of.

The applicant Trust is also given liberty to explore few more sources through whom Ghee can be procured. असे निर्देश दिले होते.

मा.उच्च न्यायालयाचे वरील दि.१३/३/२०१५ चे निर्देशानुसार संस्थानने माहे एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीमध्ये १०,१०० गाईचे गावरान तूप पुरविणेकामी प्रथम ई-निविदा मागविल्या होत्या.

सदर निविदा प्रक्रियेला मा.उच्च न्यायालयाने निर्देशित केलेल्या ६ ब्रॅन्डेड कंपन्यांपैकी फक्त २ कंपन्यांनी (अ.नं.४ व ५) प्रतिसाद दिला होता. तर बाकी इतर ३ कंपन्यांनी निविदा सादर केल्या होत्या. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

१. मे.इंदापूर डेअरी अॅन्ड मिल्क प्रॉडक्टस्, गोखळी प्रतीक्विंटल रु.२९,६००/-.
२. मे.प्रभात डेअरी प्रा.लि., टिळकनगर, प्रतीक्विंटल रु.३०,७००/-.
३. मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई प्रतीक्विंटल रु.३१,०००/-.
४. मे.कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि.,कोल्हापूर रु.३२,०२५/-.
५. मे.गुजरात को.ऑप मिल्क मार्केटिंग फेडरेशन लि.,आनंद रु.३५,६००/-.

वरीलप्रमाणे तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन होऊन सन २०१५-१६ साठी १०,१०० क्विंटल गावरान तूप खरेदी करणेबाबत निर्णय होणेकामी मा.व्यवस्थापन समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला असता, संस्थानकरीता नामांकित कंपनीचे गावरान तूप खरेदी करणेत यावे, असा मा.उच्च न्यायालयाचा आदेश आहे. परंतु नामांकित कंपन्या संस्थानसाठी गावरान तूप पुरविणेस प्रतिसाद देत नाहीत.

तसेच सन २०१५-१६ करीता संस्थानसाठी गावरान तूप खरेदीकामी राबविणेत आलेले निविदा प्रक्रियेमध्ये मे.इंदापूर डेअरी अ‍ॅन्ड मिल्क प्रॉडक्टस् प्रा.लि.,गोखळी हे निम्नतम दरधारक आहेत व पूर्वी मे.इंदापूर डेअरी अ‍ॅन्ड मिल्क् प्रॉडक्टस्, गोखळी यांचेकडून निम्नतम दराने गावरान तूप खरेदी केलेबद्दल मा.उच्च न्यायालयामध्ये सिव्हील अर्ज दाखल झालेला आहे. त्यामुळे सन २०१५-१६ करीता संस्थानसाठी आवश्यक असलेले गावरान तूप सध्याचे निम्नतम दरधारक मे.इंदापूर डेअरी अ‍ॅन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., गोखळी यांचेकडून खरेदी करावे किंवा नाही? याबाबत मा.उच्च न्यायालयाचे मार्गदर्शन घेण्यात यावे व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.

यावर वरीलप्रमाणे मा.उच्च न्यायालयाचे मार्गदर्शन घेणेकामी संस्थानकडून सिव्हील अ‍ॅप्लीकेशन क्रं.४७४८/२०१५ दाखल करण्यात आले होते. तूयावर मा.उच्च न्यायालयाने दि.७/५/२०१५ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले होते.

6. The applicant may purchase cow ghee from M/s.Indapur Dairy and Milk Products Ltd. as it is purchasing today for stock till 31st May, 2015. It shall reissue tender notice as was issued on 12.03.2015 inviting the tenders from the competent bidders of the said reputed brands which were mentioned in the tender notice. The civil application accordingly is disposed of.

सदर आदेशानंतर दि.१८/०५/२०१५ ते दि.२५/०५/२०१५ या कालावधीत फक्त ६ ब्रॅन्डेड कंपन्यांचे ६ ब्रॅन्ड वारणा, हटसन, गोकुळ, विकास, अमूल, महानंदा यांचेकडून/अधिकृत विक्रेत्यांकडून ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि सदर प्रक्रियेस प्रतिसाद मिळालेला नव्हता . म्हणून मा.उच्चा न्यायालयाचे वरील आदेशानंतर स-यांदा व एकूण २०१५-१६ करीता तूप खरेदीकामी तिस-यांदा ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती.

यामध्ये खालील निविदा प्राप्त झाल्या होत्या.

- कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादीत,कोल्हापूर - गोकुळ
- श्रीवारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ, वारणानगर- वारणा
- मे.गुजरात को-ऑपरेटिव्ह मिल्क फेडरेशन लि., आनंद – अमूल
- मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई
- मे.अजंता राज प्रोटीन्स प्रा.लि.,आग्रा

वरील अ.नं.४ व ५ या कंपन्या मा.उच्च न्यायालयाने निर्देशित केलेल्या ब्रॅण्डेड कंपनीच्या नसल्याने या निविदा प्रक्रियेत त्यांचा विचार केलेला नाही.

सदर ई-निविदा दि.१५/६/२०१५ रोजी उघडण्यात आल्या होत्या . त्यांचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. यामध्ये मे.कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघ मर्यादित, कोल्हापूर यांचे दर न्यूनतम म्हणजेच रु.३,१९०/- प्रती क्विंटल दिलेले होते.

मे.कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघ मर्यादित, कोल्हापूर यांनी दि.१६/६/२०१५ रोजी पत्र पाठवून, त्यांनी संसथानमार्फत उघडणेत आलेले वरील ई-निविदेमध्ये चुकीने प्रती क्विंटल दर ३१,९००/- ऐवजी प्रती १० किलोचे दर रक्कम रु.३,१९०/- प्रती क्विंटल दिल्याचे कळविलेले आहे.

यामध्ये मे.कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर यांनी निविदेमध्ये नमूद केलेला दर हा तूपाचे बाजारातील दर पाहता चुकीने नमूद झाला आहे, हे स्पष्ट दिसून येते. त्यांनी दिलेला खुलासा पाहता असे दिसून येते की, क्विंटलचे दर मागविले असता नजरचुकीने १० किलोग्रॅमचा दर दिला गेला आहे. म्हणजेच संगणमकामूध्ये एक शुन्य नमूद करण्याचे राहिले आहे, हे स्पष्ट होते. कारण तूपाचा भाव रु.३१.९० पैसे कोठेही नाही. खुलासा देताना पहिला आकडा बदलून कोणताही वाढीव आकडा अथवा नंबर दोनच्या स्पर्धकापेक्षा थोडा कमी करुन दिलेला नाही. त्यामूळे तांत्रिक चूक मान्य करुन खुलासा स्वीकारण्यात यावा, असे ठरले. जर तांत्रिक बाब धरुन बसले व क्रमांक दोनला कंत्राट दिल्यास संस्थानचे उघडपणे लाखो रुपयांचे नुकसान होईल. दोन्ही दरामध्ये खूपच फरक आहे. त्यामूळे खुलाशाप्रमाणे मे.कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर यांचा दर न्युनतम असलमुळे तूयांची निविदा मान्य करणे योग्य ठरेल, असा निर्णय घेतला होता.

मा.उच्च न्यायालयाच्या ब्रॅण्डेड म्हणून घोषित केलेले तूपाच्या ब्रॅण्डपैकी मे. कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघ मर्यादित,कोल्हापूर यांचे गोकुळ ब्रॅण्डचे तूप असल्यामूळे त्यांना जुलै ते सप्टेबर २०१५ या ३ महिन्यासाठी २५०० क्विंटल तूप खरेदीचा पुरवठा आदेश देण्यात आला होता.

लाडू प्रसाद निर्मिती विभाग व संबंधित कंत्राटदार यांचा जुलै ते सप्टेबर २०१५ या तीन महिन्यातील गोकुळ ब्रॅण्डचे तूप वापराबाबतचा अभिप्राय विचारात घेऊन माहे ऑक्टोबर ते मार्च २०१६ या कालावधीसाठी ५,००० क्विंटल गावरान तूप प्रती क्विंटल रु.३१,९००/- दराने खरेदी करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर ऑक्टोबर २०१५ ते डिसेंबर २०१५ या ३ महिन्याचे कालावधीसाठी २,५०० क्विंटल गावरान तूप मे.कोल्हापूर जिल्हा दूध संघ, कोल्हापूर यांचेकडून खरेदी करण्याचा निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१५ चे सभेत घेण्यात आला होता.

तूयास अनुसरुन इकडील जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/३६२४/२०१५ दि.२८/०९/२०१५ अन्वये मे. कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघ मर्यादित, कोल्हापूर यांना ऑक्टोबर ते डिसेंबर २०१५ या ३ महिन्याचे कालावधीसाठी २५०० क्विंटल गावरान तूप पुरविणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

मे. कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघ मर्यादित, कोल्हापूर यांनी आतापर्यंत पुरविलेले गावरान तूपाचे लॅब् रिपोर्टस् फुड अॅन्ड सेफटी अॅक्टचे स्टॅण्डर्डप्रमाणे आहेत. तसेच लाडू प्रसाद निर्मिती विभागाकडील मागील कालावधीत वापरलेल्या या तूपाबाबतचा अभिप्राय चांगला आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाचे ब्रॅण्डेडकंपनीकडून तूप खरेदी करावेत असे दि.७/५/२०१५ चे आदेश आहेत. त्या निर्देशानुसारच सध्या संस्थानने गोकुळ ब्रॅण्डचे गावरान तूप खरेदी करीत आहे व हा ब्रॅण्ड मा.उच्च न्यायालयाचे निर्देशित केलेल्या ६ ब्रॅण्डपैकी एक आहे.

मे.इंदापूर डेअरी अॅण्ड मिल्क प्रॉडक्टस लि., गोखळी यांनी संस्थान खरेदी करीत असलेल्या ब्रॅण्डेड तूपाबाबत जनहित याचिका क्रं.५४७८ दाखल केली होती. त्यावेळी त्यांनी ६६११ व ५५०९ असे दोन सिव्हील अॅप्लीकेशन्स् मा.उच्च न्यायालयात सादर केले होते, त्यावर मा.उच्च न्यायालयाने दि.११/६/२०१५ रोजी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

8. The said tender notice is already issued. Naturally, pursuant to the said tender notice, the petitioner is not in a position to participate in the tender process. The said tender notice is for a period from July 2015 to March 2016 i.e.for 9 months. It is submitted that, this is a third time tender process has been issued. The Sansthan has spent lakhs of rupees in issuing the tender. It would not be appropriate to direct them to again reissue fresh tender notice.

9. Considering the aforesaid conspectus of the matter, we are inclined to restrict the order dated 7th May, 2015 for the current year i.e. the tender already issued. It is made clear that, if in future the tender notice is to be issued by the Sansthan, the Sansthan shall consider the application of all reputed producers of cow ghee as the consideration would be competitive rates and the quality of the cow ghee, and the same would not be restricted to the six Companies mentioned in the present tender. With this clarification, the Writ Petition stands disposed of.

10. In case the present tender notice, which is already issued, does not materialize or cannot be made final and if fresh tenders notice is required to be issued, then the Sansthan naturally will have to seek permission of this Court. At that time, the contentions of the present petitioner also would be considered.

तरी वरील वस्तूस्थिती, मा.उच्च न्यायालयाचे दि.७/५/२०१५ चे ब्रॅण्डेड कंपन्यांकडील तूप खरेदीचे आदेश, मा.उच्च न्यायालयाचे दि.११/६/२०१५ चे वरीलप्रमाणे दिलेले निर्देश, संस्थानच्या लाडू निर्मिती विभागाने सदर तूप वापराबाबतचे दिलेले चांगले अभिप्राय व सदर पुरवठाधारकाने पुरविलेले गावरान तूपाचे लॅब् रिपोर्टस वगैरे सर्व बाबी विचारात घेता जानेवारी ते मार्च २०१६ या पुढील ३ महिन्यांचे कालावधीसाठी २,५०० क्विंटल गोकुळ ब्रॅण्डचे गावरान तूप मे. कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघ मर्यादित यांचेकडून खरेदी करावे अगर कसे ? याबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६६० **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालयाचे दि.७/५/२०१५ चे ब्रॅण्डेड कंपन्यांकडील तूप खरेदीचे आदेश, मा.उच्च न्यायालयाचे दि.११/६/२०१५ चे वरीलप्रमाणे दिलेले निर्देश, संस्थानच्या लाडू निर्मिती विभागाने सदर तूप वापराबाबतचे दिलेले अभिप्राय व सदर पुरवठाधारकाने पुरविलेले गावरान तूपाचे लॅब् रिपोर्टस वगैरे सर्व बाबी विचारात घेता जानेवारी ते मार्च २०१६ या पुढील ३ महिन्यांचे कालावधीसाठी २,५०० क्विंटल गोकुळ ब्रॅण्डचे गावरान तूप मे.कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघ मर्यादित यांचेकडून खरेदी करणेस तत्वतः मान्यता देण्यात आली.**

**तसेच पुढील पुरवठा आदेश देणेपूर्वी मा.उच्च न्यायालयाने गावरान तुप खरेदी करणेसाठी सूचविलेल्या ब्रॅण्डेड कंपन्यांच्या सध्याच्या बाजारभावाची पडताळणी करावी व त्याचा तुलनात्मक तक्ता पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही-प्र.अधिक्षक,खरेदी विभाग)

---

विषय नं.४३ **मे.सुरभी डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद यांच्या पेपर कप पुरवठा सुरक्षा अनामत रक्कमेबाबत.**

प्रस्ताव- माहे ऑक्टोबर २०१४ ते मार्च २०१५ या कालावधीकरीता किराणा मालचे ई-निविदा प्रक्रियेमध्ये समावेश होता. पेपरकप साठी मागविलेल्या निविदेमध्ये पेपरकपचे स्पेसिफीकेशनमध्ये मध्ये १८० gsm नमूद केले होते. तर BOQ मध्ये २०० gsm नमूद केले होते. सदरची बाब ही अनवधानाने टायपिंगमधील चुकीमुळे झालेली होती. पेपर कपसाठी सदर निविदेमध्ये न्युनतम दर धारक मे.सुरभि डिस्ट्रीब्युटर्स , औरंगाबाद यांना २,००,००,००० (दोन कोटी नग) २०० gsm चे पेपर कप ०.४१ अन्वये पुरविणेकामी पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

मे.सुरभी एंटरप्रायझेस, औरंगाबाद यांनी दि.३०.१२.२०१४ रोजी ५,४६,००० नग पेपर कप पुरविले होते. त्यातून १०० नग पेपर कप कॅंटीन विभागास वापरावयास दिले होते, त्या वेळी त्यांनी पेपर कप वापरुन पेपरकप नमून्याप्रमाणे असलेचे सांगितले होते. तथापी दक्षता पथकातील सदस्य श्री झिरपे, मुख्यलेखाधिकारी यांनी प्राप्त पेपरकपांमधुन काही पेपर कप तपासनीसाठी नेले होते. त्यानुसार त्यांनी सदर पेपर कप हे पुरवठा आदेशातील

वर्णनाप्रमाणें नसल्याचे सांगितले होते. त्यामूळे हे पेपर कप Reject करण्यात येऊन संस्थानने १८० gsm चे पेपर कप मे.सुयोग नेचर केअर, जयपूर यांचेकडुन खरेदी केले होते.

मे.सुरभि डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांनी प्रथमच माल पुरविला त्यावेळी ही घटना घडल्यामुळे त्यांना कुठलेही बील आदा केलेले नाही. तदनंतर मे.सुरभि डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांनी त्यांचे डिपॉझीट व पुरविलेले (नाकारलेले) पेपर कप परत मिळणेबाबत विनंती केली होती. याबाबत सविस्तर प्रस्ताव तत्कालिन मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचे समोर सादर केला असता त्यांनी मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय घेणेबाबत कळविले होते. त्यांनी त्यांचे अभिप्रायात पेपर कप परत करणेबाबत व त्यांची रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख) डिपॉझीट निविदा अटी-शर्तीचे पालन केले नसल्याने जप्त करणेबाबत अभिप्राय दिला होता. त्यास मा. कार्यकारी अधिकारी महोदय यांनी Rejected पेपरकप परत करुन नियमानुसार अनुज्ञेय असल्यास EMD रक्कम जमा करावी लागेल असे निर्देश दिले होते.

त्यास अनुसरुन पेपर कप परत करुन डिपॉझीट जप्त करण्याची कारवाई करण्यात आलेली होती. याबाबत मे.सुरभि डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांनी त्यावेळचे मा. अध्यक्ष महोदय यांना पत्र दिले होते. त्यावर सविस्तर प्रस्ताव सादर केला असता "मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावे असे निर्देश होते. त्यानुसार सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती दि. ०८.०९.२०१५ रोजीचे सभेसमोर सादर करण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१५ चे सभेतील निर्णय क्रं.३०४ अन्वये "मे.सुरभी डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांची सुरक्षा अनामत रक्कम परत करणेबाबत संस्थान पॅनेलवरील वकिलाचा अभिप्राय घेण्यात यावा व त्याचे अभिप्रायासह सदरहू प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा," असा निर्णय झालेला आहे.

सदर निर्णयानुसार विधी विभागामार्फत अॅड.श्री.आर.एस.जपे, कोपरगांव यांना मे.सुरभी डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांच्या पेपर कप पुरवठा सुरक्षा अनामत रक्कम परत करणेबाबत अभिप्राय देण्यासाठी जा.नं.एसएसएस/ वशी-विधी/ ४६९६/२०१५ दि.२३/१०/२०१५ अन्वये विनंती करण्यात आली होती. तसेच दि.०२/११/२०१५ रोजी अॅडव्होकेट श्री.जपे साहेब यांना याबाबतची कागदपत्रे-फाईल व माहिती समक्ष देण्यात आली होती.

अॅडव्होकेट श्री.जपेसाहेब यांनी त्यांचे दि.०९/११/२०१५ चे पत्रान्वये, "एकंदरीत कार्यवाहीमध्ये श्री साईबाबा संस्थानने २०१४-१५ पेपर कप पुरवठाबाबत मंजूर निविदामध्ये पान नं.२७ वर मुद्दा नं.३२ मध्ये स्पेसिफिकेशन नमूद आहे. त्यामूळे पुरवठादाराचा दोष असल्याचे निदर्शनास येत नाही. एकंदरीत परिस्थिती व सर्व कागदपत्र पाहता न्यायालयीन कार्यवाही करणे झाल्यास आपले ठरावातील कथनाचा न्यायालयास समर्थन करणे खात्रीशीर यशासाठी योग्य व पुरेसे वाटत नाही. संस्थानची उद्दीष्टे व संस्थानची प्रतिष्ठा पाहता व एकंदरीत पुढील जटील न्यायालयीन प्रक्रिया पाहता व आपल्याकडील व्यवहारिक त्रुटी पाहता न्यायालयीन कारवाई करणे योग्य वाटत नाही."

"तसेच संबंधित पुरवठादारास बोलावून समायोजन करुन अनामत रक्कम प्राप्त परिस्थितीत परत करण्याचा निर्णय घेतल्यास परिस्थितीप्रमाणे तो चुकीचा ठरणार नाही, योग्य कार्यवाही व्हावी." असे कायदेशीर मत कळविले आहे. सदरचे पत्र व या प्रकरणाची वस्तूस्थितीदर्शक अहवालही सोबत अवलोकनार्थ सादर केला आहे.

तरी मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील वरील निर्णयानुसार, संस्थानचे पॅनेलवरील अॅडव्होकेट श्री.आर.एस. जपे यांनी या प्रकरणात दिलेला लेखी अभिप्राय विचारात घेऊन, मे.सुरभी डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांची सुरक्षा अनामत रक्कम रु.३,००,००/- (अक्षरी रु. तीन लाख मात्र) परत करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित पेपरकप प्रत्यक्षात वापरलेले असल्याने, तसेच संस्थानचे पॅनेलवरील अॅडव्होकेट श्री.आर.एस.जपे यांनी या प्रकरणात दिलेला लेखी अभिप्राय विचारात घेता, मे.सुरभी डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांची सुरक्षा अनामत रक्कम रु.३,००,०००/- परत करण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.४४** **संस्थानचे स्कुल बसेस करीता टायर्स देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६५ नुसार, संस्थान स्कुलबसेस करीता 09:00:20 या साईजचे अपोलो अमर डिलक्स कंपनीचे १० टायर्स खरेदी कामी फेर निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले होते.

उपरोक्त निर्णयानुसार, नवीन टायर्स खरेदी कामी जनसंपर्क विभागामार्फत वर्तमानपत्रात शासकीय दरानुसार तसेच माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा विक्री दि.०१/१२/२०१५ ते दि.०४/१२/२०१५अखेर सकाळी ११.०० ते सायं. ०५.०० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आला होता.

त्यानुसार, दि.०४/१२/२०१५ अखेर दोनच निविदेंची विक्री झाली असुन दि.०७/१२/२०१५ अखेर एकच निविदा प्राप्त झालेली आहे. त्यामुळे टायर खरेदी करीता फेर निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे.

सदर फेरनिविदा प्रक्रिया राबविणेस बराच कालावधी लागणार आहे. आजमितीस ०८ स्कुल बसेसचे पुढील १६ टायर्सची सततचे वापराने पुर्णपणे झीज झालेली असुन एकही टायर्सला नक्षी राहीलेली नाही. टायर्सची झीज झाल्याने प्रवासात कधीही टायर फुटून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी टायर्स खरेदी बाबत फेरनिविदा प्रक्रियाचा कालावधी व टायर्सची निकड लक्षात घेता 09:00:20 या साईजचे १६ टायर्स (अंदाजे किंमत रु. दोन लाख पर्यंत) कोणी साईभक्त देणगी स्वरुपात देत असलेतर मिळतील तेवढे टायर्स देणगी स्वरुपात स्विकारणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे स्कुल बसेस करीता आवश्यक असणारे 09:00:20 या साईजचे १६ टायर्स (अंदाजे किंमत रु. दोन लाख पर्यंत) जे कोणी साईभक्त देणगी स्वरुपात देत असेल तर त्यांचेकडून देणगी स्वरुपात स्विकारणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी हॉस्पिटलमधील वैद्यकीय संचालक पदाची वयोमर्यादा शिथिल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि. १२/०४/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. २७१ नुसार "दि. ०१/०२/२०१४ रोजी झालेल्या मुलाखती रद्द करणेत याव्यात, रुग्णालयांसाठी भरावयाच्या विविध पदांसाठी फेरजाहिरात देण्यात यावी व सदर जाहिरातीमध्ये वैद्यकीय संचालक पदासाठी वयापेक्षा अनुभवाला प्राधान्य देण्यात यावे, वयोमर्यादा किती ठेवायची याबाबत विचार विनीमय करणेत येऊन निश्चित करणेत यावी व मा. औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे समिती गठीत करणेत येऊन मुलाखती घेण्यात याव्यात" असे ठरले आहे (सोबत प्रत जोडली आहे.).

उपरोक्त निर्णयानुसार नंतरच्या जाहिरातीत वैद्यकीय संचालक पदासाठी वयोमर्यादा टाकण्यात आली नव्हती. जाहिरतीनुसार पात्र अर्जदारांची दि. ०१/०३/२०१५ रोजी मुलाखती घेण्यात आल्या. मा.न्यायालयाने मुलाखती घेण्यासाठी निवड केलेल्या तज्ञ समितीने मुलाखती घेतल्यानंतर वैद्यकीय संचालक या पदाचे अहवालामध्ये "In advertisement no age limit mentioned so selection list should be decided as per govt. recruitment rules regarding age criteria" असा रिमार्क दिलेला आहे. तदनंतर दि. १२/०३/२०१५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार निवड समितीने नियुक्तीसाठी शिफारस केलेल्या उमेदवारांची यादी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आली (प्रत सोबत जोडली आहे.) त्यामधील शुद्धीपत्रकात वैद्यकीय संचालक पदाच्या नियुक्तीबाबत पुढीलप्रमाणे नमुद केलेले आहे. The decision regarding post at Sr. No. 1 i.e. Medical Director is kept reserved on technical grounds.

उपरोक्त निर्णय क्र. २७१ व शुद्धीपत्रकाचा आधार घेऊन डॉ. आर.व्ही.प्रभाकरराव, प्र. वैद्यकीय संचालक यांच्यापुरती विशेष अपवादात्मक बाब म्हणून वयोमर्यादा शिथील करण्याचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीची मान्यता न घेता शासनास परस्पर जा.नं.एसएसएसटी/वशी६९२/२०१५ दि. ०५/०५/२०१५ अन्वये तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी पाठविलेला आहे. (सोबत प्रत जोडली आहे.)

सबब, मा.त्रिसदस्य समितीची मान्यता न घेतल्याने, एचआर विभाग, रुग्णालये दि. १३/०९/२०१५ रोजीची मंजुर टिपणीनुसार जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/३६३०/२०१५ दि. २८/०९/२०१५ अन्वये उपरोक्त दि. ०५/०५/२०१५ रोजीचे पत्रान्वये वैद्यकीय संचालक पदाची वयोमर्यादा शिथील करणेबाबतचा प्रस्ताव रद्द करणेबाबत मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविणेत आले होते.

आता विधी व न्याय विभाग क्र. सासंवि-२०१५/२०५/प्र.क्र.५३/का.१६ दि. ०६/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये रा.व.चव्हाण कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि. ०५/०५/२०१५ रोजीचा प्रस्ताव मागे घेण्याबाबतची कारणमिमांसा नमूद करुन स्वयंस्पष्ट अहवाल संबंधित सर्व कागदपत्रांसह उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे.

सबब, आता पूर्वी निर्णय झालेप्रमाणे वैद्यकीय संचालक पदासाठी वयापेक्षा अनुभवाला प्राधान्य देणे हे उचित ठरेल पण त्याचबरोबर विशेष अपवादात्मक बाब ~~म्हणून~~ म्हणून वयाची अट ही कोणत्याही एका व्यक्तीसाठी शिथील करणे योग्य ठरणार नाही, असे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविता येईल.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र. ६६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **खातेनिहाय चौकशीकामी विधी व्यावसायिक यांची सादरकर्ते अधिकारी म्हणून नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ.हरिष बजाज व डॉ.गौरव वर्मा श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी अनुक्रमे दि.०६.०७.२०१५ व दि. ०९.०९.२०१५ रोजीचे अर्जान्वये खाते चौकशीत त्यांचेतर्फे बचाव प्रतिनिधी म्हणून विधीव्यावसायिक नेमणेबाबत विनंती केली आहे. त्यास अनुसरुन दि. २७.१०.२०१५ रोजीचे सभेत विषय नं. ०७ डॉ.हरिष बजाज व डॉ.गौरव वर्मा यांचे अर्जाबाबत सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ३८१ डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांनी विधी व्यावसायिक नेमणेबाबत केलेलीविनंती मान्य करण्यात आली. तसेच संस्थानसाठी सुध्दा याकामी विधी व्यावसायिक नेमणेत यावा. असा पारित करण्यात आला आहे.

संस्थानच्या वतीने विधी व्यावसायिक यांची सादरकर्ते अधिकारी म्हणून नेमणूक करणेकामी संस्थान ॲडव्होकेट पॅनॉलवरील ०९ वकीलांना दि.०७.११.२०१५ रोजी पत्र देवून कळविण्यात आले होते की, आपण संस्थानचे वतीने कर्मचारी खाते चौकशीमध्ये सादरकर्ता अधिकारी (Presenting officer) म्हणून काम करणेस इच्छुक असल्यास महिन्यात/ आठवडयात कितीवेळी संस्थानला भेट देवून कामकाज करु शकता व याकामी आपणास किती मानधन अपेक्षीत आहे. याबाबत उलट टपाली कळवावे. अथवा आपल्या माहितीतील ॲडवोकेट ज्यांना कामगार

कायदे विषयक कामकाजाचा अनुभव आहे त्यांचे नांव सुचवावे किंवा संबंधीतास संस्थानकडे संपर्क किंवा प्रस्ताव सादर करणेबाबत कळविणेत यावे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या आस्थापनेवरील कर्मचा-यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांचे खातेनिहाय चौकशीचे कामकाज करण्यात येते. सध्या संस्थानकडे एकूण ०८ खाते निहाय चौकशीचे कामकाज चालू असून ०६ प्रस्तावित आहेत. त्यात खाते चौकशी अधिकारी म्हणून ॲड.बी.वाय. काळवाघे, कोपरगाव हे काम पाहतात तर सादरकर्ते अधिकारी म्हणून प्र. कामगार अधिकारी हे कामकाज पाहतात.

आता एकूण ०८ विधी व्यावसायिक यांनी सादरकर्ते अधिकारी म्हणून नियुक्ती होणेबाबत आपले प्रस्ताव सादर केलेले आहेत. ते परिशिष्ट "अ" सोबत जोडले आहे.

तरी परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या विधी व्यावसायिकापैकी किंवा समितीचे शिफारशीनुसार डॉ.बजाज आणि डॉ.वर्मा यांचे खाते निहाय चौकशी कामी व इतर कर्मचा-यांचे खाते चौकशीचे कामकाजात संस्थानचे वतीने सादरकर्ते अधिकारी नेमणेबाबत निर्णय होणेकामी सविनय सादर.

निर्णय क्र. ६६४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावासोबत सादर केलेल्या परिशिष्टाचे अवलोकन करता ॲडव्होकेट सी.जे.बोरुडे, अहमदनगर यांचा या क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव विचारात घेता, डॉ.हरिष बजाज व डॉ.गौरव वर्मा, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे खातेनिहाय चौकशीकामी सादरकर्ते अधिकारी म्हणून त्यांची नेमणूक करणेत यावी. तसेच त्यांना द्यावयाचे मानधन कार्यकारी अधिकारी यांनी निश्चित करुन त्यास समितीची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.कामगार अधिकारी, कामगार विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०३ **संस्थानचे आर्थिक सहाय्यातून शिर्डी पोलीस स्टेशन कार्यालयासाठी एका खोलीचे बांधकाम करुन देणेकामी झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम 2004 मधील तरतुदः** महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 04 दिनांक 04/06/2011 अन्वये अध्यादेश क्रमांक 14 अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम 2004 यात करण्यात आलेल्या सुधारणेनुसार कलम 21 ची खालील प्रमाणे सुधारणा करणेत आलेली आहे.

समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल अशी तरतुद आहे.

कलम 21 च्या पोट-कलम (1क) (1) च्या तरतुदींना अधीन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्यशासनाच्या पूर्व मंजुरीने, आणि राज्यशासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करणेत येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधीन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णयः** मा.व्यवस्थापन समिती सभा दि. 19/07/2009/ निर्णय क्रमांक 611.

**प्रस्ताविकः** संस्थानचे तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०७/२००९ रोजीचे सभेत "..उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्र. ६११ अन्वये सदरहू काम लहान स्वरुपाचे असल्याने तसेच पोलीस स्टेशनची निकड लक्षात घेऊन रु.2,78,401/- मात्रचे खर्चास व याकामास मान्यता देण्यात आली."

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सदरहू प्रस्ताव दि. २८/१०/२००९ रोजीचे पत्रानुसार विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी करणेत आला होता.

याबाबत विधी व न्याय विभागाने त्यांचे दि.२४/११/२००९ चे पत्रान्वये सदर प्रस्तावास छाननी समितीची मान्यता घेऊन, प्रस्तावाची विधीग्राह्यता तपासून प्रस्ताव इकडील कार्यालयास सादर करावा असे कळविलेले होते. तसेच याबाबत परत दि. २०/०१/२०१० रोजीचे पत्रान्वये "..विषया संदर्भात मागविलेली माहिती शासनास अद्याप अप्राप्त आहेवाचे अनुषंगाने विधी ग्राह्यता तपासून आपया प्रस्ता .ले अभिप्रायासह माहिती उलटटपाली शासनास सादर करावी." असे कळविलेले होते.

उपरोक्त पत्रास अनुसरुन इकडील कार्यालयाचे दि.२३/०१/२०१० रोजीचे पत्रान्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना ".. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम 2004 मधील कलम 21 (2) मधील तरतुदीनुसार मा. छाननी समिती नियुक्त केलेली आहे. परंतू छाननी समितीस नोंदणीकृत संस्था, शैक्षणिक संस्था, क्रिडा आदीसाठी राज्य शासनाचे पूर्व मंजूरीने निधी उपलब्ध करुन देणेची तरतुद आहे. तथापि, शिर्डी पोलीस स्टेशन हे उपरोक्तपैकी कोणतीही संस्था नसल्याने छाननी समितीच्या अखत्यारीत येत नाही. याबाबीस अनुसरुन विषयांकीत प्रस्तावास शासकिय संस्थेस अर्थ साहाय्य म्हणून थेट राज्यशासना मार्फत मान्यता देणेस विनंती आहे. असे कळविण्यात आलेले होते.

तथापी महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई येथे दि. २७/०१/२०१० रोजी मा. मंत्री (विधी व न्याय), महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली संस्थानचे तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व कार्यकारी अधिकारी यांचे समवेत झालेल्या बैठकीत सदरहू प्रस्तावावर चर्चा होऊन "..सदर प्रस्तावास छाननी समितीची मान्यता घेणेची कार्यवाही पूर्ण झालेनंतर शासनाची मान्यता देणेबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल .असा निर्णय घेण्यात आला.

उपरोक्त निर्णयानुसार सदर कामाबाबत विहीत पध्दतीने कोटेशन्स् मागवून दि. ०७/०४/२०१० ते दि.०६/०८/२०१० या कालावधीत सदरहू काम शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेस अधिन राहून संस्थानमार्फत ठेकेदार नेमून काम पूर्ण करण्यात आले. सदर कामी संस्थानला रु.2,31,187/- मात्र खर्च झालेला आहे.

तथापी सदर प्रस्तावास दि.०४/०३/२०१२ रोजी छाननी समितीचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला होता. परंतु त्यानंतर छाननी समितीची सभा झाली नाही व पुढे छाननी समिती अस्तित्वात राहीलेली नसल्यामुळे सदर प्रस्तावावर निर्णय झाला नाही.

तदनंतर मा.विधी व न्याय विभागाने जा.क्र. सासंवि/2009/ 618 (62/9)/ का. सोळा, दि.04/06/2014 रोजीचे पत्रान्वये "..छाननी समितीची मान्यता घेऊन प्रस्ताव शासनास प्राप्त न झाल्यामुळे तसेच अधिनियमात तरतुद नसल्यामुळे सास्थानच्या अर्थिक साहाय्यातून शिर्डी पोलीस कार्यालयासाठी एका खोलीचे बांधकाम व संपूर्ण कार्यालयास रंगकाम करुन देण्याचा रु.2,78,401/- इतक्या रकमेचा सदर प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे." असे कळविलेले होते.

वरील पत्राचे अनुषंगाने मा. शासनास अधिनियम 2004 चे कलम 21 मधील सुधारीत तरतुदीनुसार पायाभुत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविणेसाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल. या तरतुदीनुसार तसेच दि.31/03/2012 पासून छाननी समिती अस्तित्वात नसल्याने व सदरहू काम सन 2010 मध्ये पूर्ण झालेले असल्याने, याकासाठी झालेल्या रु.2,31,187/- मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत जा. क्र. 2180/2014 दि.05/08/2014 रोजीचे पत्रान्वये शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यास अद्याप मान्यता प्राप्त झालेली नाही.

दि.01/12/2015 रोजी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मुंबई यांचे समवेत झालेल्या बैठकीत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर व कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा केली सदरहू प्रस्तावास त्रिसदस्य समितीची मान्यता घेवून सदरहू प्रस्ताव फेर सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

तरी विषयांकीत कामी केलेल्या रु.2,31,187/- मात्र इतक्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ६६५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व नमूद खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

वरील निर्णय क्र.६१९ ते ६६५ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०५.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| (बाजीराव शिंदे)<br>कार्यकारी अधिकारी<br>सदस्य | (अनिल कवडे)<br>जिल्हाधिकारी, अहमदनगर<br>सदस्य | (श्रीकांत कुलकर्णी)<br>मुख्य जिल्हा न्यायाधीश<br>अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी**